म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा
दा. क्र. ६६(७

25 FEB 1972

पा. क्र. ६६७१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
[illegible] केल्य[illegible] नियम क्र. ५ (८) नुसार



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
ग्रा. क्र. ८६६७ ...... नों. दि

महाराष्ट्र
प्रकाशन
अमरावती

मंगलकथामाला पुष्प पहिलें

# भिल्लवीर
# कालिंग

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

मूल्य रुपये दोन केवळ

महाराष्ट्र
प्रकाशन
अमरावती

मं ग ल क था मा ला

संपादक

स. मा. गर्गे

गो. नी. दाण्डेकर

प्रथम आवृत्ति : १९५६
द्वितीय आवृत्ति : १९५८

प्रकाशक

प्र. दि. बेदरकर

महाराष्ट्र प्रकाशन

राजकमल चौक

अमरावती

सजावट : स्टुडिओ डी. जी. जी.

मुद्रक

य. गो. जोशी,

आनंद मुद्रणालय

१५२३ सदाशिव पेठ

पुणें दोन

सर्वाधिकार सुरक्षित

माझीं भाचरें

*********

वन्दना भोळे

सनत्कुमार भाटे

भारती मराठे

या तिघांस

*********

गोपूमामा

# नि वे द न

**बाल** म्हणजे सहा ते सोळा वर्षें. या कालखण्डाचे दोन भाग करायला हवेत. बारापर्यंत पहिला-अद्भुताची आवड असणारा. पण बारा ते सोळा, किंबहुना अठरा, हें वय ती आवड संपवून आदर्शांच्या मागें धांवणारें. या वयांत मुलांच्या हातीं चांगलें सकस, निरोगी, सद्गुण-संवर्धक वाङ्मय द्यायला हवें.

हाच हेतु दृष्टीसमोर ठेवून मंगल-कथा-मालेचें हें प्रथम पुष्प बालांचे हातीं देत आहोंत. त्यांची दृष्टि विशाल व्हावी, त्यांच्या कर्तृत्वाचीं क्षितिजें फांकावीं, त्यांच्या मनानें चांगल्याकडे, कल्याणाकडे धांव घ्यावी, हा हेतु या पुष्पानें साध्य व्हावा अशी अपेक्षा.

भिल्लवीर कालिंग त्यांना आपल्यासवें वनांत नेईल, हिंडवील. त्यांचीं मनें सुदृढ, काटकहि करील. कालिंगाबरोबर राहून त्यांच्या अंगीं संकटांशीं झुंजण्याचें सामर्थ्य येईल. तें येवो.

या पुस्तकास भारतसरकारनें तिसऱ्या बालवाङ्मय स्पर्धेंत प्रथम पारितोषिक आणि मुंबईराज्य सरकारनें १९५६–५८ सालचें बालवाङ्मयांतील प्रथम पारितोषिक देऊन गौरविलें आहे.

सं पा द क

मं ग ल क था मा ला

# प्रकरण पहिलें

सूर्य अगदीं मध्यावर आला, तरी विंध्य पर्वताच्या कुशींत असलेल्या नर्मदातटाकींच्या त्या निबिड वनांत त्याचा ताप फारसा जाणवत नसे. संध्याकाळ झाली, कीं त्या वनांत फार लवकर अंधारूं लागे. काळसर हिरवीं असलेलीं मोहाचीं अन् सायाळीचीं पानें काळोखीनें मोहरून जात. पक्ष्यांना वाटे कीं रात्र झाली, म्हणून ते सूर्यास्त झाला नाहीं, तोंवरच घरट्यांकडे परत वळत. दिवसभर उगीचच इकडून तिकडे धांवणारे तित्तिर एकत्र येऊन कोण्या झुडपाच्या आसऱ्याला विसांवत. मग वाघांना अन् लांडग्यांना वाटे, कीं आतां बाहेर निघायला हरकत नाहीं. थबकत, शिकारीची चाहूल घेत, आळसानें अंग दुमडल्यासारखें करीत, उगीचच शेपूट आपटीत वाघ पाणवठ्याकडे निघत.

भिल्ल कालिंगाला त्याची आई मोघा इनें सायंकाळच्या जेवणासाठीं ससे धरून आणायला सांगितलें होतें.

तसें पाहिलें, तर हें काम कांहीं कालिंगाला मनापासून आवडत नसे. त्याच्या सरमडाच्या झोंपडीच्या कुडाच्या भिंतीवर शेण थापून त्यानें स्वस्तिक काढलें होतें, आणि सकाळपासून तो त्या स्वस्तिकांत झेंडूचीं फुलें रोवून त्याला अधिक देखणें करायची धडपड करीत होता. त्याचा धाकटा भाऊ तंगा त्याच्या हाताशीं लुडबुडत होता.

"भैय्या, मी धांवत जाऊन ओढयांतून जमतीचे दगड आणूं का?"

स्वस्तिकाचें टोंक हातानें नेटकें करीत कालिंग म्हणाला,

बालांना आवडेल
रुचेल आणि पचेल
असें साहित्य
मंगलकथामाला प्रस्तुत करीत आहे.

卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐

प्रथम पुष्प
केन्द्र आणि मुंबई सरकारकडून
गौरविलें गेलेलें
## भिल्लवीर कालिंग
ले. गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

द्वितीय पुष्प
## दयाळ
एका चिंतनशील युवकाची कथा
ले. यदुनाथ थत्ते

तृतीय पुष्प
दर्यावर्दी साहसकथा
## खजिन्याचा शोध
ले. भा. रा. भागवत

प्रत्येकीं मूल्य रुपये दोन

卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐

म हा रा ष्ट्र प्र का श न : अ म रा व ती

# प्रकरण पहिलें

सूर्य अगदीं मध्यावर आला, तरी विंध्य पर्वताच्या कुशींत असलेल्या नर्मदातटाकींच्या त्या निबिड वनांत त्याचा ताप फारसा जाणवत नसे. संध्याकाळ झाली, कीं त्या वनांत फार लवकर अंधारूं लागे. काळसर हिरवीं असलेलीं मोहाचीं अन् सायाळीचीं पानें काळोखीनें मोहरून जात. पक्ष्यांना वाटे कीं रात्र झाली, म्हणून ते सूर्यास्त झाला नाहीं, तोंवरच घरट्यांकडे परत वळत. दिवसभर उगीचच इकडून तिकडे धांवणारे तित्तिर एकत्र येऊन कोण्या झुडपाच्या आसऱ्याला विसांवत. मग वाघांना अन् लांडग्यांना वाटे, कीं आतां बाहेर निघायला हरकत नाहीं. थबकत, शिकारीची चाहूल घेत, आळसानें अंग दुमडल्यासारखें करीत, उगीचच शेपूट आपटीत वाघ पाणवठ्याकडे निघत.

भिल्ल कालिंगाला त्याची आई मोघा इनें सायंकाळच्या जेवणासाठीं ससे धरून आणायला सांगितलें होतें.

तसें पाहिलें, तर हें काम कांहीं कालिंगाला मनापासून आवडत नसे. त्याच्या सरमडाच्या झोंपडीच्या कुडाच्या भिंतीवर शेण थापून त्यानें स्वस्तिक काढलें होतें, आणि सकाळपासून तो त्या स्वस्तिकांत झेंडूचीं फुलें रोवून त्याला अधिक देखणें करायची धडपड करीत होता. त्याचा धाकटा भाऊ तंगा त्याच्या हाताशीं लुडबुडत होता.

"भैय्या, मी धांवत जाऊन ओढयांतून जमतीचे दगड आणूं का?"

स्वस्तिकाचें टोंक हातानें नेटकें करीत कालिंग म्हणाला,

" कसले दगड ? "

" म्हंजे—म्हंजे गारेचे. बगळ्याच्या रंगाचे. पांढरे. पांढरे. "

" कशाला ? "

" तूं ही छानदार गंमत करतो आहेस, त्यांत ते बसवून दे. "

" ऊं हूं ! "

" कां रे भैय्या ? आणूं दे कीं ! "

" तंग्या, या शेणाच्या स्वोस्तिकांत ते कसे बसतील ? पडून जातील कीं ! "

" पडून जातील ? गच्चम् बसवले तरी ? "

" होय. तूं नाक पूस बघूं अगोदर ! "

मनगटानें नाक फेरकाटून तंगा म्हणाला,

" पण हें सोत्तिक तूं कां काढीत आहेस ? "

" सोत्तिक नव्हे, स्वोस्तिक. घरासमोर स्वोस्तिक असलें, म्हणजे वनदेवाला आवडतें. रात्रीं फुलादेवीबरोबर तो सगळ्या भिल्लांच्या झोंपड्यांत हिंडतो—"

" रात्रीं ? "

" हो. "

" मग आपल्याला कसा दिसत नाहीं ? "

" तूं रात्रीं आईच्या पोटाला चिकटून झोंपलेला असतोस ना ? म्हणून. अन् मी शेकोटीजवळ झोंपीं जातों. तर आपल्याला तो दिसत नाहीं. "

" मग तो काय करतो ? "

" ज्याच्या झोंपडीवर स्वोस्तिक असेल, त्या झोंपडीवरील भोपळ्याच्या वेलाला वनदेवाच्या कृपेनें फुलें येतात—"

" अन् ज्याच्या झोंपडीवर नसेल—"

" त्याच्या झोपडीवरचे भोपळ्याचे वेल सुकून जातात, त्याच्या कोंबडया पटापट मरतात, त्याच्या भात्यांतले बाण बोथट होतात--"

तेवढ्यांत कालिंगाची बहीण आणि आई या दोघी ओढ्यावरून पाणी घेऊन परतल्या. डोईवरून मातीची घागर उतरवून खालीं टेकवीत आई म्हणाली,

" काल्या, अजून तूं इथंच ? वागुरा घेऊन जा. चार ससे मिळाले तर बघ. "

आहे ! म्हणजे हें स्वास्तिक अपुरेंच राहिलें ! कालिंग कुरकुरला,

" हें एवढें पुरें होऊं दे ना आई ! "

" मग संध्याकाळीं खाल काय ? "

" मीं आणले होते ते कंद-- "

" केरकुंडाचे कंद खाऊन उद्यां माझा तंगा आजारी पडला म्हणजे ! त्यांच्याबरोबर कांहीं ओशट नको ? "

कालिंगाची बहीण चूली मोठ्या तन्मयतेनें त्यानें काढलेल्या स्वास्तिकाचें निरीक्षण करीत उभी राहिली होती. ती मध्र्येच बोलली,

" अहा ! कालिंगा, किती छान स्वोस्तिक काढतो आहेस तूं ! पुरें करून कां टाकीनास ! "

" तेंच तर मी म्हणतोंय्-- "

आई चूलीकडे वळून खेकसली,

" मोठी आली धींगरी ! बहीण भाऊ दोघें एकाच मातीचीं घडलीं आहांत ! तरी बरें, तुम्हां दोघांचे बाप एक नव्हते ! स्वोतिक काढून कांहीं खायला मिळत नसतें. जा रे चालता हो ! "

चूली म्हणाली,

" आई, परवांच गांवकऱ्यांनीं एक डुक्कर मारला होता केवढा थोरला, त्यांतला वाटा आणला होता मीं. संपलें कां तें मांस ? "

"केवढा थोरला? एवढेंसें डुकराचें पिल्लूं होतें! धड सुळेही बाहेर पडले नव्हते. त्याचा वाटा किती दिवस पुरायचा? म्हणून तर याला सशांवर धाडलें आहें मी."

लाल लाल डोळ्यांचे, पांढऱ्या कबऱ्या रंगाचे, लांब लांब कानांचे ससे मारणें, ही गोष्ट कालिंगाला अजिबात नापसंत होती. त्या भिल्लांच्या दहावीस इथें तिथें पसरलेल्या घरांतले तरुण भिल्ल वाघुरा घेऊन ससे धरायला बाहेर पडले म्हणजे नाइलाजानें कालिंगाला त्यांच्यावरोबर जावें लागे. मात्र तो त्या धुमाकुळांत कधीं भाग घेत नसे. प्राणभयानें इकडे तिकडे धांवत शेवटीं अचानक वाघुरांत सांपडणाऱ्या त्या चिटुकल्या जीवांच्या डोळ्यांतले भाव जणूं त्याला वाचतांच येत असत. सशांचे दोन्ही कान धरून जेव्हां रांगडे भिल्ल त्यांना हापटून ठार मारीत, तेव्हां कालिंग आपलें तोंड दोन्ही हातांनीं झांकून घेई. त्याला वाटे, नको! नको!

सगळे तरुण भिल्ल त्याला हंसत. वैतागानें त्याची आई म्हणे,

"हें कारटें एखाद्या भिल्लखूला देऊन टाकतें! बरें खापर घेऊन दारोदार हिंडेल तरी!"

ती तरी बिचारी काय करील? या प्रौढ वयांत तंगाचा बाप—तिचा तिसरा नवरा वाघानें खाल्ला. कशीबशी ती तीन नवऱ्यांच्या तीन मुलांना घेऊन दिवस काढीत होती. तशांत कर्त्यासवरत्या कालिंगानें भिल्लाच्या जातीला न शोभणारें असें वर्तन करावें म्हणजे काय!

कालिंग मान खालीं घालून बसून राहिला आहे हें पाहून ती काकुळत करून म्हणाली,

"ऊठ ना रे राजा! ऊठ माझा शहाणा बेटा तो! या टेकुडापलिकडे हिरव्या कुरणांत गेलास, तर हवे तितके ससे मिळतील! तूं मारूं नकोस हवें तर, तंगा मारील. मारशील ना रे?"

तंगा फुरफुरून म्हणाला,

" हो ! भैय्या, तूं नुसता वाघुरा लाव. अन् धांवत जाऊन झुडपांतून ससे हुसक. अन् त्यांना माझ्या इकडे हांकून आण. अन् दुसरीकडे जाऊं देऊं नकोस. अन् त्यांना नीट वाघुरांत घाल. मग मी सोट्याच्या एकेका टोल्यांत त्यांना लंपास करतों बघ ! माझा सोठा ठाऊक आहे ना तुला ? त्यानें मी पावसाच्या दिवसांत आकाशांत गडगड भांडणारे राक्षस सुद्धां मारीन ! मग ससे तर काय, छोटुकलेच असतात ! "

" काल्या, काल्या ! मेल्या जरा धाकट्या भावापासून शीक थोडेसें ! " असें म्हणत आईनें तंगाला उचललें, आणि त्याच्या तोंडावरून हात फिरवून बोटें कानशिलांवर मोडलीं.

शेवटीं निरुपाय होऊन कालिंग वाघुरा घेऊन बाहेर पडला. त्याच्या मागोमाग आपला सोटा घेऊन तंगा निघाला. झाडेंझुडपें पार करीत अन् ओढ्याखोड्यांतून वाट काढीत ते दोघे शेजारची टेकडी चढले, आणि पलिकडील उतारास लागले. वाटेंत उंबराच्या झाडावर भलीं मोठालीं तांबडीं लाल उंबरें लटकलीं होतीं.

कालिंग म्हणाला,

" तंग्या, उंबरें खाऊं या का ! "

" हो हो ! उंबरें मला फार आवडतात. "

कालिंग भर्रदिशीं उंबराच्या झाडावर चढला. तो उंबरें पाडीत जाई. तंगानें वेंचून त्यांचा ढीग घातला. कालिंग उतरूं लागला, हें पाहून तंगा ओरडला,

" कां रे भैय्या, उतरतोस ? ॲहॅ ! वावा ! अरे तीं बघ ! वरल्या फांदीवर किती तरी तांबडींलाल उंबरें आहेत—झुंबाच्या झुंबा आहे त्यांचा. अरे तीं काढ ना ! "

धप्पदिशीं खालीं उडी मारीत कालिंग म्हणाला,

" तंगा, तुला अजून समजत नाहीं. तूं लहान आहेस. "

" लहान ? "

" हो. माझ्याएवढा मोठा हो, म्हणजे तुला बऱ्याच गोष्टी समजायला लागतील. "

" तुझ्याएवढा? पण तूं मोठा कसा झालास? काय युगत केलीस? "

" त्याची एक जम्मत आहे. "

" आम्हांला सांग ना ! "

उदारपणें कालिंग म्हणाला,

" रात्रीं वनदेवाला हात जोडून म्हणावें, वनदेवा, मी तुझ्यासारखी दाढी राखीन. म्हणजे वनदेव भराभर मोठा करतो. मात्र हें कोणाला सांगूं नकोस हां ! "

" नाहीं ! बिशाद ! पण भैय्या, तुला फार गोष्टी माहीत आहेत? "

" होय. बऱ्याच. "

" उंबराचें काय माहीत आहे ? "

हंसून तंगाच्या खांद्यावर एक चापट मारीत कालिंग म्हणाला,

" अरे, कोणत्याही झाडावरचीं सगळीं फळें काढूं नयेत. "

" पण कां ? "

" फुलादेवी रागावते. "

" कां रागावते ? "

" ती म्हणते, कीं हीं फळें सगळ्यांकरितां आहेत. एकट्यानें तीं सगळीं आधाशीपणानें तोडायचीं नाहींत. "

" तोडलीं तर काय होतें ? "

" तीं कडू होतात. "

तंगाचें एवढयानें समाधान झालें. तो एकदम म्हणाला,

" मग आपण यांतलीं कांहीं पुनः झाडाला चिकटवूं या कां ? "

हंसून कालिंग म्हणाला,

" वेड्या, तोडलेलीं फळें पुनः चिकटत नसतात. राहूं दे. आपण उरतील तीं घरीं नेऊं. "

तंगाच्या मनांतला आपल्या भावाविषयींचा आदर वाढला. तो श्रद्धेनें म्हणाला,

" भैय्या, मग तुला फार गोष्टी माहीत असतील ? "

अनुक्रम
विभाग.................
क्रमांक
नों. दि.........
वाचनालय शाखा

" हो. "

" फार म्हणजे खूप ? "

" होय. "

" मग आम्हांला सांग ना ! "

" सांगतों. पण आपण झऱ्यावर जाऊन उंबरें खाऊं. तिथें सांगेन. "

पळसाच्या झाडाचीं पानें काढून कालिंगानें त्यांचा भला मोठा द्रोण केला. त्यांत सगळीं उंबरें भरून ते दोघे मोठमोठे दगड ओलांडीत पाण्याच्या झऱ्यावर पोंचले. झऱ्याच्या तोंडाशीं पालापाचोळा एकत्र झाला होता. तो काढून टाकून कालिंगानें झरा स्वच्छ केला, आणि उपसून काढला. जमिनींतून पाणी भळभळूं लागलें. थोडा वेळ झरा गढूळला, पण मग स्वच्छ नितळ पाण्यानें झऱ्याची कुंडी भरून गेली.

शेजारीं असलेल्या खैराच्या सावलींत ते दोघे बसले. उंबरांच्या द्रोणांतलीं पिकलीं पिकलीं उंबरें काढून तंगाला देत कालिंग म्हणाला,

" खा. "

" तूं नाहीं खात ? "

" मी मग खाईन. तुला भूक लागली आहे. "

उंबरें उलवून त्यांतलीं केमरें काढून टाकीत तंगा म्हणाला,

" आतां सांग ना ! "

" अरे, सशांचा जीव घेऊं नये. "

" तंगा, तुला अजून समजत नाहीं. तूं लहान आहेस. "

" लहान ? "

" हो. माझ्याएवढा मोठा हो, म्हणजे तुला बऱ्याच गोष्टी समजायला लागतील. "

" तुझ्याएवढा? पण तूं मोठा कसा झालास? काय युगत केलीस? "

" त्याची एक जम्मत आहे. "

" आम्हांला सांग ना ! "

उदारपणें कालिंग म्हणाला,

" रात्रीं वनदेवाला हात जोडून म्हणावें, वनदेवा, मी तुझ्यासारखी दाढी राखीन. म्हणजे वनदेव भराभर मोठा करतो. मात्र हें कोणाला सांगूं नकोस हां ! "

" नाहीं ! बिशाद ! पण भैय्या, तुला फार गोष्टी माहीत आहेत? "

" होय. बऱ्याच. "

" उंबराचें काय माहीत आहे ? "

हंसून तंगाच्या खांद्यावर एक चापट मारीत कालिंग म्हणाला,

" अरे, कोणत्याही झाडावरचीं सगळीं फळें काढूं नयेत. "

" पण कां ? "

" फुलादेवी रागावते. "

" कां रागावते ? "

" ती म्हणते, कीं हीं फळें सगळ्यांकरितां आहेत. एकट्यानें तीं सगळीं आधाशीपणानें तोडायचीं नाहींत. "

" तोडलीं तर काय होतें ? "

" तीं कडू होतात. "

तंगाचें एवढयानें समाधान झालें. तो एकदम म्हणाला,

" मग आपण यांतलीं कांहीं पुनः झाडाला चिकटवूं या कां ? "

हंसून कालिंग म्हणाला,

" वेड्या, तोडलेलीं फळें पुनः चिकटत नसतात. राहूं दे. आपण उरतील तीं घरीं नेऊं. "

तंगाच्या मनांतला आपल्या भावाविषयींचा आदर वाढला. तो श्रद्धेनें म्हणाला,

" भैय्या, मग तुला फार गोष्टी माहीत असतील ? "

" हो. "

" फार म्हणजे खूप ? "

" होय. "

" मग आम्हांला सांग ना ! "

" सांगतों. पण आपण झऱ्यावर जाऊन उंबरें खाऊं. तिथें सांगेन. "

पळसाच्या झाडाचीं पानें काढून कालिंगानें त्यांचा भला मोठा द्रोण केला. त्यांत सगळीं उंबरें भरून ते दोघे मोठमोठे दगड ओलांडीत पाण्याच्या झऱ्यावर पोंचले. झऱ्याच्या तोंडाशीं पालापाचोळा एकत्र झाला होता. तो काढून टाकून कालिंगानें झरा स्वच्छ केला, आणि उपसून काढला. जमिनींतून पाणी भळभळूं लागलें. थोडा वेळ झरा गढूळला, पण मग स्वच्छ नितळ पाण्यानें झऱ्याची कुंडी भरून गेली.

शेजारीं असलेल्या खैराच्या सावलींत ते दोघे बसले. उंबरांच्या द्रोणांतलीं पिकलीं पिकलीं उंबरें काढून तंगाला देत कालिंग म्हणाला,

" खा. "

" तूं नाहीं खात ? "

" मी मग खाईन. तुला भूक लागली आहे. "

उंबरें उलवून त्यांतलीं केमरें काढून टाकीत तंगा म्हणाला,

" आतां सांग ना ! "

" अरे, सशांचा जीव घेऊं नये. "

अनुक्रम
विभाग............
नों. दि.......
वाचनालय शाखा.

" अन् मग खायचें काय ? "

" वनदेवानें आपल्यासाठीं दुसऱ्या पुष्कळ वनस्पती केल्या आहेत–"

" म्हणजे आपल्या दोघांसाठीं ? "

" सगळ्यांसाठीं. त्या खाव्यात. कुणाचा जीव घेऊं नये. "

" पण सगळे तर घेतात ! "

पालथा पडून कालिंग एका काडीशीं खेळत होता. खेळ थांबवून तो म्हणाला,

" तंगा, तूं त्या दिवशी ओंडलनें आणलेलीं सशाचीं पिल्लें बघितलींस ? "

" हो ! किती छोटुकलीं होतीं ! "

" त्यांची आई ओंडलनें रानांतच ठार मारली होती. तीं पिलें त्या मेलेल्या आईला दुधासाठीं लुचत होतीं. मेलेल्या सशीला दूध कसें येईल ? पण त्या बिचाऱ्यांना कळत नव्हतें. तीं गरगरा तिच्याभोंवतीं धांवत होतीं. तिच्या कुशींत शिरत होतीं. रोज मोठ्या प्रेमानें आपल्याला जवळ घेणाऱ्या आईला आज काय झालें आहे, तें त्यांना कळत नव्हतें. भोंवतीं किती तरी माणसें जमलीं होतीं. पण त्या गोजिरवाण्या पिलांना त्या माणसांचें भय वाटत नव्हतें. चींचीं करीत तीं लाल डोळ्यांचीं पांढरीफेक छोटुकलीं पिल्लें आईच्या ऊबेंत शिरायला धडपडत होतीं ! "

" हो भैय्या हो ! मी त्यांच्या अगदीं जवळ उभा होतों. ? "

" पण ओंडलनें काय केलें माहीत आहे "

" चूलीनें मला हांक मारली, म्हणून मी घरीं गेलों. काय झालें ! "

" त्या भल्या माणसानें आग पेटवली. मग त्या कोंवळ्यांना त्यानें जिवंत असतांच आगींत टाकलें ! "

तंगा उंबरें खाणें विसरला. श्वास रोखून तो म्हणाला,

" मग "

" मग काय ? म्हाताऱ्या चोंगरायनें त्याची बरीच खरड काढली.

पण ओंडल दांत काढीत म्हणाला, कीं वनदेवानें ससे आमच्यासाठींच केले आहेत. त्यांना मारून भाजलें काय, अन् जिवंत भाजलें काय ! एवढें बोलून ओंडल आभाळ गडगडावें तसा हंसला. ”

तंगाला ओंडलचा फार राग आला. त्याच्या नांवानें एक धोंडा फेंकीत तो म्हणाला,

“ ओंडल फार वाईट माणूस आहे ! ”

“ कां ? ”

आश्चर्यानें भावाकडे पहात तंगा म्हणाला,

“ कां ? त्यानें सशाचीं पिलें मारलीं— ”

“ तूंही तर सोट्याच्या एका टोल्यानें ससे ठार मारणार होतास ! ”

खर्रकन् तंगाचें तोंड उतरलें तो उठला, आणि धांवत जाऊन कालिंगाच्या पाठीशीं तोंड दडवून आणि दोन्ही हात त्याच्या गळ्यांत घालून मुसमुसूं लागला. कालिंगानें त्याला मोठ्या स्नेहानें जवळ घेतलें आणि म्हणाला,

“ माझा तंगा फार चांगला आहे ! ”

थोडा वेळ तंगा कालिंगाच्या गळ्यांत बांधलेल्या मुळीशीं चाळा करीत राहिला. मग कालिंग त्याला बोलला,

“ चल, आपण कंद शोधूं या. ”

ते दोघे उठले. टेकडीवरून वाहाळ खालीं धांवत होते. त्यांनींच पुढें ओढ्यांचा आकार घेतला होता. दोन ओढयांच्या मध्यभागीं थोडी सपाट जमीन होती. तिच्यांत उगवलेल्या गवताची हिरवाळी अजून मोडली नव्हती. गवताचे तुरे वर डोकावत होते. त्यांच्यांत कंदांचीं पानें झांकून गेलीं होतीं.

कालिंग आणि तंगा त्या हिरवळींत कंद शोधीत हिंडूं लागले. तंगाच्या सोट्याचें टोंक शेवटलेलें होतें. त्या टोंकानें तंगा कंदांभोंवतींची

जागा खणून काढूं लागला. कालिंग ओरडला,

" सांभाळून ! कंदाला धक्का लागेल ! "

तेवढ्यांत एका वाहाळाच्या खोंगळींतून एक वृद्ध भिख्खु सावकाश हिरवळीवर चढला. या टेकडाच्या एका अंगाला एक गुहा होती. तींत कधींकधीं बौद्ध भिख्खू येऊन रहात. चार आठ दिवस तिथें स्वस्थ मनानें चंक्रमणादि साधना करून मग ते पुढें निघत.

भिख्खु या दोन मुलांजवळ येऊन उभा राहिला. तंगा बावरून कालिंगाच्या मागें जाऊन लपला. तिथून तो चोरट्या जिज्ञासेनें भिख्खूकडे पाहूं लागला. स्मित करीत भिख्खु म्हणाला,

" पुत्तांनो, तुम्ही काय करीत आहांत ? "

" आम्ही कंद खणीत आहोंत."

" त्या वागुरा–जीवहत्या करायचे ते पाश तुम्हीं कशासाठीं बाळगले आहेत ? "

कालिंग थोडा गोंधळला. पण मग तो म्हणाला,

" आम्ही ससे धरणार होतों. "

" मग ? "

" आतां ते धरूं नयेत, असें आम्हीं ठरविलें आहे. ते लहानगे जीव मोकळ्या मनानें या हिरवळीवर बागडूं देत. आम्ही आतां त्यांना मारणार नाहीं. "

आश्चर्यानें भिख्खु म्हणाला,

" पुत्ता, हें तुला कोणीं शिकविलें ? "

" कोणी ? कोणींहि नाहीं. हें मलाच सुचलें. "

स्नेहाळ मुद्रेनें त्याच्या मस्तकाला स्पर्श करीत भिख्खु म्हणाला,

" पुत्ता, तथागत बुद्धही असेंच म्हणाला होता. सर्व भूतमात्रांवर आईसारखें प्रेम करावें ! "

गंभीर स्वरांत भिक्खु गाथा गाऊं लागला,

माता यथा नियं पुत्तं आयुसा एकपुत्तं अनुरक्खे ।
एवम्पि सब्बभूतेसु मानसं भावये अपरिमाणं ॥

****

## प्रकरण दुसरें

त्या वनप्रदेशांतलें जीवन शांत होतें. तिथें कोणतीही राजसत्ता चालत नसे. तरी विंध्याच्या उत्तरेस पसरलेल्या भल्या थोरल्या मैदानांत मात्र खूप उलाढाली सुरू होत्या.

हिमालयाच्या उत्तरेस असणारा भला मोठा प्रदेश अगदीं उजाड. नुसतें माळरान. शेळ्या अन् मेंढ्या चारण्यापुरतें. खण्डीभर पेरलें तर मणभर उगवायचें. मैल न् मैल नुसत्या कांटेरी जाळ्या पसरलेल्या उदासवाण्या, भयाण.

त्या भयाण मुलखांत शक नांवाची जमात रहायची. रहायची म्हणजे भटकायची. आज इथें तर उद्यां तिथें. उंच, धिप्पाड घोड्यांवर बसून त्यांची भटकंती सुरू असायची. नापीक मुलखांत राहणारे लोक. लढणें, माराठोकी करणें, एवढाच उद्योग. भाला अन् धनुष्यबाण हीं शस्त्रें. हीं शस्त्रें वापरण्यांत मात्र शक मोठे वाकबगार.

या शस्त्रांच्या बळावर जगायचें. ज्याच्या मनगटांत अधिक ताकत, तो जगेल. अशक्त असेल, त्यानें मेलें पाहिजे. मग त्याचा घोडा, सामान, बायको, मुलें, हें सगळें जिंकणाराच्या मालकीचें !

लढाई ही फार आवडती गोष्ट. त्या लढाईत जो पहिला शत्रु मारला जाईल, त्याचें रक्त प्याला, म्हणजे मग त्या शकाची योद्ध्यांत गणना व्हायची ! एवढ्यानेंच भागलें नाहीं. त्या पहिल्या शत्रूची कवटी बरोबर वागवायची. तिच्यांतून दारू प्यायची, अन लढाई जिंकल्याचा

आनंदोत्सव साजरा करायचा !

हें झालें ज्याच्या त्याच्यापुरतें. टोळीचा नायक असेल, त्याला नजराणा दिला पाहिजे ना ! मारलेल्या शत्रूंचीं मुंडकीं, हा नजराणा ! जो नायकाला अधिक मुंडकीं नजर करील तो मोठा. अन् ज्याच्या घोड्यावर ठार मारलेल्या शत्रूच्या शरिराचें कमावलेलें कातडें पांघुरलेलें असेल, तो फार मोठा !

जसे भक्त, तसा त्यांचा देव. त्याचें नांव हुव. तो माणसाच्या रक्तानें प्रसन्न व्हायचा. त्याला माणसाच्या मेंदूंचा नैवेद्य दाखवावा लागायचा. हें असलें अघोचर केल्याशिवाय देवाची पूजाच व्हायची नाहीं !

असें त्या शकांचें जीवन. दया नाहीं, क्षमा नाहीं, लाज नाहीं, भय नाहीं, संकोच नाहीं ! जिकडे तोंड वळेल, त्या दिशेला विध्वंस करीत जायचें. जाळीत जायचें. लोकांचें सुखाचें जीवन नष्ट करीत जायचें. नाश हा शकांचा आनंद. उजाडपणा हें शकांचें सुख. शकांच्या सैन्याबरोबर घारी अन् गिधाडें यांच्याही झुंडी असायच्या. अगोदर शकांचीं भयाण पाउलें कोणत्याही देशांत पडलीं कीं त्यांच्यामागोमाग घुबडांचें साम्राज्य व्हायचें !

अशा त्या शकांची धाड भारताच्या वायव्येकडील प्रान्तापर्यंत आली, अन् एका ढगांनीं अंधारलेल्या दिवशीं त्यांनीं भारतांत प्रवेश केला !

हा देश नद्यांचा. हिमालयांतलें अपार पाणी बरोबर घेऊन गंगा, यमुना, सिंधु अन् ब्रह्मपुत्रा या प्राणवाहिन्या भारताचीं शेतें भिजवीत सागराकडे वहायच्या. त्यांच्या तटींचा सगळा प्रांत अपार सुपीक. मोत्यें पेरलीं तर उगवतील असा. नानापरींचीं फळें, भाज्या, धान्यें, चंदन, मरवा असें सगळें अपार निर्माण व्हायचें. भल्या मोठाल्या कांसा

असलेल्या गाई मोकळ्या मनानें चरायच्या. त्या गाईंच्या दुधानें, गंगा-तटाकींच्या अन्नानें या देशचीं माणसें जगायचीं. सुखाला उणें नाहीं. समृद्धीला तोटा नाहीं. श्रीहरीचीं गीतें गायचीं. त्याच्या चरणीं लीन व्हायचें. त्या रंगांत रंगून जायचें. नाचायचें. मोगरीच्या माळा लेऊन, सर्वांगाला चंदन माखून.

हे लोकही लढत, पण ह्यांचें लढणें अन्याय दूर करण्यासाठीं. अपमानाचा सूड घेण्यासाठीं. गरिबांच्या रक्षणासाठीं. या कामासाठीं हेही शस्त्रें चालवींत. पण यांच्या पूर्वजांचा बाणा असा कीं, दिवसभर कसोशीनें लढायचें अन् संध्याकाळ झाली कीं शत्रूच्या गोटांत जाऊन त्यांच्या जखमा धुवायच्या !

अशा या देवांच्या देशांत शक शिरले. त्यांच्या घोड्यापुढें उडणारी धूळ रक्ताचा लेप चढून लाल झाली होती. त्यांच्या हातांतल्या भाल्यांच्या टोकांवर शत्रूंचीं मुंडकीं होतीं. गेले तिथें त्यांनीं विध्वंस पेरला. मग त्या विध्वंसाला सर्वनाशाचें पीक आलें. त्याच सर्वनाशाचें वारें त्यांच्याबरोबर भारतांत आलें !

त्यांनीं पंजाब प्रांतांत आग लावली. मग ते मथुरेपर्यंत शिरले. एका बाजूला खालीं गुजराथपर्यंत त्यांनीं पाय पसरले, तर दुसरीकडे माळव्यापर्यंत.

हा एवढा सुपीक देश त्यांनीं कधींच पाहिला नव्हता. एवढें अपार पाणी त्यांना ठाऊक नव्हतें. एवढ्या मोठ्या गाईबैलांचीं तर त्यांनीं चित्रेंही बघितलीं नव्हतीं.

मग हें या देशाचें धन त्यांनीं मनाला येईल तसें उधळलें. राखावें ही बुद्धीच नाहीं. भरपूर सांपडलें आहे ना ? मग नासावें. नष्ट करावें. त्यांत आनंद. त्यांत सुख. त्यांत संतोष.

एवढया दूर यायचें असल्यामुळें शकांनीं बायकामाणसें बरोबर

आणलींच नव्हतीं. करायचीं काय ! जिथें जाऊं तो देश कांहीं ब्रह्म-चाऱ्यांचाच तर नाहीं ना ? मग झालें तर. अन् युद्धांत ठार मारले-ल्यांचीं बायकामाणसें आपलींच कीं ! सहज न मिळालीं तर कांहीं लोकांना ठार मारूं म्हणजे त्यांच्या बायका ओढून आणतां येतील !

भारताचे पुत्र शूर खरे. पण त्यांना या नतद्रष्टांची ओळख नव्हती. त्यामुळें पहिल्या सपाट्याला शकांनीं जी धडक मारली, तिनें या देशां-तल्या राजवटी ढासळल्या. नगरें उधळलीं. आश्रम मोडले. जनता रानोमाळ झाली. नागरिकांनीं वनांत आसरा घेतला. भलीं भलीं घराणीं पांगलीं. आई इकडे तर लेकरूं तिकडे. बाप या जागीं, तर मूल त्या जागीं. नवरा इथें तर बायको पित्या लेंकराला घेऊन तिथें.

ही धाप थेट उज्जयिनीला अन् विंध्यपर्वताच्या कुशींतल्या नर्मदा-तटाकालाही जाणवली.

कालिंग, तंगा अन् चूली—तिघेंजण नर्मदेला मिळणाऱ्या एका बारक्या नदीच्या कांठीं सांवलींत बसलीं होतीं. कालिंगानें मोठ्या यत्नानें चूलीसाठीं एक फणी केली होती. चूली त्या फणीनें केस विंचरीत होती. विंचरतां विंचरतां एकदम थांबून ती म्हणाली,

" कालिंगा, तूं आणखी एक फणी करशील ? "

" कशाला ? "

" हवी आहे. "

" कुणासाठीं ? "

चूली लाजली. शेजारच्या वस्तींतला एक रांगडा भिल्ल त्या दिवशीं एक भला थोरला डुक्कर खांद्यावर घेऊन गमतीनें चालला होता. चूलीच्या झोंपडीजवळ थांबून त्यानें पाणी मागितलें होतें. त्याला पाणी देऊन चूलीनें त्याला विचारलें होतें,

" हा एवढा थोरला डुक्कर तूं एकट्यानें उचललास ? "

तिच्याकडे पहात तो भिल्ल हंसत म्हणाला होता,

"हो! आणखी तुला सुद्धां उचलून नेईन! येत्येस?"

त्या वेळीं चूली झोंपडींत पळाली होती. मात्र तो भिल्ल तिला आवडला होता. तोही त्यांनंतर दोनचारदां उगीचच तिच्या झोंपडीसमोर



रेंगाळला होता. त्याचे केंस मोठमोठे होते. पण ते सगळे एकांत एक गुंतलेले होते. चूलीचा विचार होता, कीं एखादी चांगली फणी मिळाली तर ती त्याचे केस विंचरून देईल.

ती कांहीं बोलत नाहीं, असें पाहून कालिंगानें पुनः विचारलें,

" कशाला तें सांगितलें नाहींस ! "

एवढ्यांत इतका वेळ रानबोरें खात असलेल्या तंगाला जाग आली. तो उचकून म्हणाला,

" भैय्या, चल ! "

" कुठें ? "

" आपण मासे पकडूं ! "

" छे रे बुवा ! "

" अरे चल कीं ! चूलीच्या लुगडयाच्या पदरानें आपण पाणी अडवूं."

" ऊं हूं ! मी नाहीं जा ! " चूली लाजून म्हणाली.

आश्चर्य ! तो भिल्ल रांगडा दिसल्यापासून चूली बरीच लाजायला लागली आहे. त्या दिवशीं तर ती अन् तंगा दोघांनीं तिच्या लुगड्याच्या पदरानेंच चिंगळ्या पकडल्या होत्या !

तंगा उठून म्हणाला,

" नाहीं तर नाहीं ! मी एकटाच पकडतों. "

चूलीनें विचारलें,

" कशा ? "

" एका जमतीनें. "

" पण सांग कीं ! "

" तें पाणगवत उगवलें आहे ना ? तिथें बारक्या बारक्या मासळ्या असतात. छोटुकल्या. त्या कोंपऱ्यांत कोंडायच्या. अन् एखादी मासोळी हातांत आली, कीं गप्पदिशीं ओंजळ मिटायची ! ही अशी–"

" मग मीही येत्यें कीं रे ! "

" चल ना ! "

चूली अन् तंगा दोघें जणें मासोळ्या पकडायला धांवलीं. कालिंग

मात्र तिथेंच पालथा पडून जमिनीवर रेघोट्या काढीत राहिला. मासोळ्या पकडल्यावर त्यांची जी तडफड होई ती त्याला पाहवत नसे.

ऊन्ह इकडलें तिकडे ढळलें. कालिंगाच्या डोईवरली सावली बाजूला गेली म्हणून तो उठून बसला. तों त्याला एक आश्चर्य दिसलें !

एक गोरागोरासा म्हातारा एका मुलीच्या खांद्यावर हात ठेवून नदीच्या पलीकडून या तीरावर येत होता. मुलगी चूलीच्याच वयाची होती. एखाददोन वर्षे मोठी असेल. म्हातारा फाटलेलें पण उंची धोतर नेसला होता. बाकी अंग उघडें होतें. डोईवर पांढरे भरपूर केस होते. पांढरीफेक दाढी होती. तो म्हातारा कालिंगाला एकदम आवडला. त्याला वाटलें, म्हाताऱ्याला कुठें जायचें तें विचारावें. ताडकन् उठून तो पुढें झाला.

कालिंगाला म्हाताऱ्याकडे जातांना पाहून मग मासोळ्या धरण्याचा उद्योग सोडून चूली अन् तंगाही त्याच्यामागें निघालीं. त्यांच्या मुद्रांवर थोडें आश्चर्य होतें, थोडा संकोच होता.

म्हातारा व मुलगी दोघें पाण्यांतून बाहेर आलीं. म्हातारा म्हणाला, "स्वर्णमयी, थोडें थांबूं या आतां."

"दमलांत का बाबा ?"

"दमलों ? हो—दमलोंच तर काय !"

मग तीं दोघें तिथेंच एका खडकावर बसलीं. हें पाहून कालिंग पुढें झाला. त्यांना काय विचारावें, तें त्याला अगोदर सुचेना. पण शेवटीं तो म्हणाला,

"कुठें निघालांत ?"

हें वाक्य कांहीं त्यानें मोठ्या शुद्ध भाषेंत उच्चारलें नव्हतें. तरी त्याच्या स्वरांतला जिव्हाळा म्हाताऱ्याला जाणवला. कपाळावर हात ठेवून कालिंगाकडे पहात म्हातारा म्हणाला,

" कुठें ? आश्रय मिळेल तिथें—कुठेंही ! "

त्याचें बोलणें कांहीं कालिंगाला उगमलें नाहीं. तो म्हाताऱ्याच्या तोंडाकडे पहात राहिला. पण म्हातारा त्याच्याकडे न पाहतां बोलूं लागला.

" त्या हिंस्र श्वापदांच्या पासून दूर कुठें तरी ! ज्यांना दया नाहीं, माया नाहीं, आई नाहीं, बहीण नाहीं–पशु ! पशु ! "

कालिंगाला वाटलें कीं, यांना एखाद्या वाघानें अडविलें असावें. तो म्हणाला,

" या जंगलांत वाघ फार आहेत. तुम्हांला कुठें भेटला वाघ ? "

म्हातारा उदासवाणें हंसून म्हणाला,

" मुला, तूं फार चांगला आहेस. अरे, वाघही भूक लागल्याशिवाय जनावर मारीत नाहीं. पण जे कारण नसतां माणसें मारतात–खेळ म्हणून–! "

आतां चूली आणि तंगा कालिंगाच्या पाठीशीं येऊन उभीं राहिलीं होतीं. कालिंगाला जसें म्हाताऱ्याचें बोलणें कळलें नाहीं, तसें त्या दोघांनाही कळलें नाहीं. तंगा हळूच कालिंगाला म्हणाला,

" भैय्या, या म्हातारबाबाला लांडगा चावला काय ? तुला चावला होता– "

" गप्प रे ! "

स्वर्णमयीला तशा स्थितींतही हंसूं आलें. ती म्हाताऱ्याकडे वळून म्हणाली,

" बाबा, तुमचें बोलणें यांना कळलें नाहीं."

चमकून म्हातारा म्हणाला,

" नाहीं ? "

" ऊं हूं ! "

कालिंगाला म्हातारा बोलला,

" मुला, तुला शक माहीत नाहींत ? "

शक म्हणजे काय तें कालिंगाला ठाऊक नव्हतें. तो म्हणाला,

" शक ?– "

" नाहींत, तुला माहीत नाहींत. मुला, तूं फार सुखी आहेस."

हेंही त्या तिघांना कळलें नाहीं. त्यांच्या अवघडलेल्या मुद्रा पाहून म्हातारा म्हणाला,

" मी सांगतों–मुला, मी सांगतों. ही बघ माझ्या छातीवर भाल्याच्या घावाची खूण आहे. या स्वर्णमयीच्या थोरल्या बहिणीला त्या श्वापदांच्या हातून वांचवायचा निष्फळ प्रयत्न करीत होतों, तेव्हां त्यांनीं ही आपली ओळख ठेवली आहे. "

क्षणभर थांबून म्हातारा आवंढा गिळून म्हणाला,

" मुला, तुझें नांव काय ? "

" कालिंग. "

" कालिंगा, माझें नांव शिवदत्त. मी असा वृद्ध, अन् ही माझी जिवाभावाची एकमात्र ठेव–माझी स्वर्णमयी ! शकांच्या हातून निसटूं शकलेलीं आम्हीं दोघंच–! पण मी कां पळालों ? माझ्या रत्नमयीला सोडून मी कां पळालों ? बाळ रत्ना, तूं कुठें आहेस ? कुठें ? "

म्हातारा अत्यंत कावराबावरा होऊन उभा राहिला. स्वर्णमयीनें त्याला धरून विचारलें,

" बाबा, तुम्ही असें कां करतां ? "

" कां करतों ? असें कां करतों ? तर मग काय करूं ? "

त्याला मिठी मारून स्वर्णमयीनें त्याच्या छातींत तोंड लपविलें, आणि ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

या वेळीं पुढें झाली चूली.

चूलीचा वर्ण काळा होता, स्वर्णमयीचा गोरा. चूलीच्या अंगावर अगदीं तोकडीं दारिद्री वस्त्रें होतीं, स्वर्णमयींचीं वस्त्रें मळलीं आणि कांट्याकुट्यांनीं फाटलीं असलीं तरी चांगलीं उंची होतीं. चूली एक अडाणी भिल्लकन्या होती, तर स्वर्णमयी नगरांतील सुसंस्कृत मुलगी होती.

पण चूलीनें स्वर्णमयीचा बाहु धरून तिला जवळ ओढलें. आपण हें कां करतों, हें तिचें तिलाही कळलें नाहीं. पण स्वर्णमयीचें दुःख पाहून ती वनकन्या विरघळली. स्वर्णमयीला तिच्या स्पर्शांतला जिव्हाळा जाणवला. तिनें म्हाताऱ्यासं सोडून चूलीच्या कुशींत तोंड लपविलें. चूली तिच्या पाठीवर हात फिरवीत उभी राहिली.

कालिंग म्हाताऱ्याकडे गेला. त्यानें म्हाताऱ्याला धरून खडकावर बसविलें. मग तो मऊ शब्दांत म्हणाला,

" बाबा, शक म्हणजे काय हें मला समजत नाहीं. एवढें मला कळलें, कीं तुम्हांवर मोठें संकट आलें आहे. पण आतां तुम्हीं आमच्या गांवांत आलां आहांत. इथें तुम्ही खुशाल राहूं शकाल. शक इथें येणार नाहींत. "

शिवदत्त मान हालवीत म्हणाला,

" मुला, हिमालयाच्या पलीकडून आलेले ते दैत्य कुठेंही जाऊं शकतात. त्यांची टोळधाड आली, कीं कोणताही देश त्यांच्या तावडीं-तून सुटूं शकत नाहीं. "

" कुठेंही ? "

" होय, कुठेंही. शकांचे घोडे मैलभर रुंदीची धुळीची भिंत उठवीत धावूं लागले, कीं त्या देशांतल्या वस्तींचा चुराडा होतो. त्यांचे भाले तळपूं लागले कीं आमच्या तरवारी उण्या पडतात. त्यांच्या बाणांचा वर्षाव होऊं लागला, कीं सगळें आकाश अंधारून जातें. सगळीकडे

मरणाची छाया पसरते !"

"पण या देशांत ते कसे येतील ? या वनांत— "

"मुला, ते तर हिमालयासारखी भिंत ओलांडून अलीकडे आले आहेत !"

"तरी या जंगलांत फार दाट झाडी आहे. त्यांचे घोडे इथें कसे धांवतील ?"

म्हातारा क्षीणपणें हंसून म्हणाला,

"कालिंगा, ठेंगण्या बांध्याचे, चौकोनी तोंडांचे शक अजून मैदानांतच लुटालूट करण्यांत गुंतले आहेत. जर त्यांनीं या वनांत प्रवेश करायचा म्हटलें, तर त्यांचे घोडे त्यांना कुठेंही नेऊं शकतात."

थोडा वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं. मग कालिंग म्हणाला,

"बाबा, तुमचें घर—"

"मुला, माझें घर उज्जयिनीजवळ क्षिप्रातटाकीं होतें रे ! घर होतें, शेतें होतीं, गाई होत्या, तुझ्यासारखा शूर पुत्र होता, द्रव्य होतें, समृद्धि होती, पण आतां जगाच्या पाठीवर आम्ही दोघेंच आहोंत. घर नाहीं, आश्रय नाहीं ! या तुझ्या वनांतल्या लांडग्यांशीं अन् तरसांशीं झुंजत आणि वाघांच्या आरोळ्या ऐकत या माझ्या स्वर्णमयीला घेऊन इथवर आलों आहें. आतां आसरा मिळेल तें आमचें घर !"

"बाबा, आमची झोंपडी तुम्हांला चालेल का ?"

"कालिंगा, तूं तुझ्या परसांत झाडाखालीं आसरा देशील, तर तो सुद्धां चालेल."

कालिंग उठून उभा राहिला. तो म्हणाला,

"चूली, हीं दोघें आपलीं पाहुणीं आहेत. स्वर्णमयीला घेऊन घराकडे चल."

तो म्हाताऱ्याकडे वळून म्हणाला,

" चला बाबा ! "

म्हातारा थरथरत बोलला,

" माझ्या मुला, तूं खरोखरच आम्हांला तुझ्या घरीं नेत आहेस काय ? "

" होय. "

" मुला, तूं फार मोठा आहेस ! किती मोठा तें तुलाही माहीत नाहीं. मलाही नाहीं ! चल ! "

तीं चौघें पुढें चाललीं. तंगाला वाटलें, कीं आपणही कांहींतरी करावें. तो म्हणाला,

" म्हातारबुवा, तुम्ही मासे खातां काय ? "

स्वर्णमयीला तो प्रश्न ऐकून हंसूं आलें. ती म्हणाली,

" तुझ्याजवळ आहेत काय ? "

मांडी ठोकीत फुशारकीनें तंगा म्हणाला,

" हो ! तीन चिंगळ्या मघाशींच पकडल्या. त्यांतली एक पळून गेली, पण— "

स्वर्णमयीनें कौतुकानें तंगाला आपल्याजवळ घेतलें.

****

## प्रकरण तिसरें

त्या वन्य भिल्लांच्या घरीं स्वर्णमयी आणि शिवदत्त या दोघांचे दिवस बरे चालले.

तसें पाहिलें तर म्हाताऱ्याचें आजपर्यंतचें आयुष्य अत्यंत सुखांत गेलें होतें. स्वर्णमयी जन्मली तेव्हांपासून तिला वन म्हणजे काय असतें तें ठाऊक नव्हतें श्रीमंत पित्याच्या घरीं, साजणी अन् गडणींच्या बरोबर खेळतां खेळतां तिचे दिवस इतके गेले. पित्याचा वाडा सोडून ती कुठें बाहेर पडलीच, तर देवदर्शनाला— अधिकांत अधिक पित्याच्या शेतांत गव्हाच्या ओंब्या खायला.

पण आतां तिला ऐन गहन वनांत भिल्लांच्या घरीं रहावें लागलें होतें. वस्त्रें नाहींत, धड अन्न नाहीं, रहायला तुटकी झोंपडी, तीही एवढीशी ! पण स्वर्णमयी शहाणी होती. भिल्लांचीं शरीरेंच काय तीं काळीं अन् जून जरड. पण या काळ्या शरिरांच्या आंत केवढें मोठें मन आहे, याचा प्रत्यय स्वर्णमयीला आला. मग क्लेशांचें तिला कांहीं वाटेनासें झालें.

कालिंगानें आणि चूलीनें या दोघांना घरीं आणलें, तेव्हां त्यांना पहायला सगळा गांव गोळा झाला. हें पाहून कालिंगाची आई मोघा थोडीशी बावरली. कालिंगाला एकीकडे घेऊन ती म्हणाली,

"काल्या, हें विघ्न तूं कशाला घरीं आणलेंस ! हीं कोण आहेत ?"

कालिंगानें जेव्हां त्या दोघांची कथा तिला सांगितली, तेव्हां तिचेंही

मन द्रवलें. ती म्हणाली,

" बिचारीं ! पण आतां यांनीं खायचें काय ? "

" हें काय विचारत्येस आई ? "

" न विचारूं तर काय करूं ? म्हाताऱ्याला का फळेंमुळें गोळा करायला धाडायचें ? अन् ती मुलगी तर बिचारी किती नाजूक आहे ! हिच्यानें रानांत हिंडून फळें तोडणें कसें व्हायचें ? "

कालिंग ताठ उभा राहून म्हणाला,

" असूं दे आई. तूं ती चिंता करूं नकोस. मी आहें ना ! "

" तूं ? "

" कां ? असें कां विचारत्येस ? "

" अरे, आमच्यासाठीं तुला शिकारीला धाडलें, तर तूं रानांतलीं फुलें गोळा करीत हिंडतोस. तुझ्याजवळ जरी डुक्कर किंवा हरिण येऊन तुला म्हणाला, कीं माझ्यावर घाव घाल, तर तूं त्याला कुणाच्या दृष्टीस न पडतां पळून जायला सांगशील ! तूं यांच्यासाठीं अन्न आंणणार ? "

" तूं बघ तर आई ! "

कालिंग आईला घेऊन म्हाताऱ्याकडे गेला. तिला पुढें करून तो म्हणाला,

" बाबा, ही माझी आई. "

मोघा म्हणाली,

" बाबा, घरधनी दिवा विझवून गेला. पण आतां माझा काल्याच घरधनी. तुम्ही आमच्या घरीं खुशाल रहा. तुम्हांला कोणी त्रास द्यायला यायचें नाहीं इथें. "

तोंच म्हातारा चोंगराय पोरांना बाजूला सारीत अन् तिथें जमलेल्या बायकांवर ओरडत झोंपडींत आला. तो या दोघांकडे निरखून पहात म्हणाला,

" काय मोघे, बरी आहेस ना ? पाहुणे कोण ?"

मोघानें चोंगरायाला आंत बोलाविलें. तिथें कालिंगानें त्याला सगळें सांगितलें. मान हालवीत चोंगराय म्हणाला,

" बेट्या काल्या, तूं तरी उडदाचाच मुलगा ! बापाला शोभेल असेंच केलेंस. तुझा बाप असाच गांवासाठीं वाघराशीं झुंजतांना मेला. "

मग चोंगराय बाहेर आला. तो म्हाताऱ्याला म्हणाला,

" जय हर बावाजी ! तुम्ही इथें रहा बरें कां ! खुशाल रहा. तुम्हांला औषधें माहीत आहेत का ? माझी पाठ अलीकडे फार दुखते. वाघाची चरबी लावूनही बेटा गुण कांहीं आला नाहीं. नाहीं माहीत ? नसलीं औषधें तर नसूं द्या ! आतां चरबी पहायला सांगितली आहे मीं ! मुलगी तुमची धाकटी वाटते ? चांगली आहे. हिच्या अंगावर कुठें गोंदलें नाहीं तें ? आमची चूली पहा ना ! सगळ्या अंगावर निळे ठिपके —नाहीं नाहीं ! नसूं द्या ! त्यामुळें कांहीं बिघडत नाहीं. तुम्ही रहा इथें—"

चोंगरायची टकळी थांबतां थांबेना. मग मध्येंच कालिंग म्हणाला,

" बाबा, हे आमचे मुखिया—चोंगराय ! "

" हे लोक मानतात म्हणून मी मुखिया बरें का बावा ! एऱ्हवीं कोण कोणाला विचारतो ? तंबाखू ओढतां का ? असेलच जवळ-नाहीं, नसली तर नसूं द्या-"

मोघा म्हणाली,

" चोंगाभैय्या, कुठून तंबाखू राहणार बिचाऱ्याजवळ ? जीव वांचवून वाघालांडग्यांच्या तावडींतून इथवर आले हेंच भाग्य ! "

" खरें आहे, खरें आहे ! या रानचे वाघ बेटे फार बिलंदर ! माणसाचा वास लागला कीं त्याचा पिच्छा कांहीं सोडीत नाहींत—"

कालिंगाला अवघडल्यासारखें झालें. तो म्हणाला,

“ चोंगाबाबा, हीं दोघें थकून आलीं आहेत– ”

“ असें असें ! तर मग मी जातों. एः ! चला रे ! इथें काय वाघ धरून आणला आहे काय कुणीं ? माणसासारखीं माणसें. काय पहा-यचें त्यांना ? चला, नाहीं तर पांठीवर एकेक शिपटी ओढीन ! चला घरोघर ! ”

चोंगरायनें सगळीं माणसें हांकून नेलीं, तेव्हां जरा झोंपडी मोकळी झाली. स्वर्णमयी अन् चूली बाहेर ओट्यावर बसल्या. शिवदत्ताला कालिंगानें आंतच चटई टाकून दिली.

रात्रीं मध आणि मक्याच्या भाकरी असें जेवून कालिंग अन् शिवदत्त बराच वेळ शकांच्या घोडदौडीविषयीं अन् भालाफेकीविषयीं बोलत बसले. आईचें न ऐकतां तंगा कालिंगाच्या कुशींत कोपर रोवून त्यांचीं बोलणीं ऐकत राहिला. थोड्या वेळानें कालिंगाच्या मांडीवरच तो झोंपी गेला.

दुसरे दिवशीं स्वर्णमयी चूलीला म्हणाली,

“ चूली, चल, आपण रानांत जाऊं. ”

“ कशाला ? ”

“ फळें आणायला. ”

“ नको. ”

“ कां ग ”

“ कालिंगा आणील कीं ! ”

“ एकटा कालिंग ? ”

“ एकटा कशानें ? तंग्या जाईल त्याच्याबरोबर. ”

थोडा वेळ थांबून स्वर्णमयी म्हणाली,

“ चूली, तूं रानांत कधींच जात नाहींस ? ”

" जातें कीं ! "

" कशाला ? "

" फुलें आणायला. फूलादेवीला वहायचीं असतात ना ? "

" एऱ्हवीं तुम्ही फुलें तोडत नाहीं ? "

" तोडतों ना ! "

" मग चल. आपण फुलेंच आणूं या. "

म्हाताऱ्याला विचारून स्वर्णमयी चूलीबरोबर रानांत निघाली.

वाटेनें किती तरी झाडें होतीं. नानापरींचीं. एखादें निराळेंच झाड दिसलें म्हणजे स्वर्णमयी विचारी,

" हें झाड कसलें ? "

" धायड्याचें. ".

" तें पलीकडलें ? नीट उभें आकाशांत चढलें आहे तें ? "

" तो आईन. "

" हें या बाजूचें ? तो रस ठिबकतो बघ सालींतून— "

" तें खैराचें. "

" अन् हें वाकडेंतिकडें ? "

" तें ! तें माहीत नाहीं. "

पलीकडील दरींत शिरल्यावर तिथलें सौंदर्य पाहून स्वर्णमयी थक्क झाली. या ठिकाणीं येईपर्यंत वाटेंत तिला असें सौंदर्य अनेकदां दिसलें होतें. पण त्या वेळीं ती भानावर नव्हती. आतां मात्र दरी समोर दिसतांक्षणींच ती उभी राहिली.

" अहा ! किती सुंदर ! " ती थरारून म्हणाली.

" काय ? "

" ही दरी—तीं फुलें—पांढरीं—तांबडीं—जांभळीं—यांचीं नांवें ठाऊक आहेत. तुला ? "

" ऊंहूं— "

" नसूं दे. चल आपण तोडूं या. "

ग्रंथ संग्रहालय,

मग त्या दोघी बराच वेळपर्यंत पानांचे द्रोण करून त्यांत फुलें गोळा करीत राहिल्या. किती उशीर झाला त्याचें त्या दोघींना भानच राहिलें नाहीं.

एकदम स्वर्णमयी थांबली. चमकून तिनें चूलीचा हात घट्ट धरला.

" काय झालें ? " चूलीनें विचारलें.

" ऐक ! "

त्या दोघी कान देऊन ऐकूं लागल्या. दरीच्या एका दरडींतल्या झाडींतून खसखस फसफस असा आवाज ऐकूं येऊं लागला होता. हळूहळू तो इकडेच येत होता.

" काय तें ? " स्वर्णमयी भयानें सांवळी पडून म्हणाली.

" कोण जाणे ! "

" वाघ असेल एखादा ! "

" छेः ! वाघ दिवसां बाहेर पडत नाहीं. "

" मग ? "

" चल, आपण त्या खडकावर उभ्या राहूं. काय आहे तें कळेल आपच. "

" खडकावर नाहींना येणार तें ? "

" ऊंहूं ! "

दोघी खडकावर चढून उभ्या राहिल्या न राहिल्या, तोंच रानडुकरांचा एक तांडा एका बाजूनें भडाडत, मुसंड्या मारीत त्यांच्यासमोरून धांवत चालला. स्वर्णमयीनें भेदरून चूलीला मिठी मारली.

चूली म्हणाली,

" भिऊं नकोस. त्यांच्या मागावर माणसें आहेत. "

तोंच तिघे-चौघे भिल्ल तीरकामठे सरसावीत त्यांच्यामागें धांवत झाडींतून बाहेर आले. त्यांतला एक चूलीला म्हणाला,

" कुणीकडे ? "

" इकडे ! " चूलीनें दिशा दाखविली.

" किती आहेत ! "

" आठ-नऊ आहेत. "

" नर कीं माद्या ? "

" एक नर, बाकी माद्या आहेत. "

ते भिल्ल डुकरांमागें दिसेनासे झाले. स्वर्णमयी आश्चर्यानें चूलीला म्हणाली,

" तूं कसें ओळखलेंस ? "

हंसून चूली म्हणाली,

" त्यांत काय ओळखायचें ? "

" नर कीं मादी हें ? "

" तें तर सहज कळतें. कांहीं दिवस इथें राहिलीस, तर तुला सुद्धां कळेल. "

फुलांचे द्रोण घेऊन त्या दोघी गांवांत परतल्या, तोंवर कालिंग आणि तंगा या दोघांनीं सहासात मधाचीं पोळीं आणलीं होतीं. त्या दोघांचा हा पराक्रम पहाण्यास सगळ्या आयाबाया गोळा झाल्या होत्या.

मोघा मोहोळांचे कंद पिळून मध गाडग्यांत सांठवीत होती. ती म्हणाली.

" कुठें सांपडलें रे हें घबाड ? "

तंगाच्या मनांत खूप सांठलें होतें. आईकडून ही चौकशी होतांच तो उड्या मारीत अन् दंड ठोकीत म्हणाला,

" मी ! मी ! भैय्याच्या अगोदर मी ! सगळ्यांच्या अगोदर मी—"

“ अरे हो ! पण काय ? ”

“ सगळ्यांच्या अगोदर म्हणजे—सगळ्यांच्या ! नाहीं—वनदेवाला ठाऊक होतें—अन् फूलादेवीला. या दोघांच्या मागून मलाच—— ”

एक म्हातारी कौतुकानें म्हणाली,

“ काय तें सांग कीं ! ”

“ सांगतों ना ! अगोदर मला दिसलीं हीं मोहोळें ! दिसलीं कीं नाहीं भैय्या ? ”

“ थांब रे बाबा, मला हें गाडगें ठेवूं दे ! ” गाडगें झोंपडींत नेत कालिंग म्हणाला.

“ नाहीं पण तूं सांग, मला दिसलीं कीं नाहीं ? काढलींस तूं, पण दिसलीं कुणाला ? दाखवलीं कुणीं ? ”

“ तूंच. तूंच रे तंगा !,

भावाकडून हें प्रशस्तिपत्र मिळतांच मग तर तंगाचा आनंद गगनांत मावेना. तो अंगणांत नाचूं लागला. त्याच्या एवढालीं पोरें होतीं, तींही त्याला येऊन मिळालीं, त्या पोरांनीं सुरेख रिंगण धरलें अन् डौलानें हात वर उचलून तीं सगळीं नाचत राहिलीं.

म्हातारा चोंगराय पोरांचा नाच बघून पावलें टाकीतच तिथें आला. तो ओरडला,

“ अरे, तो फूटा कुठें आहे ? ढोल तरी आणा म्हणावें ! पोरें नाचताहेत ! ”

“ फूटा गेला डुकरामागें.” कोणीं तरी उत्तर दिलें.

“ अरे पण ढोल तर आहे ना ? कीं डुकरांची करमणूक करायला ढोलही घेऊन गेला फूटा ? जा कुणी तरी त्याच्या झोंपडींतून ढोल आणा. फूटा नाहीं तर मी वाजवीन कसें तरी. ”

कालिंग झोंपडींतून बाहेर येत म्हणाला,

तोंच तिघे-चौघे भिल्ल तीरकामठे सरसावीत त्यांच्यामागें धांवत झाडींतून बाहेर आले. त्यांतला एक चूलीला म्हणाला,

" कुणीकडे ? "

" इकडे ! " चूलीनें दिशा दाखविली.

" किती आहेत ! "

" आठ-नऊ आहेत. "

" नर कीं माद्या ? "

" एक नर, बाकी माद्या आहेत. "

ते भिल्ल डुकरांमागें दिसेनासे झाले. स्वर्णमयी आश्चर्यानें चूलीला म्हणाली,

" तूं कसें ओळखलेंस ? "

हंसून चूली म्हणाली,

" त्यांत काय ओळखायचें ? "

" नर कीं मादी हें ? "

" तें तर सहज कळतें. कांहीं दिवस इथें राहिलीस, तर तुला सुद्धां कळेल. "

फुलांचे द्रोण घेऊन त्या दोघी गांवांत परतल्या, तोंवर कालिंग आणि तंगा या दोघांनीं सहासात मधाचीं पोळीं आणलीं होतीं. त्या दोघांचा हा पराक्रम पहाण्यास सगळ्या आयाबाया गोळा झाल्या होत्या.

मोघा मोहोळांचे कंद पिळून मध गाडग्यांत सांठवीत होती. ती म्हणाली.

" कुठें सांपडलें रे हें घबाड ? "

तंगाच्या मनांत खूप सांठलें होतें. आईकडून ही चौकशी होतांच तो उड्या मारीत अन् दंड ठोकीत म्हणाला,

" मी ! मी ! भैय्याच्या अगोदर मी ! सगळ्यांच्या अगोदर मी— "

" अरे हो ! पण काय ? "

" सगळ्यांच्या अगोदर म्हणजे—सगळ्यांच्या ! नाहीं—वनदेवाला ठाऊक होतें—अन् फूलादेवीला. या दोघांच्या मागून मलाच—— "

एक म्हातारी कौतुकानें म्हणाली,

" काय तें सांग कीं ! "

" सांगतों ना ! अगोदर मला दिसलीं हीं मोहोळें ! दिसलीं कीं नाहीं भैय्या ? "

" थांब रे बाबा, मला हें गाडगें ठेवूं दे ! " गाडगें झोंपडींत नेत कालिंग म्हणाला.

" नाहीं पण तूं सांग, मला दिसलीं कीं नाहीं ? काढलींस तूं, पण दिसलीं कुणाला ? दाखवलीं कुणीं ? "

" तूंच. तूंच रे तंगा !,

भावाकडून हें प्रशस्तिपत्र मिळतांच मग तर तंगाचा आनंद गगनांत मावेना. तो अंगणांत नाचूं लागला. त्याच्या एवढालीं पोरें होतीं, तींही त्याला येऊन मिळालीं, त्या पोरांनीं सुरेख रिंगण धरलें अन् डौलानें हात वर उचलून तीं सगळीं नाचत राहिलीं.

म्हातारा चोंगराय पोरांचा नाच बघून पावलें टाकीतच तिथें आला. तो ओरडला,

" अरे, तो फूटा कुठें आहे ? ढोल तरी आणा म्हणावें ! पोरें नाचताहेत ! "

" फूटा गेला डुकरामागें." कोणीं तरी उत्तर दिलें.

" अरे पण ढोल तर आहे ना ? कीं डुकरांची करमणूक करायला ढोलही घेऊन गेला फूटा ? जा कुणी तरी त्याच्या झोंपडींतून ढोल आणा. फूटा नाहीं तर मी वाजवीन कसें तरी. "

कालिंग झोंपडींतून बाहेर येत म्हणाला,

" चोंगाबाबा, आतां कशाला ढोल ? "

" कां रे बाबा ? "

" उद्यां पुन्नम आहे. उद्यां रात्रीं नाचूं या."

" अरे पण आत्तां पोरें नाचताहेत, तर वाजवूं दे कीं जरासा ? "

मोघा म्हणाली,

" नको बाबा. ढोलाची थाप ऐकली, कीं सगळे भिल्ल रानांतून नाचायला इथें धांवतील. शिकार राहील तशीच. घरोघरच्या चुली रात्रीं थंड राहतील. सगळ्या आयाबाया माझ्या अंगणांत ढोल वाजवला, म्हणून मला शिव्या देतील ! "

" बरें बाई ! उद्यां मात्र तुझ्याच आंगणांत नाच होईल. पाहुणे कुठें गेले ? नाहीं नाहीं, कांहीं काम नाहीं तसें. जातों आतां. बाण घासायचे पडले आहेत. "

स्वर्णमयी तें दृश्य पाहून हरिखली. शिवदत्ताजवळ जाऊन ती म्हणाली,

" बाबा, कशीं मोकळ्या मनाचीं माणसें आहेत ! "

" होय माझ्या मुली. अडाणी आहेत खरीं, पण मनें फार थार आहेत. "

मोघा स्वर्णमयीजवळ येऊन म्हणाली,

" आवडलें का आमचें रान ? "

" वा: ! फार छान आहे ! "

" तुमच्याकडे कसें आहे कोण जाणे ! "

शिवदत्त हें बोलणें ऐकतांच एकदम उदास झाला. त्याच्या डोळ्यां-समोरून त्याचें घर, शेती, शकांची धाड, हें सगळें फिरायला लागलें. मोघाला कांहीं हें कळलें नाहीं. पण इकडे येत असलेल्या कालिंगानें हें हेरलें. विषय बदलण्यासाठीं तो म्हणाला,

" बाबा, मक्याचीं कणसें खाल काय ? "

त्याची ही युक्ति स्वर्णमयीच्या लक्षांत आली. ती लगेच म्हणाली,

" ताजीं का ? "

" होय तर ! मीं येतांना आणलीं आहेत—नदीच्या मळईतून. "

" बाबांना आवडतात कणसें. खाल ना बाबा ? "

" खाईन तर काय ! "

कालिंगानें आगटींत लाकूड ढोसून जाळ केला. तो, तंगा अन् चूली कणसें भाजायला बसली. स्वर्णमयीही त्यांच्या मदतीला आली. गरम गरम कणसाचे दाणे सोलून ते शिवदत्ताच्या हातीं देत कालिंगानें विचारलें,

" बाबा, तुम्हीं कधीं आमचा नाच पाहिला आहे ? "

" नाहीं रे बाळा ! "

स्वर्णमयी नृत्य शिकली होती. ती हरखून म्हणाली,

" तुमच्या अंगणांत होणार ना नाच ? "

" होय. आपल्याच अंगणांत. तुम्हांला आवडेल ? "

" होऽ! फार आवडेल ! "

दुसरे दिवशीं रात्रीं जेवणें उरकलीं. फूटा ढोल घेऊन कालिंगाच्या अंगणांत आला. स्वच्छ चांदण्याच्या प्रकाशांत काळे काळे भिल्ल जमूं लागले. फूटानें ढोलावर थाप टाकली. ती सगळ्या दरींत घुमली. एकेक एकेक करतां तीस-चाळीस भिल्ल एकत्र झाले. तेवढयाच बायका. चोंगराय खालीं टेकत म्हणाला,

" काय रे, आतां वाट कुणाची पहातां ? "

" तुमची ! " एका खजाळ भिल्लानें उत्तर दिलें.

" करा थट्टा पोरांनो ! पण लक्षांत ठेवा, तुमच्याएवढा होतों, तेव्हां माझ्या नाचण्यानें सगळा रहाळ वेडा झाला होता ! किती तरी

जणी लग्नासाठीं माझ्यामागें लागल्या होत्या. शेवटीं–"

"शेवटीं काय ?"

"शेवटीं पळून गेलों तेव्हां वाचलों त्या तडाख्यांतून !"

हंशाचा गदारोळ उसळला. त्या गदारोळांतच फूटाच्या ढोलाचा आवाज मिसळला. पैस जागा करून नाचणारे गडी पावलें टाकूं लागले. त्यांच्यांत बायाही येऊन मिळाल्या. सगळ्यांनीं मिळून रंगण मांडलें अन् ढोलाच्या ठेक्याबरोबर गत धरली.

जसजसा ढोलाचा ठेका बदलत जाई, तसतसे नाचाचे प्रकार बदलत. थोड्याच वेळांत नाचांत रंग भरला. स्वर्णमयीच्यानें राहावें ना ! ती तटकन उठून चूलीजवळ गेली, अन् तिच्या हातांत हात गुंतवून नाचूं लागली. चोंगराय ओरडला,

"भले भले ! पाहुणीही नाचत्ये की ! अरे तुमच्यासारखीच ! तुमच्याहून सरस पावलें पडताहेत तिचीं. शाब्बास मुली शाब्बास !"

सगळ्या भिल्लांनीं वनदेवाचा जयजयकार केला अन् ते चन्द्र ढळेपर्यंत नाचत राहिले.

****

## प्रकरण चवथें

पण अदृष्टांत कांहीं वेगळेंच लिहिलेलें होतें, त्याला कालिंग तरी काय करणार आणि शिवदत्त तरी काय करणार !

आठ दहा दिवसांनीं फूटा एक बातमी घेऊन आला. त्या दिवशीं चार-सहा भिल्ल हरणांच्या लोभानें घाटी उतरून पलिकडील सपाटीच्या अंगाला गेले होते. हरणें मारून परत घरीं येण्याकरितां ते डोंगर चढले, अन् विसाव्यासाठीं खिंडींत एका झाडाखालीं आडवे आले.

फूटानें चिलीम भरली. चकमक झाडून आतां तो गुल पेटवणार तोंच त्याचें लक्ष लांबवर क्षितिजाकडे गेलें. निरखून तिकडे पहात तो म्हणाला,

"भूखा, ती मैदानांत धूळ कसली दिसत्ये रे !"

"अरे वादळबिदळ असेल."

"आकाश तर स्वच्छ आहे. वादळ असतें तर ढग नसते कां आले ?"

पडल्या पडल्याच बिस्ताना म्हणाला,

"फूटा, अरे तूं अजून बच्चा आहेस. चक्री वादळ उठायला आकाशांत ढग लागतात होय रे? अरे, आकाश स्वच्छ असूनही वावधूळ भिरभिरत जाते. घरेच्या घरें, गाई, बैल हें सगळें त्या वावधुळीच्या बरोबर आकाशांत उडतें, इतका तिचा जोर असतो."

"बैलसुद्धां ?" भूखानें विचारलें.

" ऐका याचें ! म्हणे बैल सुद्धां ! अरे, एकदां एका लग्नाचें वऱ्हाडच्या वऱ्हाड वावधुळीनें उचललें, अन् दुसऱ्या गांवीं नेऊन मांडलें—जसेंच्या तसें ! "

पण फूटाचें समाधान झालें नाहीं. तो म्हणाला,

" बिस्तानाभैय्या, ही वावधूळ दिसत नाहीं. "

" मग तुझ्या चिलमीचा धूर असेल. गांजा तर नाहीं ना मिसळलास तंबाखूंत ? "

फूटा उठला, अन् बिस्तानाजवळ जाऊन त्याला उठवून बसवीत म्हणाला,

" ऊं: ! तुम्हांला तर रात्रंदिवस गांजाच दिसतो ! तें पहा बघूं ? ती काय वावधूळ आहे ? "

बिस्तानानें कांहीं वेळ निरखून पाहिलें. मग तो म्हणाला,

" नाहीं गड्या ! फूटा, तूं बरोबर आहेस ! "

" काय आहे " भूखा उठून बसत म्हणाला,

" अरे बघ ! सुमार अर्धा कोस रुंदीची धुरळ्याची भिंत दिसत्ये आहे ! "

" पण ती तर फार लांब आहे !–"

" लांब कशाची ? असेल पांच-दहा कोस. पण ती हळूहळू इकडेच सरत्ये आहे रे ! "

" तेंच तर मी म्हणत होतों. "

" अरे फूटा, जरा निरखून बघ बघूं ! तुला तिच्यामागें घोडे दिसत नाहींत ! "

" इतक्या लांबचें स्वच्छ कांहीं दिसत नाहीं. पण असावेतही. "

" तर मग हें कुणाचें तरी सैन्य असलें पाहिजे ! "

" इतकें सैन्य ? "

बिस्ताना दचकला. फूटा म्हणाला,

" कां बिस्तानाभैय्या दचकायला काय झालें ? "

" अरे, पाहुण्या म्हाताऱ्यानें सांगितलेले शक तर नव्हेत हे ? "

" शक ? "

" होय ! जे मारलेल्या माणसांचें रक्त पितात ते–"

" पण ते इकडे कशाला येतील ?–" भूखानें विचारलें.

बिस्ताना त्याच्याकडे डोळे वटारून पहात तावातावानें म्हणाला,

" त्यांना विचारायला जातोस का ? जा की ! "

मग मात्र कुणी कांहीं बोललें नाहीं. ते गडी तसेच लगबगीनें उठले अन् शिकार खांद्यावर उचलून गांवाकडे परतले. गांवांत शिरतांक्षणीं त्यांना चोंगराय भेटला. तो हरणांकडे मोठ्या रुचीनें पहात हरखून म्हणाला,

" वा वा ! काळवीट काय भरला आहे ! मडकेंभर तरी चरबी निघेल ! कुठें सांपडला रे ? "

फूटा म्हणाला,

" चोंगाभैया, हरणें खाण्यासाठींच आणलीं आहेत. पण अगोदर खबर तर ऐका ! "

" कसली खबर ? काय तुझी बायको पळून गेली ? गेली तर गेली— "

" थट्टा करूं नका भैय्या ! शक आले आहेत ! "

चमकून चोंगराय म्हणाला,

" शक ? कुठें आले आहेत ? "

" घाटीपलीकडे ! "

" तुला कसे दिसले ? "

फूटानें सर्व हकीगत सांगितली. तटकन् उठून चोंगराय म्हणाला,

" फूटा, ते इकडे येतील काय ? "

" मला काय माहीत ! "

" मलासुद्धां माहीत नाहीं. पण आपण तयार असलें पाहिजे ! जेवण झालें कीं कडें वाजव. सगळे एकत्र जमून काय तें ठरवूं या. "

तसाच चोंगराय कालिंगाकडे गेला. त्याला एकीकडे घेऊन तो म्हणाला,

" कालिंग्या, शक आले आहेत ! "

बावरून कालिंग म्हणाला,

" कुठें आले आहेत ? "

" इथें आले आहेत ? "

" इथें आले नाहींत. पण घाटीपलीकडे फूटानें धुळीची एक भिंत पाहिली. "

" तर मग ? "

" म्हातारबाबा काय करीत आहेत ? "

" तंगाला गोष्ट सांगत आहेत. "

" चल. त्यांना हें सांगितलें पाहिजे. "

" पण— "

" काय ? "

" नाहीं, जरा खुबीखुबीनें— "

कालिंगाला शाबासकी देत चोंगराय म्हणाला,

" तूं तरी उडदाचाच मुलगा ! तोही असाच हुशार होता ! "

ते दोघे झोंपडीसमोर गेले. अंगणांत तंगा, चूली अन् स्वर्णमयी शिवदत्तासमोर बसलीं होतीं.

शिवदत्त त्यांना उज्जयिनीच्या महांकाळाची गोष्ट सांगत होता. तंगा मध्येंच म्हणाला,

" पण बाबा, त्या भक्तानें किती जाप केला ? "

“ खूप ”

“ खूप म्हणजे डोंगराएवढा ? ”

“ कां ? तुला करायचा आहे ? ”

“ हो. मी करीन. महांकाळाला इकडे बोलावून घेईन. म्हणजे आमच्या गांवाला दोन देव झाले. एक वनदेव, अन् दुसरा महांकाळ. पण देवी मात्र एकच हां ! ”

सगळीं जणें हंसूं लागलीं. तों चोंगराय पुढें होऊन म्हणाला,

“ तंग्या, पंडिताई करतोस काय ? करशील रे बाबा करशील ! तुझा भाऊ अन् तूं, दोघेही अगदीं सारखे अहांत. मोघीचींच लेकरें ना ? तर— ”

“ चोंगाबाबा, गोष्ट पुरी होऊं द्या ना ! ”

“ पुरे झाली रे तुझी गोष्ट ! आपल्या गांवाला एकच देव असला तरी सुद्धां चालेल. तर काय म्हणत होतों मी ? हो ! ऐकलेंत काय बाबा ? काय पोरें थापा मारतील, त्याचा पत्ता लागायचा नाहीं. ”

“ काय झालें ? ”

“ व्हायचें काय ? दगडांची भिंत आम्हीं ऐकली आहे. मातीचीही कुणीं सांगितली, तर खरें मानूं. आम्ही तर सरमडाच्याच भिंती करतों. चोर कांहीं आमच्या भिंती फोडायला येत नाहीं., चोराला तरी एवढें नक्कीच कळतें, कीं भिल्लांच्या झोपड्यांतून काय सांपडायचें आहे ? फार झालें तर एखादें वाघाचें कातडें, धनुकली, बाण, मधाचें गाडगें. अरे हो ! काय रे कालिंगा, तूं पाहुण्यांना गुळवेलीचा मध आणून दिलास कीं नाहीं ? वा वा ! काय औषधी असतो तो ! ”

स्वर्णमयी मध्येंच उत्सुकतेनें म्हणाली,

“ चोंगाबाबा, तुम्ही मुलांनीं मारलेल्या थापांविषयीं कांहीं तरी सांगत होतांत— ”

" हो हो ! सांगतों ना ! आज पोरांनीं अशी गप्प उठवली, कीं त्यांना धुळीची भिंत दिसली ! "

स्वर्णमयी म्हणाली,

" धुळीची भिंत ? "

शिवदत्ताचें लक्ष नव्हतें. पण धुळीची भिंत हे शब्द ऐकतांच चाबकाचा फटकारा खाल्लेल्या घोडयासारखा सजग होऊन तो बोलला,

" काय ? "

" तसें कांहीं विशेष नाहीं, कदाचित् पोरांनीं उठवलेली गप्पही असेल ! " चोंगराय बोलला.

स्वर्णमयीनें सांगितलें,

" बाबा, हे धुळीच्या भिंतीबद्दल बोलत आहेत. "

एकदम शिवदत्ताच्या अंगाला घाम फुटला. चोंगरायचा हात धरून तो कांपऱ्या आवाजांत बोलला,

" काय म्हणालांत ? "

" छे हो ! पोरांचें काय मनावर घेतां तुम्ही ? तें तर—"

" सांगा ! "

शिवदत्ताचा स्वर ऐकून मात्र चोंगरायाच्यानें राहवलें नाहीं. तो म्हणाला,

" बाबा, तुम्ही घाबरूं नका. अगोदर आमचीं प्रेतें पडतील. मग तुमच्या अंगाला शक हात लावतील ! "

" कुठें दिसली धुळीची भिंत? "

" या डोंगरापलीकडील मैदानांत. "

शिवदत्त उठला. थरथर कांपत तो पांच पावलें पुढें गेला, मग हात उंच करून म्हणाला,

" शेवटीं ती भिंत इतक्या जवळ आली ! मैलभर रुंदीची ती भिंत—"

" हो, अर्धा कोस--"

" तुम्ही सांगू नका ! " शिवदत्त ओरडला, " मी सांगतों ! मैलभर रुंद, पांच मैल लांब, अशी ती वावधूळ जिथें जाते, तिथें कांहींही शिल्लक रहात नाहीं ! टोळधाड येते, सगळें हिरवें चाटून-पुसून खाऊन जाते ! मागें खराटे तरी उरतात. पण ही धाड त्यापेक्षां अधिक भयानक आहे ! ही उलटून पलीकडे गेली, कीं उरते दुर्गंधि ! प्रेतांची दुर्गंधि ! भयाण, भेसूर भित ! "

कालिंग एवढा वेळ झोंपडीच्या भिंतीला टेकून उभा होता. आता तो पुढें झाला. शिवदत्ताजवळ जाऊन त्यानें त्याच्या खांद्यावर हात ठेवला, अन् मऊ स्वरांत तो बोलला,

" बाबा, तुमचा देवावर भरंवसा आहे का ? "

" देवावर ? होता ! "

" आमचा आजही आहे. वनदेव या गांवाच्या राखणीला उभा आहे. आम्हीही सगळे तयार होऊं. तुम्ही एवढें लक्षांत ठेवा, कीं जशी माझी चूली, तशी सोर्णमयी ! तुम्ही धीर सोडूं नका म्हणजे झालें ! "

" अरे पण माझ्या मुला, शकांच्या भाल्यांपुढें अन् बाणांपुढें तुमचीं धनुकलीं कुठवर टिकतील ? त्यांचीं धनुष्यें पोलादाचीं असतात ! त्यांची बाण फेंकायची गति भयानक असते. त्यांचे भाले कधींही निष्फळ फेंक करीत नाहींत ! त्यांच्या ढाली–"

" थांबा बाबा ! तुम्ही आम्हांला लढायची विद्या शिकवाल ? "

" मी ? नाहीं रे बाबा ! "

" मग कोण शिकवील आम्हांला ? "

" अरे, शस्त्रविद्येचे एकाहून एक श्रेष्ठ आचार्य मालव देशांत आहेत. पण आतां काय उपयोग ? उशीर झाला आहे रे ! आतां उशीर झाला आहे ! "

तोच डंग डंग डंग डंग कडें वाजूं लागलें. चोंगराय ओरडला,

" इकडे या! फूटा, इकडे!"

कालिंगानें धुनींत लांकडाचीं टोणकें आणून घातलीं. जमलेल्या दोघाचौघांनीं बारीक इंधन आणून मोठा जाळ केला. कड्याच्या आवाजाबरोबर सगळ्या भिल्लवाड्यांतले तरुण आणि म्हातारे भिल्ल एकत्र होत होते. जाळाच्या अनुरोधानें ते सर्व कालिंगाच्या अंगणांत आले. चिलमी फकफक करूं लागल्या. सर्व भिल्ल दाटीवाटीनें अंगणांत बसलेले पाहून बिस्ताना म्हणाला,

" चोंगाबाबा, वैठक ओली आहे कीं कोरडी? मोहाच्या फुलांचा वास तर कुठं येतच नाहीं!"

चोंगा त्याच्यावर खेंकसला,

" तूं मेलास, म्हणजे तुझ्याबरोबर दारूचें एक भरलेलें गाडगें अन् गांजा पुरूं रे! नाहीं तर तूं समंध होऊन सगळ्या भिल्लवाड्याला छळशील. कुणाला नदीवर पाणीही भरूं द्यायचा नाहींस. वेळ कसली, अन् तूं विचारतोस मोहाच्या फुलांचा वास!"

फूटा म्हणाला,

" राहूं द्या चोंगाबाबा. सगळे जमले आहेत. तुम्ही बोला ना काय बोलायचें तें!"

मोघा झोंपडीच्या दाराशीं बसली, तिच्याजवळच चूली अन् स्वर्णमयी. तंगा कालिंगाच्या मांडींत कोपर रोंवून टेंकला. त्यांच्याच शेजारीं शिवदत्त बसला.

चोंगराय उभा राहिला. तो म्हणाला,

" गडे हो, आज एक न घडलेली गोष्ट घडली. फूटा, भूका, बिस्तान, हे गडी हरणाच्या शिकारीहून परतत होते, तेव्हां त्यांना शक लोक दिसले."

कुठें ?" ठोडारायानें विचारलें.

" घाटीपलीकडच्या मैदानांत."

" एवढया लांबून यांना शक कसे दिसले ? ते काय ताडामाडा-एवढाले राक्षेस आहेत ?"

" अरे ठोडाराय, शक म्हणजे घोड्यांवर बसलेलें शकांचें सैन्य दिसलें. ती सेना धुळीची भिंत उडवीत या दिशेला येत होती."

तुच्छतेनें हंसून ठोडाराय म्हणाला,

" ते शकच कशावरून होते ? पराठावरील लोकांजवळ काय घोडे नाहींत ? अन् शक ही एक गप्प आहे. कुणीं पाहिले आहेत शक ?"

चोंगराय आश्चर्यानें बोलला,

" हे म्हातारेबाबा शकांच्या तडाख्यांतून वांचून इथें आसऱ्याला आले आहेत ! ते काय खोटें सांगतील ?"

पचकन् थुंकून ठोडाराय म्हणाला,

" माझा कुण्या परक्या माणसावर विश्वास नाहीं आणि खरें विचाराल तर मीं कुणाही परक्या माणसाला माझ्या घरीं आश्रय कांहीं दिला नसता. कुठला, कोण, जातगोत काय, मुलगी कुठली—! मोघीच्या घरीं कोणी अडपतेंदडपतें नाहीं, म्हणून तिच्या मुलानें बिनविश्वासाचीं माणसें घरीं ठेवून घेतलीं—"

कालिंग ताडकन् उठून उभा राहिला. तो ओरडला,

" चोंगाबाबा, ठोडारायनें आमच्या चूलीची मंगनी केली होती. त्याला आई नाहीं म्हणाली, म्हणून तो काय वाटेल तें बोलतो आहे. पण तुम्ही त्याला सांगा, कीं आईच्या घरीं उतरलेले पाहुणे तिच्या मुलांना प्राणांहून अधिक आहेत. त्यांचा अपमान केलेला तिच्या मुलांना खपायचा नाहीं म्हणावें !"

फूटा आणि भूखा ओरडले,

" मुळींच खपायचा नाहीं. कालिंगाकडले पाहुणे सगळ्या भिल्ल-वाड्याचे पाहुणे आहेत. आम्ही आमचे जीव त्यांच्या पायतळीं अंथरूं. ज्याला हें पटत नसेल त्यानें काडी मोडून बाजूला सरावें ! "

वाढता जोर पाहून ठोडाराय कुरकुरला,

" सगळीं पंचायतच जर पाहुण्यांच्या बाजूनें उभी राहिली असेल, तर मला कांहीं म्हणायचें नाहीं. "

" तूं म्हणूंच नकोस ! " फूटा बोलला.

" त्यापेक्षां उठून जाऊन दारू पिऊन झोंपेनास का ! " बिस्तान्यानें सल्ला दिला.

" ऐक रे बिस्तान्या ! बसूं दे त्याला. तर गडे हो, शक जर या रानांत शिरून लुटालूट करूं लागले, तर काय कराल ? " चोंगरायानें प्रश्न केला.

" आम्हां भिल्लांच्या घरचें ते काय लुटतील ? "

याचें उत्तर कुणालाच सुचलें नाहीं. चोंगराय शिवदत्ताकडे पाहूं लागला. तो म्हणाला,

" मी उत्तर देऊं काय ? "

" होय. "

म्हातारा शिवदत्त उठून उभा राहिला. तो हलणाऱ्या स्वरांत बोलूं लागला.

" मोठ्या मनाच्या माणसांनो, विश्वास ठेवा अगर न ठेवा, शक आहेत. त्यांच्या तिखट भाल्याची ही खूण इथें माझ्या छातीवर आहे. तुम्हांला प्रश्न पडला आहे, कीं शक आमच्या घरचें काय लुटतील ! खरें आहे. थोर मनांशिवाय तुमच्याजवळ कांहींच द्रव्य नाहीं. पण मित्र हो ! शकांना लुटालूट करायला कांहीं लागतेंच असें नाहीं. पिसाळलेला लांडगा तुम्हीं कधीं पाहिला असेल. तो दिसेल त्या वस्तूवर

दांत चालवतो. तसें आहे शकांचें. करमणूक म्हणून ते गांवें जाळतात. आणि मित्रहो, आईबहिणींचा हिशेब शकांजवळ नाहीं! माझी थोरली मुलगी—गडे हो, कसें सांगूं? पण आतां सांगितलें पाहिजे. माझी थोरली मुलगी गर्भवती होती! तिला त्यांनीं—!"

क्षणभर त्याच्यानें बोलविलें नाहीं. पण मग तो सांवरून म्हणाला,

"तेव्हां मित्र हो, या सर्वभक्षक शकांपासून हा शांत भिल्लवाड वांचवायचा असेल, तर तयार रहा. त्यांचीं शस्त्रें फार तेज आहेत, हें लक्षांत ठेवा. त्यांचे घोडे फार वेगानें धांवतात हेंही ध्यानांत असूं द्या.

"आतां आम्हां मायलेंकरांविषयीं विचाराल, तर आम्ही उद्यां पहांटेसच ही वस्ती सोडून कुठें तरी निघून जाऊं. इतके दिवस मोठ्या मायेनें आश्रय दिलांत, हेच उपकार कल्पान्तापर्यंत फिटायचे नाहींत. तुमचें थोर मन कसें वानूं? माझ्याजवळ शब्द नाहींत. पण आतां आम्ही आमचा भार तुमच्यावर घालणार नाहीं!"

कधीं नव्हे ती मोघा या पाळीला पंचायतींत उभी राहिली. ती स्वर्णमयीला पोटाशीं धरून म्हणाली,

"चोंगाबाबा, म्हातारबाबांना जायचें असेल, तर एकट्याला जाऊं दे. या अशा भीतीच्या काळोखींत मी या माझ्या लेकीला त्यांच्याबरोबर धाडायची नाहीं. माझी चूली, तशी ही. अन् माझे दोघे चंद्रसूर्य कालिंगा अन् तंगा अगोदर या लेकीवरून ओवाळले जातील, मग शक कीं फक कोण ते या झोंपडींत शिरतील! तोंपर्यंत नाहीं—"

सगळ्या भिल्लांनीं कोल्हाळ करीत म्हटलें,

"बरोबर! बरोबर!"

कालिंग शिवदत्ताजवळ गेला. तो म्हणाला,

"बाबा, आमची विनंती धुडकावून तुम्ही जाणार काय?"

आंसवें पुशीत शिवदत्त बोलला,

“ नाहीं रे बाळा, नाहीं ! ”

कालिंगानें जयहर अशी गर्जना केली. त्याच्या आवाजांत सगळ्यांचे आवाज मिसळले. दरीमधून कितीतरी वेळपर्यंत त्या आवाजाचा प्रतिध्वनि येत राहिला.

****

# प्रकरण पांचवें

संकट अपेक्षेपेक्षां फार लवकर आलें अन् भलत्या दिशेनें !

त्या रात्रीं असा निर्णय ठरला, कीं कुणींही भिल्लानें शिकारीच्या लोभांत गुंतून लांब जायचें नाहीं. दिवसां अगर रात्री ढोल अन् कडें दोन्ही वाजलेलीं ऐकूं येतांच सर्वांनीं आपापलीं शस्त्रें घेऊन एकत्र व्हायचें. गोफणीसाठीं वस्तींत ठिकठिकाणीं धोंड्यांची रास घालून ठेवायची. कामठ्यांना वाद्या लावून ते तयार करायचे. बाणही बांधून ठेवायचे. चिंध्याचे सोडगे तयार असूं द्यायचे. टेहळ्यांचीही नेमणूक झाली.

भिल्लांनीं आपल्या समजुतीप्रमाणें तयारी तर सगळी करून ठेवली. पण हिमालय ओलांडून अलीकडे आलेल्या शकांच्या धाडीपुढें ती लटकी पडली !

चौथे दिवशीं सकाळीं टेहळणीसाठीं बसलेला भिल्ल धांवत येऊन सांगूं लागला,

" घोडे आले ! "

तत्क्षणीं फूटा अन् कालिंग, दोघांनीं ढोल अन् कडें बडविण्यास प्रारंभ केला. लगेच सगळा भिल्लवाडा एकत्र झाला. चोंगराय टेहळ्याला म्हणाला,

" कुठें आले ? "

" मोठ्या डोंगराच्या अंगाशीं पावलाच्या आकाराची टेकडी आहे; तिच्यापलीकडे कांहीं गुहा आहेत—"

" माहीत आहे, पुढें सांग ! "

" तिथें आज चार दिवसांपासून चारपांच बौद्ध भिख्खु येऊन राहिले होते -- "

" मला दिसले होते-" बिस्तान्यानें साक्ष दिली.

" मी नेमून दिलेल्या झाडावर वाटेकडे लक्ष ठेवून बसलों होतों. तों मला टेकडीपलीकडे गडबड ऐकूं आली. म्हणून मी झाडांतून लपत टेकूडमाथ्यावर जाऊन पोंचलों, तों पलीकडची सगळी दरी घोड्यांनीं भरली होती ! "

" किती होते ? "

" काय कीं बाबा ! या आंब्याला पानें आहेत, तितके होते ! आणखी पलीकडून येतच होते ! "

चोंगराय कडकडीत शब्दांत म्हणाला,

" ऐका रे पोरांनो ! सगळ्या बायका इथें गोळा करा. पोरेंसोरें, बाळबाळंतिणी-सगळ्या ! आपण लहानमोठे सत्तर आहोंत-"

" एकाहत्तर ! " म्हातारा म्हणाला.

" होय. एकाहत्तर. पैकीं अकरा इथें असूं द्या. बाकी साठजण वस्ती-भोंवतीं व्हा. नदीच्या अंगाला कुणीं रहायची जरूर नाहीं. तुमचे नायक फूटा, भूखा, बिस्ताना, ओंडल. कामठे अन् गोफणी घ्या. खूप तयारीनें असा. वनदेव सगळें मंगल करील ! "

कालिंग अस्वस्थ होऊन म्हणाला,

" चोंगाबाबा, मी ? "

" तूं ? तूं इथें ! इथें जे अकरा थांबतील, त्यांचा तूं नायक ! ऐकलेंत काय गड्यांनो, जा पळा ! जयहर जयहर ! "

सगळ्यांनीं साथ दिली,

" जयहर जयहर ! "

भराभर तीरकामठे अन् गोफणी घेऊन सगळे साठ जण वस्तीभोंवतीं

घेरा घालून झाडांवर बसले. ठोडाराय म्हणाला,

" मी खालींच थांबणार ! "

फूटा ओरडला,

" अरे ऐक ! माझ्या शेजारीं ये ! "

ठोडाराय पिऊन आला होता. तो हट्ट करून बोलला,

" शक म्हणजे काय चीज ! इथून मी सगळ्या शकांना मारणार ! डुक्कर वाटेल तेवढा का असेना, एका तीरांत मी त्याचा मेंदू बाहेर काढतों. शकांची काय बिशाद ? "

" मर ! काय वाटेल तें कर ! "

कालिंगानें एका रांजणांतून एक सुरा अन् खंजीर अशीं दोन शस्त्रें बाहेर काढलीं. त्यानें सुरा चूलीच्या हातीं दिला. खंजीर स्वर्णमयजिवळ देत तो म्हणाला,

" ताई, हा चालवूं शकशील ? "

स्वर्णमयीचें मन भरून आलें. ती म्हणाली,

" भैय्या, तूं सांगशील तें मी करीन. "

" तर मग तुम्हीं दोघींनीं एकत्र असायचें. आई, फूटाची भावजय बाळंतीण आहे. तिला झोंपडींत येऊं दे. तुम्ही आजारी अन् बाळंतिणींना झोंपडींत ठेवून बाहेर असा. ए बेंडाची मा, रडायला काय झालें आहे? रडूं नकोस. ती बाळंतीण बघ. ती रडत्ये का ? "

सूर काढीत बेंडाची मा म्हणाली,

" मेल्यांनीं मला मारलें तर ? "

चोंगराय ओरडला,

" गांवाची पीडा जाईल ! चूप रडूं नकोस ! "

कालिंग आपल्या भिडूंना म्हणाला,

" आपण नऊ जण आहोंत. "

आपला बारका तीरकामठा सांवरीत तंगा कालिंगाजवळ आला. तो म्हणाला,

" भैय्या, मला नाहीं मोजलेंस तें ?"

त्याची पाठ थोपटीत कालिंग म्हणाला,

" अरे ! तुला विसरलोंच होतों ! तूं कच्चें निंबू हां ! तर तंगा मिळून आपण दहा जण आहोंत. शिवदत्त बाबा अन् चोंगाबाबांचा आम्हांला आशीर्वाद आहे. भिल्लवाड्याची इज्जत आमच्या हातीं आहे, हें ध्यानांत आहे ना ?"

" होय."

" तर मग अगोदर गोफणी तयार ठेवा. मग तीरकामठे. अन् सोडगीं अगदीं शेवटीं उचलायचीं. शेवटपर्यंत लढायचें–शेवटच्या गड्यानें. मग वनदेव काय करील तें !"

दोन प्रहर टळून जाईपर्यंत कांहीं घडलें नाहीं. तिकडे ठोडारायनें दारूचा तुंबा जवळ बाळगला होता, तो तोंडांत रिता करून तो म्हणाला

" फूटा, मी शकांना शोधायला जातों."

" अरे थांब !"

" थांबणें भ्याडाचें काम आहे ! नामर्दानें थांबावें. मी शकांना मोजीत नाहीं. एकटा त्यांना हुडकून ठार करतों."

तो पुढें निघाला. फूटा झाडावरून उडी मारून त्याला धरायला चालला. पण भेलकांडत अन् पुढें पळत ठोडाराय आरडला,

" मी नाहीं थांबणार ! कालिंग्याला म्हणावें, मिठी मारून बस– तुझ्या खापरतोंड्या वहिणीला, अन् त्या पाहुणीला– "

" ठोडा !" फूटा किंचाळला. पण ठोडाराय झुडुपांत दिसेनासा झाला. फूटाच्या तुकडींतला महिका त्याला हांक घालून बोलला,

" फूटाभैय्या, त्याला मरूं दे. तूं इकडे ये पाहूं !"

फूटा आपल्या जागेवर येऊन बसला, खरा; पण त्याला फार वेळ थांबावें लागलें नाहीं. थोड्याच वेळांत त्याला झाडींत डोकावणारे भाले अन् घोड्यांवर बसलेले स्वार दिसले!

पुढें चालले होते बुद्ध भिख्खु, अन् त्यांना भाल्यांनीं टोंचीत हंसत चालले होते स्वार!

भिख्खूंचे हात मागें बांधले होते. त्यांची गुळगुळीत मस्तकें भाल्यांच्या जखमांनीं भरून गेलीं होतीं. सर्वांगावरून रक्त खालीं घळघळत होतं. त्यांतल्या एका नवथर भिख्खूला हें सहन होत नव्हतें. तो चिडून म्हणाला,

" भंते, हें सर्व असह्य आहे ! "

त्याच्या शेजारींच चाललेला म्हातारा भिख्खु म्हणाला,

" पुत्ता कूटदन्ता, बहुजनहिताय बहुजनसुखाय भ्रमण करायचें व्रत स्वीकारलेंस ना ? मग हें सहन केलें पाहिजे ! "

" सहन करूं ? तथागत भगवान् गौतमाच्या त्या स्मृतीची, स्तूपाची या राक्षसांनीं अशी अप्रतिष्ठा केली तरी ? "

" शांत हो पुत्ता ! भगवान् तथागतांचा शांतीचा उपदेश विसरूं नकोस ! आपण यांना क्षमेनें जिंकूं या. "

त्यांच्या काढण्या हातीं धरून घोड्यावर बसलेला खालीं ओघळणाऱ्या मिशांचा वासिष्क शेजारच्या तुरुष्काला म्हणाला,

" तुरुष्का, हीं भगवीं भुतें काय बडबडताहेत ? तूं कांहीं दिवस तिब्बतांत राहिला होतास. तुला हें उमगतें काय ? "

तुरुष्क गदगदा हंसून म्हणाला,

" मला यांची भाषा कळत नाहीं. मात्र मी यांच्याशीं बोलूं शकतों. "

" बोलूं शकतोस ? कसा ? "

भाल्याचें टोंक कूटदन्ताच्या बरगडींत खुपसत तुरुष्क म्हणाला,

" हा असा ! "

ते दोघे आणि भावतालचे शक मोठमोठ्यानें हंसले. कूटदन्ताच्या डोळ्यांतून ठिणग्या बाहेर पडल्या.

तोंच त्यांचा पोलादी चिलखत घातलेला सरदार कनिष्क एका सागाच्या झाडाखालीं घोडा थांबवून म्हणाला,

" तो पहा, एक काळा वानर हातपाय झाडीत इकडे येत आहे. अरे त्याच्या हातांत धनुकलीही आहे वाटतें ! "

शेजारीं असलेल्या एका शक सैनिकानें आपलें धनुष्य तिकडे ताणलें, अन् बाण सोडला. लगोलग झाडें चुकवीत वाटेंतल्या खडकांवरून त्यानें तिकडे घोडा दौडविला. थोड्याच वेळांत एक डोळा फुटून रक्ताचा पाट खालीं वहात असलेल्या ठोंडारायला पळवीत तो कनिष्का-समोर आला.

" त्याच्या पाठींत भाल्याचें टोंक खुपसून त्याला नीट उभा करा ! "

कनिष्काच्या आज्ञेचें पालन त्वरित केलें गेलें. ठोंडाराय गुरासारखा आरडत वडबडूं लागला. कनिष्क दुभाष्याकडे वळून म्हणाला,

" हा काय म्हणतो ? "

" दारूच्या धुंदींत तो वाटेल तें बडबडत आहे. अजून दारू नीटशी उतरली नसावी. तो मध्येंच म्हणतो, कीं त्याच्या गांवांत एक गोरी पोरगी सोर्णमयी आली आहे—पळून ! "

डोळे बारीक करून कनिष्क म्हणाला,

" त्याला त्याचें गांव कुठें आहे तें विचार. "

ठोंडारायच्या छातींत एक ठोसा मारून त्याला विचारल्यावर हंसत दुभाष्या म्हणाला,

" समोरच आहे म्हणे ! पण हा वानर तुम्हां सर्वांना ठार मारीन म्हणतो. "

हें ऐकतांच एका शकानें आपला भाला ठोंडारायच्या छातींतून

आरपार काढला. कनिष्कानें आपला घोडा भिल्लवाड्याच्या दिशेनें काढला. बाकी स्वार भिख्खूंना बरोबर घेऊन त्यांच्या मागोमाग चालूं लागले.

पहिला घोडा दिसतांच फूटानें इशारतीची खूण केली. शकांच्या त्या फळींत भडाभड दगड अन् बाण येऊन कोसळूं लागले. अपेक्षा नसतां तो हल्ला झालेला पाहून शक थोडेसे बावरले. पण मग कनिष्कानें आपलें पाठीवर टाकलेलें मुखत्राण तोंडावर चढविलें, अन् धनुष्य पेलीत घोडा त्या दिशेनें काढला. दगडांच्या अन् बाणांच्या वर्षावाची पर्वा न करतां दांत खात शक सैनिकांनींही आपले घोडे तिकडे दवडविले. थोड्याच वेळांत ते भिल्लवाड्यासमोर येऊन थडकले.

तोंपर्यंत बिस्ताना, भूखा, यांच्याही तुकड्या फूटाच्या दिशेनें धांवल्या होत्या. फूटा ओरडत होता,

"एकाही घोड्याला पुढें सरूं देऊं नका!"

पण शकांच्या बाणांचीं फळें अधिक चांगलीं घडलीं होतीं. त्यांची नेम मारण्याची गति भिल्लांपेक्षां अधिक सरस होती. वेताचे लांबसडक दांडे असलेले त्यांचे बाण मागील पिसाऱ्यामुळें अधिक वेगानें भिल्लांच्या शरिरांत घुसत.

चारसहा शक सैनिकांचें मोल देऊन शक सेनापतीनें अर्ध्या घटकेच्या आंतच भिल्लवाड्याचा मार्ग मोकळा केला. प्रतिकार संपला हें पाहून तो भिल्लांच्या आघाडीवर येऊन पोंचला. जखमी झालेले भिल्ल अजून प्राणांतिक वेदनांनीं तळमळत होते. कनिष्क म्हणाला,

"मैदानांतील नागर लोकांपेक्षां हे काळे दरिद्री वानर अधिक त्वेषानें लढले.

हंसत हुविष्क म्हणाला,

"पण कशासाठीं! या भणंगांजवळ लुटण्यासारखें तर कांहींच

दिसत नाहीं ! "

" गांवांत शिरून पाहूं या. पण कल्पना नसतां लढावें लागलें. "

" आपले चौघे मेले. दोघे मरूं घातले आहेत. दहावीसांना जखमा झाल्या आहेत— "

" जरा महाग पडला खेळ, नाहीं ? "

पण तो अजून महाग पडायचा होता. एका सालईच्या झाडावर जखमी ओंडल लपून बसला होता. अंदाजानें कनिष्काकडे त्यानें एक बाण सोडला. तो सणसणत येऊन कनिष्काच्या छातीवरचें चिलखत फोडून अंगुळभर आंत घुसला. त्वरित शकांचें लक्ष सालईच्या झाडाकडे गेलें. त्यांनीं त्या झाडावर इतके बाण मारले, कीं झाड जणूं झांकून गेलें. अंगाची चाळणी झालेला ओंडल खालीं कोसळला.

छातींतला बाण उपशीत कनिष्क ओरडला,

" त्याचें मस्तक तोडून भाल्यावर घ्या ! आणि त्या पलीकडल्याचें —त्याच्या शेजारच्याचें ! "

पहातां पहातां सातआठ भिल्लांचीं मस्तकें भाल्यांच्या टोंकांवर नाचूं लागलीं ! नंतर तो घोडेस्वारांचा थवा भिल्लवाड्याकडे वळला.

जखमी झालेले मरगा आणि भेला गांवांत धांवले होते. आपल्या जखमांवर पाल्याचा चोळलेला चोथा दाबीत ते आरडूं लागले,

" पळा ! पळा ! "

क्षुब्ध चोंगराय म्हणाला,

" कुठें ? "

कालिंग ताठपणें म्हणाला,

" चोंगाबाबा, जे एवढ्या लांबवर आले, ते नदीच्या दरडीपर्यंत आमचा पाठलाग करणार नाहींत काय ? "

" होय मुला, तेंही खरें आहे– "

" तर मग इथेंच गोल बांधून झुंजायचें. होईल तें होईल ! "

बायांमध्यें एकच कोल्हाळ उसळला होता. ओरडून कालिंग म्हणाला,

" रडण्यानें काय होईल? गप्प बसा ! "

तोंच दोघे शक घोडेस्वार बौद्ध भिख्खूंना पुढें करून वस्तींत शिरले ! या पाळीला शक हा डाव खेळत होते. कालिंगाच्या झोंपडीसमोर भिख्खू पोंचल्यावर शक घोडेस्वारानें वृद्ध भिख्खूला खूण केली.

कपाळावरून वहात असलेला रक्ताचा ओघळ पुशीत तो भिख्खु भिल्लांना म्हणाला,

" भो आरण्यांनो, शक सेनापति कनिष्काचा संदेश तुम्हांपर्यंत पोंचविण्याचें काम मीं पत्करलें आहे. हिंसा नाहींशी व्हावी, सर्वत्र शांतीचें साम्राज्य नांदावें, असा तथागताचा उपदेश आहे. त्याला अनुसरून मीं संदेशवाहक होण्याचें पत्करलें. तुमच्या योद्धयांना निर्वाणप्राप्ति झाली आहे. आतां पुनः हिंसा करायची शक सेनापतीची इच्छा नाहीं. मात्र एकच अट आहे. "

कालिंगानें स्वर ताब्यांत ठेवून विचारलें,

" कोणती ? "

" तुम्हीं तुमच्या आश्रयास आलेली नागरकन्या शकसेनापतीच्या स्वाधीन करावी— "

क्षुब्ध स्वरांत कालिंगानें म्हटलें,

" तुम्ही पिवळीं वस्त्रें ल्यालें नसतांत, तर याचें उत्तर मीं माझ्या बाणांनीं दिलें असतें ! "

" थांब पुत्ता ! माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ करून घेऊं नकोस. संयमावर निरतिशय श्रद्धा ठेवूनच तथागत बुद्धानें माराला जिंकलें. आत्मसमर्पणानें नागरकन्या शकसेनापतीचें विकृत मन जिंकूं शकेल– "

" ऐका. आम्हीं हें न केलें तर ? "

" पुत्ता, तथागताचा मार्ग सोडूं नकोस ! अरे, नालागिरिनामक मस्त हत्ती त्यानें केवळ आपल्या सरळ वृत्तीने ताळ्यावर आणला होता !

**अदण्डेन असत्थेन नागो दन्तो महेसिना !**

" मग शकसेनापति तर मनुष्य आहे— "

" थांबा थांबा !–" कालिंग ओरडत पुढें झाला. पाठीवरील भात्यांतून एक बाण काढून त्यानें भिख्खूसमोर धरला आणि तो गरजला,

" हें शूर भिल्लांचें उत्तर ! "

उष्ण श्वास टाकीत शक घोडेस्वार परतले. भिख्खूंना त्यांनीं फरफटत आपणांमागें चालविलें. इकडे शिवदत्त दोन्ही हातांनीं तोंड झांकून बसला होना. त्याला तिथेंच सोडून स्वर्णमयी पुढें झाली, आणि कालिंगाला म्हणाली,

" भैय्या, ऐक माझें ! माझ्या एकटीच्या जाण्यानें जर या मुली अन् बाळंतिणी वांचत असतील— "

एक क्षण न लागतां कालिंग उत्तरला,

" ताई, रात्रंदिवस वाघांलांडग्यांच्या शेजारीं राहाणाऱ्या भिल्लांच्या स्त्रिया या. या जगण्यामरण्याची चिंता फारशी करीत नाहींत. काय करूं ! फार थोडे दिवस माझ्या घरीं राहिलीस ! एरवीं दिलेल्या खंजिराचा उपयोग कसा करावा, हें तुला शिकविलें असतें ! "

स्वर्णमयीचे डोळे पाण्यानें भरून आले. ती म्हणाली,

" भाऊराया, तें मी सहज करीन ! तुझी बहीण झाल्यें आहें ना ! "

पुढें बोलायला त्यांना सवड सांपडली नाहीं. घोड्यांच्या टापांचा आवाज जवळ येऊं लागला. कालिंग आपल्या साथीदारांना सजग करतो न करतो, तोंवर शक सैनिक समोर दाखल झाले.

कालिंगानें आपलें धनुष्य सरसावलें. सशांनाही मारूं न इच्छिणाऱ्या कालिंगानें धनुष्यास बाण जोडला, आणि समोर दिसलेल्या पहिल्या

शकावर तो सोडला. पण या वेळीं शकांनीं धनुष्यें वापरलीं नाहींत. भाले पेलीत ते या आठदहा भिल्लांवर हंसत हंसत तुटून पडले.

कालिंगाच्या शेजारींच तंगा धनुकलीला बाण जोडीत होता. एका शकानें त्या लेंकराच्या पोटांत भाला खुपसला. कालिंग त्वेषानें त्याच्यावर धावून गेला. त्यानें तंगाला आपल्याखालीं घेतलें. त्याच्या पाठीवर खचाखच सात-आठ भाल्यांचीं फाळें रुपलीं. हें पाहून शिवदत्त त्याच्याकडे धांवत आला, तों एका स्वारानें त्याच्या काळजांत भाला मारला, आणि त्याला कालिंगावर फेंकून दिलें !

चोंगरायाचीही तीच गत झाली. मग शक सैनिक प्रतिकारशून्य अशा स्त्रीसमूहांत शिरले ! चूली आणि स्वर्णमयी हत्यारें सरसावून उभ्या होत्या. पण एका शकानें त्यांना पाठीमागून जाऊन धरलें, आणि हंसत त्यांचीं शस्त्रें काढून घेऊन तो म्हणाला,

" छे छे ! या हातांत हें शोभत नाहीं ! "

चूली त्याच्या हातावर झडप घालून त्याला चावली. पण तोंवर शकांनीं सर्व स्त्रियांना घेरलें होते. कनिष्काच्या सूचनेप्रमाणें त्यांनीं पटापट तरुण स्त्रियांना त्या किंचाळत असतांच घोड्यावर घातलें आणि वृद्ध स्त्रियांना भाल्यांनीं छिन्नविछिन्न करीत त्यांनीं घोडे परतविले.

****

# प्रकरण सहावें

पहांटची थंड झुळूक सुरू झाली. ती झुळूक जणूं काय अमृत घेऊनच आली. तिनें मरणाच्या दारापर्यंत पोंचलेल्या कालिंगाला शुद्धीवर आणलें.

कालिंगाच्या पाठीवर तीन जबर भाल्याचे घाव झाले होते. एक वरगडींत होता, दोन कमरेजवळ. बाकी वार कालिंगानें सहन केले असते. लहानपणीं त्याच्या कुत्र्याच्या पिलाला तरसाच्या तोंडून सोडवींत असतां तरसानें त्याच्या मांडीला चावा घेतला होता, दण्डही फोडला होता. शरिरांतून रक्त गेलें होतें. पण कालिंग भिल्ल होता. तो त्या जखमांतून फार लवकर बरा झाला होता.

त्याचा बाप चोंगारायाला म्हणाला होता,

"माझा लेक वांचत नव्हता–तरसाचे विषारी दांत लागले होते."

"अरे, तो भिल्लाचा पोर! रानांत कंदमुळें खाऊन जगणारा. तरस तरी याच रानांतला ना! तरसाचें विष भिल्लाला बाधत नाहीं."

याही जखमा कालिंगानें मानल्या नसत्या. पण पाठीवरल्या जखमांतली एक जखम थेट काळजापर्यंत जाऊन भिडली होती. जर भाल्याचें पातें गहूंभर पुढें सरून काळजाला चाटून परत फिरतें, तर कांहीं कालिंग पुनः शुद्धीवर आला नसता. त्या जखमेंतून अपार रक्त वाहिलें. त्यामुळें कालिंगाची शुद्ध हारपली, अन् तो खालीं तंगाच्या अंगावर कोसळला.

पण झळकेंतला गारवा त्याच्या देहाला शिवला. त्यानें त्याचें अंग मोहरून निघालें. त्याचें भान जाग्यावर येऊं लागलें. त्याला वाटूं लागलें, कीं खूप वेळ आपण झोंपलों होतों. अगदीं गाढ. आतां त्या झोंपेंतून आपल्याला जाग येत्ये आहे.

पण ही कळ कसली निघत्ये आहे अंगांतून! लोखंडी चिमट्यांत धरून करकचून आवळावें, तसें अंग ठणकतें कां? या इथें कमरेंत कांटा कसला शिरला आहे?

अन् हें आपल्या पोटाखालीं मऊ मऊ काय आहे? आपली अंथरा-यची मोळाची चटई इतकी मऊ कधींपासून झाली? अन् इतकी उबदार?

आपलें फाटकें घोंगडें कुठें गेलें? शेकोटींतला विस्तव विझला कीं काय? कीं आपण झोंपतांना लाकडाचें ढोणूक शेकोटींत घातलेंच नव्हतें?

एकदम त्याला वाटलें, कीं आपल्या खालचें उबदार अंथरूण हलतें आहे. आँ! हें असें काय! हातही कां हलवतां येत नाहीं आपल्याला? अन् मग अंथरूण कां हलतें, हें कसें कळायचें?

अरे! हें अंथरूण तर कण्हूंही लागलें आहे! आँ! हा तंगा तर नव्हे? हो! त्याचाच आवाज हा. मग हा आईच्या कुशींतून इथें माझ्याखालीं कशाला तडमडला! असा द्वाड मुलगा आहे!

पण हा कण्हतो कां? अन् मलाही आज हें अगदीं वेगळें कां वाटतें आहे!

आतांपर्यंत कालिंगानें डोळे उघडले नव्हते. त्याला तें शक्य झालें नाहीं. पण आतां त्याच्या पापण्या उमलल्या. पहांटच्या शुक्राच्या उजेडांत त्याला बरेंच दिसूं शकलें.

अरे हें काय!

त्याच्या मनांत वीज चमकावी तसें झालें. एकदम त्याला कालचें

सगळें आठवलें. मग तो मोठ्या यत्नानें बाजूला सरला, आणि तंगावरून हात फिरवूं लागला. पण तेवढ्या हालचालीनेंही त्याच्या जखमांमधून पुनः रक्त वाहूं लागलें.

तोंच त्याला दिसलें, कीं पूर्व दिशा फटफटत्ये आहे, अन् त्या प्रकाशांत कुणी एक माणूस खालीं वांकून कांहीं तरी शोधतो आहे.

कालिंग कण्हत म्हणाला,

"कोण तें ?"



तो माणूस कालिंगाचें बोलणें ऐकून एकदम थांबला. कालिंगाच्या आवाजाच्या रोखानें तो त्याच्याजवळ येऊन म्हणाला,

"कोण बोललें आतां ?"

कालिंगाला त्या माणसाचें बोलणें अगदीं वेगळें वाटलें. हा कांहीं भिल्ल नव्हे. कालिंग कण्हत बोलला,

"मी—कालिंग—"

कालिंगाच्या जवळ जाऊन तो माणूस खालीं बसला. कालिंगाच्या लक्षांत आलें, कीं हा बौद्ध भिख्खु आहे! तो भिख्खु कालिंगाकडे पहात कळवळून म्हणाला,

"अरे, तूं तर अजून अगदीं तरुण आहेस—"

कण्हत कालिंग बोलला,

"पण जखमी झालेला हा माझा भाऊ तर लहान मूलच आहे—"

भिख्खु पटकन् उठला. त्यानें तंगाला सरळ केलें. तो अजून पुरता शुद्धींत आला नव्हता. भिख्खु म्हणाला,

"पाणी कुठें आहे, तें मला सांगशील काय?"

"झोंपडींत—"

भिख्खु धांवत झोंपडींत गेला. जातांना त्याला कितीतरी प्रेतांना ओलांडून जावें लागलें. एका परळांत पाणी घेऊन भिख्खु परतला आणि त्यानें तें तंगाच्या तोंडांत घालून डोळ्यांस लावलें. तो कालिंगाला म्हणाला,

"तूं पाणी पिशील काय?"

"पण तुम्ही कोण आहांत?"

"मी? माझें नांव कूटदन्त—"

"तुम्ही भिख्खु आहांत काय?"

"भिख्खु? होतों—"

"होतांत?"

"होय. आतां साधा माणूस आहें!"

"काल तुम्ही इथें आलेल्या भिख्खूंमध्यें होतात काय?"

" होय. शक इथून परतत होतें, तेव्हां मीं नजर चुकवून पळालों. रात्रभर अंधारामुळें मला कांहींच करतां आलें नाहीं; पण आकाश उजळलें, तेव्हांपासून मी कितीजण अजून जिवन्त आहेत, तें पहात हिंडत आहें–"

कालिंगानें मोठ्या दुःखानें विचारलें,

" इथें–इथें काल–माझ्या दोघी बहिणी होत्या–त्यांचें काय झालें–"

" मित्रा, सर्व तरुणींना शक घोड्यांवर घालून घेऊन गेले."

ओठ चावीत कालिंगानें विचारलें,

" कोणत्या दिशेनें ?"

" पश्चिमेकडे–"

ताडदिशीं कालिंग उठून पश्चिमेकडे धांवूं लागला. पण पांच पावलें टाकतो न टाकतो, तोंच झीट येऊन तो पुनः खालीं कोसळला. थांबलेलें रक्त पुनः झरूं लागलें. भिल्खु त्याच्याजवळ पोंचला. डोळ्यांस पाणी लावून त्यानें कालिंगाला शुद्धीवर आणलें आणि म्हणाला,

" मित्रा, एवढा उतावळा कां झाला आहेस ?"

" अहो, त्या माझ्या बहिणी–मीं त्यांना वचन दिलें होतें–"

" त्या दोघींनाच ? तुझें वचन सगळ्या मालव प्रांतांतल्या–सगळ्या भारतांतल्या बहिणींस दिलेलें होतें. त्या सगळ्या बहिणी तुझ्या ओळखीच्या नाहींत, म्हणून काय झालें ! शकांच्या छावण्यांत त्यांचे पशुतुल्य अत्याचार सहन करीत त्या तुझी वाट पहात आहेत पण त्यासाठीं एवढी घाई करून कसें चालेल ?"

विव्हळ स्वरांत कालिंगानें विचारलें,

" मग मी काय करूं ?"

" तूं अगोदर बरा हो. माझ्या हाताला धरून ऊठ. ती झोंपडी कुणाची ?"

“ माझी—”

“ तर मग तिकडे चल. ”

कालिंग भिख्खूच्या आसऱ्यानें उठून झोंपडीकडे जाऊं लागला, तों त्याला तंगा दिसला. अस्फुट किंकाळी फोडून तो म्हणाला,

“ अहो, तो माझा आवडता धाकटा भाऊ—”

“ चिंता करूं नकोस. तुला झोंपडींत घेऊन गेल्यावर मी त्यालाही तिथें आणतों. ”

तोंपर्यंत उजळूं लागलें होतें. प्रेतांतून वाट काढीत ते दोघे झोंपडीच्या दाराशीं आले, तों त्यांना तिथें हृदय पिळवटून टाकणारें दृश्य दिसलें !

रक्ताच्या थारोळ्यांत दाराशींच मोघा मरून पडली होती ! कालिंगानें तिला पाहातांच आक्रोश करीत तिच्या अंगावर शरीर झोंकून दिलें. मोघेच्या मृत देहाला त्यानें घट्ट मिठी मारली. ती मिठी सोडवून त्याला शांत करीत आंत नेतां नेतां भिख्खूला अपार कष्ट झाले.

कालिंगाला ओट्यावरील चटईवर निजवून भिख्खु बाहेर गेला. त्यानें बेशुद्ध तंगाला उचलून आंत आणलें. त्याला कालिंगाशेजारीं ठेवीत भिख्खु म्हणाला,

“ तुझें नांव–हो ! कालिंगा, भिल्लांना जखमांवरलीं अनेक औषधें ठाऊक असतात. तुला एखादें ठाऊक आहे काय ? ”

कालिंग उमळून आक्रोश करीत म्हणाला,

“ आई ! ”

भिख्खु त्याच्याजवळ खालीं बसला. मोठ्या स्नेहानें तो म्हणाला,

“ मित्रा, दुःख तर तुला अपार झालें आहे. भिख्खु झालों असूनही मला तें उमजूं शकतें. पण लक्षांत असूं दे, कीं तुला या दुःखाचा प्रतिकार करण्यासाठीं जगलें पाहिजे. तूं काल कसा शूरपणें लढलास हें मी पाहिलें आहे. तुझी आईही त्या पशूंशीं झुंजून मग धारातीर्थीं

पडली. तेव्हां आतां शोक किती करशील? अन् हा तुझा धाकटा भाऊ जगायला नको का? मला एकही वनस्पति माहीत नाहीं—नाहीं तर तुला न विचारतां—"

शहाणा कालिंग उमगला. तो अर्धवट उठून बसला, आणि म्हणाला, "त्या तिथें—वळचणीला एका पळसाच्या पानांची पुडी आहे–तींत–"

भिख्खु पटकन् उठला. त्यानें पळसाच्या पानांची पुडी हुडकून काढली. ती उघडीत तो कालिंगाजवळ येत म्हणाला,

"हींत काय?"

"तींत तांबूस मुळ्या आहेत–"

"होय—"

"त्या दगडावर उगाळून जखमांवर त्यांचा लेप दिला, कीं रक्त थांबतें."

क्षणाचाही विलंब न करतां भिख्खूनें त्या मुळ्या उगाळल्या. आपल्या अंगावरील उपवस्त्र फाडून त्यानें कालिंग अन् तंगा या दोघांच्या जखमा लेप लावून पट्ट्यांनीं बांधून काढल्या. तंगा अजून शुद्धीवर आला नव्हता. भिख्खु म्हणाला,

"मित्रा, आतां मी कोण कोण जिवंत आहेत, तें पहातों—"

"पहा, आणि— "

"काय?"

"या मेलेल्यांचें—"

"माझ्या लक्षांत आहे–"

"भिख्खु उठून बाहेर आला. सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबर त्याला दिसलें, कीं बाहेर प्रेतांचा नुसता खच पडला आहे. त्यांत कोणीही जिवंत असल्याचें चिन्ह दिसेना. मग तो वस्तीच्या तोंडाशीं झालेल्या रणकंदनाकडे वळला. तिथें पोंचतो, तों त्याला कुणीतरी पाणी मागत आहे, असें आढळलें. तो कंका भिल्ल. कालच्या झुंजींत एका शकाच्या

बाणानें त्याचा एक हात साफ उडूनच गेला होता. कंकाही सकाळच्या गार वाऱ्यानें शुद्धीवर आला होता. त्याच्या घशाला कोरड पडली होती. पण तोंडांत थेंबभर पाणी घालील, असें कोणी त्याला दिसत नव्हतें.

भिख्खु दिसतांक्षणींच तो क्षीण स्वरांत म्हणाला,

" पाणी ! "

भिख्खूनें आपल्याबरोबर एका भोपळ्याच्या कमंडलूंत पाणी आणलें होतें. त्यानें तो कमंडलू कंकाच्या तोंडाजवळ नेत त्याला म्हटलें,

" अरेरे ! काय ही तुझ्या हाताची दशा ! "

पण पाणी पहातांच कंकाच्या अंगांत कुठून अवसान संचरलें, देव जाणे. दुसऱ्या हातानें कमंडलूवर झडप घालून त्यानें तो आपल्या तोंडाशीं लावला. घटाघटा पाणी पिण्याच्या गडबडींत कमंडलू जमिनी-वर पडून उलंडला. सर्व पाणी सांडून गेलें.

भिख्खूला तशा स्थितींतही हंसूं आलें. तो म्हणाला,

" असा हावरेपणा कां केलास ? आतां दुसऱ्या कुणीं पाणी मागितलें, तर मी कुठून देऊं ? "

कंका शरमिंदा होऊन भिख्खूच्या तोंडाकडे पाहूं लागला. भिख्खु म्हणाला,

" असूं दे. आतां तूं माझ्याबरोबर वस्तींत चल. तिथें कालिंगाला झोंपवून मी आलों आहें. पण थोडासा थांब. आणखीं कुणाला मदत करतां येईल का, तें मला पाहूं दे. "

पण भिख्खूचें तें पहाणें निष्फळ झालें. सर्व भिल्लांनीं झुंजतांना शरीरें धरतीमातेच्या कुशींत ठेवून दिलीं होतीं. थोडें दूर एका भिल्लाचें प्रेत पडलें होतें. तिथें तर कांहीं कोल्हीं एकत्र होऊन घिरट्या घालीत होतीं. भिख्खु दिसल्यानें तीं थोडीं बुजून झुडुपांत शिरलीं होतीं, इतकेंच.

मग भिख्खु कंकाला आधार देऊन झोंपडीकडे निघाला. कंकाच्या

धिप्पाड शरिराचा तोल सांवरणें त्याला फार कठिण झालें. पण कसा-बसा तो झोंपडीपर्यंत येऊन पोंचलाच.

झोंपडीबाहेर येतांच कंका एकदम थांबला. त्याची बायको दिसायला विद्रूप होती. पण तिचा स्वभाव फार चांगला होता. कंकाचें तिच्यावर फार प्रेम होतें. तिचें प्रेत आकाशाकडे तोंड करून अस्ताव्यस्त पडलेलें कंकानें पाहिलें, आणि तो किंचाळत त्याच्याजवळ जाऊन बसला.

" भूखी ! अग माझ्या बहुगुणी भूखी ! भूखी गे ऽ ! "

मग संतापानें थरथरत तो आपले केंस उपटूं लागला. शेजारीं पडलेले धोंडे उचलून तो दांत खात इकडे तिकडे भिरकावूं लागला. कटकटा दांत खात शिव्या देऊं लागला.

हें तांडव ऐकून कसाबसा उठून कालिंग झोंपडीच्या बाहेर आला. तो ओरडला,

" कंका, हें काय करीत आहेस ? "

" अरे कालिंगा, बघ—सत्यानास होवो त्यांचा—त्यांनीं माझ्या भूखीची केलेली दशा—"

भिख्खु त्याच्याजवळ जाऊन मायेनें म्हणाला,

" मित्रा, तुला याची सूड घ्यायचा आहे ना ? "

दांत खात कंका म्हणाला,

" मी त्यांना शोधून कडाकडा फाडीन ! "

" तर मग अगोदर जखम बांधूं दे पाहूं ! "

भिख्खूनें कसेंबसें समजावीत कंकाला झोंपडींत नेलें.

त्याच्या जखमेवर मुळीच्या उगाळाचा लेप करून ती बांधल्यावर भिख्खु कालिंगाला म्हणाला,

" मित्रा, आतां बाकीच्यांची गत ? "

" कोणीही जिवंत नाहीं काय ? "

कालिंगा, सगळे छातीवर जखमा होऊन मरण पावले आहेत. पाठीवर जखम एकाच्याही नाहीं—थांब. असा काळंजूं नकोस. तूं आपल्या धाकट्याला वांचवीत असतां तुझ्या पाठीवर जखमा झाल्या, हें मला माहीत आहे. पण हें सर्व वीरगतीला गेले आहेत."

कालिंग थोडा वेळ दुःखानें मान खालीं घालून बसला. भिख्खु म्हणाला,

"मित्रा, अशानें उशीर होतो रे!"

"हाय. वस्तीच्या शेजारीं एक मोठा चर आहे. कशासाठीं खणला होता कोण जाणे. चोंगाबाबा म्हणत, राहूं द्या, कधींतरी कामीं येईल. त्या चरांत—"

"आलें लक्षांत, तुम्ही दोघे बसा—"

"छे छे! तुम्ही एकटे दमून जाल—"

"पण तुम्हांला लगेच उठून माझी मदत करतां येईल?"

कंका उठून म्हणाला,

"चला!"

मग ते तिघे उठले. कालिंग तंगाकडे पहात म्हणाला,

"पण हा तंगा तर अजून बेशुद्धच आहे—"

"असूं दे. त्याची नाडी ठीक चालली आहे. तो लवकरच शुद्धीवर येईल. आपण इकडे लक्ष ठेवूं या म्हणजे झालें."

तंगाच्या अंगावर घोंगडें पांघरवून ते बाहेर पडले. सगळा शोक गिळून त्यांनीं हळूहळू सर्व प्रेतें चराजवळ आणलीं. एका बाजूला पुरुष, एका बाजूला स्त्रिया, अशीं तीं चरांत रचून झाल्यावर भिख्खु म्हणाला,

"मित्र हो! आतां माझ्या वेशाला न शोभणारी एक गोष्ट मी तुम्हांला सांगणार आहें."

" कोणती ? "

" मी भिख्खु—! होतों, आतां नाहीं. पण अजून तोच वेश अंगावर आहे. तर या तुमच्या मृतांच्या साक्षीनें एक प्रतिज्ञा करा ! "

" सांगा— "

" म्हणा, जोंपर्यंत मनुष्यजातीला न शोभतील, अशीं हिडीस कृत्यें करणाऱ्या या शकांचीं तोंडें या देशांतून काळीं होणार नाहींत, तोंपर्यंत आम्ही विसावा घेणार नाहीं ! "

" म्हटलें ! "

" ठीक ! तर मग मूठ मूठ माती टाकून तुम्ही इकडे व्हा. बाकी सर्व मी करतों. "

माती टाकतांना त्या दोघांचा शोक पुनः उमळून आला. ते दोघे बाजूला सरतांच भिख्खूनें दगड आणि मुरूम लोटून थोड्याच वेळांत सर्व प्रेतें झांकून टाकलीं.

मग भिख्खु म्हणाला,

" कालिंगा आतां एक करायचें. "

" काय ? "

" इथेंच राहिलांत, तर तुम्हांला सबंध वस्ती खायला उठेल. आपण तंगाला येऊन पलीकडील गुहांत रहायला जाऊं. फळें, छाया, पाणी, सगळें कांहीं तिथें आहे. तुमच्या जखमा बऱ्या झाल्यावर मग पुढचें पुढें पाहूं. "

" जशी तुमची इच्छा. "

****

## प्रकरण सातवें

भिल्खूनें केलेल्या शुश्रूषेनें ते तिघे फार लवकर बरे झाले. गुहेच्या थंडगार छायेंत ते रहात, भिल्खूनें आणलेलीं फळें खात, गुहेजवळ असलेल्या टाक्याचें पाणी पीत.

कंका कधीं कधीं एकाच हातानें फासे लावून पांखरें धरी, अन् तिकडेच भाजून तीं खाऊन टाकी. मात्र त्या दिवशीं तो गुहेंत पाऊल घालतांना थोडासा बिचके.

तंगाला सांभाळणें कालिंगाला थोडें जड गेलें. तो सारखा कालिंगाला विचारी,

" आई कुठें आहे ? "

कालिंग म्हणे,

" तिला फूलादेवी घेऊन गेली. "

" ती परत केव्हां येईल ? "

" तूं मोठा झाल्यावर.

एवढ्यानें तंगाचें समाधान होत नसे. तो म्हणे,

" भैय्या, चल तर मग. "

" कुठें ? "

" फूलादेवीकडे. "

मग मात्र त्याचें लक्ष दुसरीकडे वेधणें कालिंगाला अशक्य होई. तो नाना परी करी. तंगाला फुलपांखरें, कवड्या—अनेक प्रलोभनें

दाखवूनही जेव्हां त्याचें समाधान होत नसे, तेव्हां मग कालिंग त्याला म्हणे,

" तंग्या, तूं जर असा हट्ट करणार असशील, तर मग मीही तुला सोडून जाईन. "

" कुठें ? "

" कुठें तरी. जंजाळ रानांत. "

" मग मीही तुझ्याबरोबर येईन. "

" पण मी तुला न कळतां जाईन. "

" अजिबात न कळतां ? "

" हो. "

" कुणाला सुद्धां ? वनदेवाला सुद्धां ? "

" अगदीं कुणाला न कळतां. "

ही तर फारच गंभीर गोष्ट झाली. तर मग भैय्याचें ऐकलें पाहिजे.

" अन् मीं हट्ट न केला तर ? "

" तर मग नाहीं जाणार. "

" बरें मग नाहीं करीत हट्ट. पण चूली कुठें गेली ? "

कालिंगाची नजर तांबारून येई. त्याच्या मनांतला घाव वाहूं लागे. पण असाच सांभाळून तो म्हणे,

" ती सोर्णमयीच्या घरीं गेली. "

" तें घर कुठें आहे ? "

" फार लांब आहे. "

" किती ? "

" फार म्हणजे फार. खूप खच्चून बाण मारला, तर जितका लांब जाईल, त्याच्या कितीतरी पट. "

" म्हणजे या मोठ्या डोंगराच्या पलीकडे ? "

" त्याच्याही पलिकडे एक खूप मोठा डोंगर आहे. त्याच्या पलीकडे एक फार मोठी नदी आहे. तिच्या पलीकडे—"

गोंधळून तंगा म्हणे.

" म्हणजे तर फारच लांब ! "

" हो. फार लांब. "

" अन् ती परत केव्हां येईल ? अन् आपण इकडे रहायला कां आलों ? अन् चोंगाबाबा कुठें आहेत ? अन् काकी कुठें आहे ? अन्—अन् सोर्णमयी कुठें आहे ? "

अशा अडचणीच्या वेळीं भिख्खु धांवत येई. तो म्हणे,

" तंगा, तुला गोष्ट आवडते का ? "

" कशाची ? "

" कशाचीही. फुलाची, हरणाची, वाघाची–"

" तुम्हांला चिंगळ्यांची गोष्ट येते ? "

" नाहीं बुवा–"

" एका कोल्ह्याला उंदीर चावला होता–ती येते ? "

" थांब. तुला एक भिल्लाच्या मुलाची गोष्ट सांगितली तर ? "

" म्हणजे तर माझीच–"

" ऊं हूं ! फार जुनी गोष्ट आहे ती. "

" सांगा–सांगा "

अन् एकदां कालिंग, तंगा आणि कंका, तिघेही एकत्र बसले असतां भिख्खुनें गोष्ट सुरू केली. तो म्हणाला,

" किनई तंगा, एकदां फार पूर्वीं काय झालें कीं अशाच एका रानांत एक भिल्लाचा मुलगा रहायचा–"

" एकटाच ? "

" नाहीं रे ! त्याचे वडीलही होते कीं ! ते साऱ्या भिल्लांचे राजे

होते. त्यांचें नांव हिरण्यधनु. हिरण्यधनूच्या राज्यांतले भिल्लही तुमच्यासारखेच शिकारीवर जगायचे. कुठें हरणें मार ! कुठें, ससे मार ! कुठें डुकरें मार—"

"म्हणजे खूप मोठ्ठीं ?"

"होय. तर त्या हिरण्यधनूच्या मुलानें – एकलव्यानें – "

"माझ्यासारखाच होता का तो ?"

"होय. तुझ्यासारखा हट्टी मात्र नव्हता."

"मीही आतां हट्ट करीत नाहीं. नाहीं कीं नाहीं रे भैय्या ?"

"कधीं कधीं करतोस ?"

"आतां नाहीं करणार—सांगा पुढें !"

"तर त्या एकलव्यानें एक हरणाचें छोटुकलें पाडस पाहिलें. तें त्याला फार आवडलें– "

"मलाही आवडतें– "

"ऐक रे तंगा ! मधें बोलूं नये !" कालिंग म्हणाला.

"आतां नाहीं बोलायचा. सांगा पुढें."

"तर त्या पाडसाची आई एका लांडग्यानें ठार मारली होती. म्हणून तें पाडस उदासवाणें आंसवें गाळीत इकडून तिकडे भटकत होतें."

"बिच्चारें ! मीं त्याला घरींच आणलें असतें !"

"एकलव्यानेंही तेंच केलें. तो त्या पाडसाला त्याच्या झोपडींत घेऊन आला. मग रोज तो त्याला कोंवळें कोंवळें गवत खाऊं घालायचा. त्याला बरोबर घेऊन रानांत हिंडायचा. रात्रीं झोंपतांना त्याला आपल्या अंथरुणाजवळ बांधायचा. एकलव्याचा त्या पाडसावर फार लोभ जडला.

"पण एकदां एकलव्य त्या पाडसाला घरीं ठेवून वडिलांबरोबर

वनांत गेला. एकलव्याची आई कुठें बाहेर गेली, पाडस अंगणांत खेळत होतें—कोंवळे कोंवळे हरळीचे कोंब खात होतें. तों त्या लांडग्यानें एकदम त्याच्यावर झडप घातली!—"

तंगा उठला. दांत खात तो म्हणाला,

"आत्तां तो लांडगा कुठें असेल?—"

"कां?"

"मी अन् भैय्या जाऊन त्याला ठार मारतों!"

भिख्खु हंसत म्हणाला,

"अरे तंगा, ही फार जुनी गोष्ट आहे. आतांपर्यंत तो लांडगा कसा जगेल?"

खालीं बसत तंगा म्हणाला,

"तर मग तो मेला असेल?"

"होय. तो निश्चितच मेला. तर त्या लांडग्याच्या तोंडून पाडस वांचविणें एकलव्याच्या आईलाही अशक्य झालें. संध्याकाळीं एकलव्य घरीं आला. त्याला पाडस दिसेना! मग त्यानें आईला विचारलें. आई म्हणाली, तें लांडग्यानें नेलें. एकलव्य दांत खाऊं लागला. तो धनुष्य-बाण घेऊन बाहेर धांवत सुटला. वाटेंत त्याला हिरण्यधनु भेटले. एक-लव्याकडून जेव्हां त्यांनीं हकीगत ऐकली, तेव्हां ते म्हणाले,

'मुला, अगोदर तुला शस्त्रविद्या शिकली पाहिजे. म्हणजे मग तुला या रानांतले सगळे लांडगे ठार मारतां येतील. सगळीं हरणें सुखी होतील. सगळीं पाडसें मोकळ्या मनानें बागडूं शकतील.'

"त्या वेळीं या देशांत द्रोणाचार्य नांवाचा शस्त्रविद्येचा मोठा पंडित होता. कौरव अन् पांडव नांवाच्या राजपुत्रांना तो शस्त्रविद्या शिकवीत होता. एकलव्य एका सकाळीं द्रोणाकडे जाऊन पोंचला. त्याला नमस्कार करून तो म्हणाला,

संग्रहालय ... अनुक्रम ... दि. ... क्रमांक ... नों. दि. ... ग्रंथालय शाखा

‘ आचार्य, मी एकलव्य. ’

‘ तूं कशाला माझ्याकडे आला आहेस ? ’

‘ शस्त्रविद्या शिकण्यासाठीं. ’

पण तोंपर्यंत सगळे राजपुत्र एकलव्याजवळ गोळा झाले. त्यांनीं त्याची थट्टा करायला सुरुवात केली. कुणीं त्याची शेंडी ओढली. कुणीं त्याच्या पाठीवरलें हरणाचें कातडें हिसकलें. कुणीं त्याचें धनुष्य आणि बाण पळविले !

“ हें पाहून द्रोणानें त्याला एका बाजूला नेऊन म्हटलें,

‘ एकलव्या, तुला खरेंच शस्त्रविद्या शिकायची आहे का ? ’

‘ होय, आचार्य. ’

‘ गुरुदक्षिणा काय देशील ? ’

‘ हवी ती. माझें हें शरीर सुद्धां ! ’

‘ तुला शस्त्रविद्या कां शिकायची आहे ? ’

एकलव्य डोळे तांबारून म्हणाला,

‘ माझ्या रानांतले सगळे लांडगे ठार मारण्यासाठीं ! ’

‘ त्यांनीं तुझें काय केलें ? ’

‘ माझें गरीब हारिणीचें पाडस खाऊन टाकलें ! मी त्यांना कधींच क्षमा करणार नाहीं. एकेकाला वेचून ठार मारीन. ’

‘ म्हणजे काय होईल ? ’

‘ असें कां विचारतां आचार्य ? मग सगळीं पाडसें मोकळ्या मनानें रानांत बागडतील–तीं इवलीं इवलीं पाडसें ! तीं मनाला येईल तिथें खेळतील, गवत खातील, उड्या मारतील— ’

“ द्रोणाचे डोळे भरून आले. एकलव्याच्या डोक्यावर हात ठेवून तो म्हणाला,

‘ मुला, मी तुला शस्त्रविद्या शिकवूं शकत नाहीं, याचा मला फार

खेद होतो. हीं द्वाड मुलें तुला मजजवळ राहूं द्यायचीं नाहींत.'

एकलव्य खिन्न होऊन म्हणाला,

'तर मग आचार्य, माझ्या रानांतले लांडगे असेच पाडसांना खात राहतील काय ?'


'नाहीं मुला. तूंच त्या सगळ्यांना मारशील.'

'मला तर अजून धनुष्याला बाणही जोडतां येत नाहीं!'

'येईल. मुला, हें सगळें तुला येईल.'

'कसें ?'

" एकलव्याला कुरवाळून द्रोण म्हणाला,



"मुला, पाडसांविषयीचीं ही करुणा तुला शिकवील –"

" कुणाच्याही मदतीवांचून ?"

" होय. तुला कुणाचीही मदत घ्यावी लागणार नाहीं. जा. माझा तुला आशीर्वाद आहे. तुला सगळें येईल. तूं फार मोठा होशील. जा बाळ ! "

" एकलव्यानें द्रोणांचीं पाउलें आंसवांनीं भिजविलीं. त्यांचा आशीर्वाद घेऊन तो मुलगा परत रानांत आला. तिथें त्यानें मातीचा एक पुतळा तयार केला. ओबडघोबड. डोक्याच्या जागीं एक गोल दगडच दिला ठेवून ! हातापायांच्या जागीं नुसत्याच काठ्या. अन् मग कोळशानें कान आणि नाक काढलें. अंबाडीच्या तागाच्या केल्या दाढी अन् मिशा ! "

हें पुतळ्याचें वर्णन ऐकून तंगाला फार मजा वाटली. तो खो खो हंसूं लागला. इतका कीं, कालिंग म्हणाला,

" तंगा, तुला गोष्ट ऐकायची कीं नाहीं ?"

" नाहीं पण भैय्या, तूंच सांग ! किती छान पुतळा असेल तो ! अंबाडीच्या दाढीमिशा अन् कोळशानें काढलेले कान-नाक ! अहो अहो ! मी तुमचा पुतळा करूं का ? त्या एकलव्यापेक्षां छान करीन ! करूं का ? "

भिख्खूनें विचारलें,

" पण अगोदर गोष्ट पुरी होऊं देतोस ना ? "

" हो हो ! ही गोष्ट तर फारच छान आहे. सांगा पुढें. "

भिख्खु म्हणाला,

" असा तो पुतळा केल्यावर मग एकलव्यानें अभ्यास सुरू केला. त्यानें बाण मारण्यासाठीं निरनिराळीं झाडें ठरवलीं. कांहीं जवळ, कांहीं दूर. मग आपल्या त्या गुरुजींना म्हणजे पुतळ्याला विचारून त्यानें बाण मारणें सुरू केलें–"

कुतूहलानें तंगा म्हणाला,

" तो पुतळा एकलव्याशीं बोलत असे ? "

" तर ! "

" कसा ? "

हंसून भिख्खु म्हणाला,

" एकलव्य धनुष्याला बाण जोडून उभा राही. मग त्या पुतळ्याला बाण सोडूं कां म्हणून विचारी. मग आपणच म्हणे सोड ! मग तो सोडीत असे. असा त्याचा अभ्यास सुरू झाला. दिवस गेले, महिने उलटले, वर्षे चालतीं झालीं. थंडी, उन्हाळा, पावसाळा हे ऋतुही आले अन् गेले. मात्र एकलव्याचा अभ्यास बंद झाला नाहीं ! शेवटीं त्याला असें कळलें कीं, आपल्याला शस्त्रविद्या आली आहे !

" इथें बसून एका बाणाच्या टप्प्यावर असलेलें फळ आपण सहज तोडूं शकतों. बाणांची माळच्या माळ जोडून आपण तें फळ परत इथें आणूं शकतों. डोळे बांधून आपण सावज टिपूं शकतों. एकदां आवाज ऐकला, तर त्या आवाजाच्या दिशेनें आपण बाण सोडतों अन् तो सावजाला लागतो. एखाद्या आंब्याच्या भोंवतालचीं पानेंच तेवढीं खुडून आपण आंबा सुरक्षित ठेवूं शकतों. चांफ्याच्या झाडावरचें म्हणूं तें फूल आपण बाणानें अलगत उडवूं शकतों !–"

तंगा तोंड पसरून हें सगळें ऐकत होता. तो पटकन् म्हणाला,

" हें त्याला कुणीं न शिकवतां आलें ? "

" होय मुला. "

" मग मला अन् भैय्यालाही येईल ? "

" आलें पाहिजे. " असें म्हणत भिख्खु उठला. तंगानें आश्चर्यानें विचारलें,

" अहो, पण गोष्ट राहिली कीं ! "

" राहूं दे. आपण उद्यां पुरी करूं. "

कंका उठत म्हणाला,

" पूर्वींच्या लोकांना देवता वश होत्या, म्हणून त्या मुलाला हें जमलें. आतां त्या पहिल्या इतक्या प्रसन्न होत नाहींत-"

तंगा आश्चर्यानें म्हणाला,

" म्हणजे काय कंका ? "

" अरे, असें बघ ! पूर्वीं हात जोडून विनंती केली, कीं संकर महाराज धाऊन येत असे. बावनबीर अन् वेताल तर हरघडीं माणसांना भेटत. आतां त्या देवता भेटत नाहींत पूर्वींसारख्या. तेव्हां आतां हें असें कुणाला यायचें नाहीं-"

" कां यायचें नाहीं ? येईलच मुळीं ! " तंगा आग्रहानें बोलला.

भिख्खु हंसत कमंडलु घेऊन पाणी आणायला टाक्याकडे निघाला. कंका आणि तंगाला तिथेंच वाद घालीत सोडून कालिंग भिख्खूच्या बरोबर चालला. टाक्याजवळ गेल्यावर कालिंगाकडे पाहून भिख्खु हंसत म्हणाला,

" मित्रा, तूं आज फार अस्वस्थ झाला आहेस ! "

" होय ! "

" कां ? "

" एकलव्याची गोष्ट ऐकून. "

कांहीं क्षण स्तब्ध राहून एकदम कालिंग म्हणाला,

" शिवदत्तबाबा म्हणत होते, कीं पलिकडे मैदानांतल्या मोठमोठ्या गांवांत अजूनही आचारजी आहेत. ते धनुष्यविद्या शिकवतात. मी त्यांच्याकडे गेलों तर ? "

भिख्खुनें कमंडलु खालीं ठेवला. तो कालिंगाजवळ येऊन मोठ्या स्नेहानें त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाला,

" कालिंगा, मीं एकलव्याची गोष्ट याच हेतूनें सांगितली ! शक भाले चालविण्यांत फार पटाईत आहेत. त्यांचा बाणांचा माराही फार

जवर असतो. अन् त्यांची एकजूट—तर तूं शस्त्रविद्या शिकून ये, या वनांतल्या भिल्ल तरुणांना ती शिकव, त्यांची एकजूट कर. मग शक कांहीं आकाशांतून पडले नाहींत ! ”

कालिंग एकदम म्हणाला,

“ मी जाईन—पण ”

“ आतां पण कसला ? ”

“ मला त्यांचा ठिकाणा कोण सांगेल ? ”

“ मी सांगेन ! मित्रा—अप्सरेसारखी सुंदर पत्नी होती. ती देवानें नेली. म्हणून वैराग्य येऊन भिक्खूंच्या तांड्याबरोबर बाहेर पडलों. पण अजूनही अहिलवाडांत तूं अभिमानसिंहाचें नांव सांगितलेंस तर तुला कोण्या गोष्टीचें उणें पडणार नाहीं ? ”

आश्चर्यानें भिक्खूकडे पहात कालिंग म्हणाला,

“ तुमचें नांव अभिमानसिंह काय ? ”

“ माझें नांव कूटदन्त ! मुला, त्या आठवणी जाग्या करूं नकोस. मी माझ्या दंडांत बांधलेला हा ताईत तुला देतों. हा पर्वत उतरून पलिकडे गेलास कीं अगोदर तुला क्षिप्रा नदी लागेल. क्षिप्रेच्या तटाकीं सगळें शकराज्य आहे. पण तुला कोणी विचारणार नाहीं. तिथून पश्चिमेकडे श्रीक्षेत्र महाबलेश्वराचें अहिलवाड विचारलेंस, तर कोणीही तुला अहिलवाडची वाट दाखवील. तिथें पोंचल्यावर पंडित भोजदेवांचें घर शोधून त्यांना हा ताईत दाखव. ते शस्त्रविद्येचे आचार्य आहेत. त्यांना सांग, कीं भिक्खु कूटदन्तानें शकांच्या नाशासाठीं मला धाडलें आहे—”

“ म्हणजे अभिमानसिंहांनीं—”

“ चालेल. तूं परतेपर्यंत तंगाला मी सांभाळीन. त्याच्याविषयीं निश्चिंत अस. एवढें लक्षांत असूं दे, कीं मी याच गुहेंत तुझी वाट पहात असेन. इथेंच—”

****

## प्रकरण आठवें

अहिलवाडाबाहेर कांहीं उंट चरत होते. त्यांच्यामागें त्यांचे रक्षक चरवाहे गप्पा मारीत चालले होते. सर्वांग धुळीनें माखलेल्या कालिंगानें त्यांना विचारलें,

" काय हो ! अहिलवाड हेंच काय ? "

कालिंगाचा वेशही कांहीं फारसा नेटका नव्हता. त्याची भाषाही वरीच अशुद्ध होती. वरील वाक्य त्यानें असें उच्चारलें,

" का हौ, अहिलवार याही है का ? "

चरवाहेही कांहीं फारसे सुसंस्कृत नव्हते. कालिंगाचा वेश आणि भाषा ऐकून अगोदर तर ते खूप वेळ हंसत राहिले. कालिंगाला त्याचें आश्चर्यही वाटलें, आणि रागही आला. त्याची मुद्रा पाहून एक चरवाहा त्याच्याजवळ येऊन त्याला मोठ्या नम्रतेनें प्रणाम करीत म्हणाला,

" राजकुमार एकटेच पुढें आले ? सेना मागें येत आहे काय ? "

कालिंगाला कांहीं कळलें नाहीं. त्याला एवढें मात्र उमगलें कीं, हे चरवाहे आपली थट्टा करीत आहेत. तो अधिकच संतापून त्यांना कांहीं उत्तर देणार, तोंच दुसरा चरवाहा आदराचें ढोंग करून म्हणाला,

" महाराज, कुमारांनीं संतापायचें कांहींच कारण नाहीं. राजकुमारी महालाच्या दारांत आपलीच वाट पहात आहे ! हातांत आरतीचें तबक घेऊन– "

संताप अधिकच वाढून कालिंगानें आपलें धनुष्य हातीं पेलून बाणांस

हात घातला. मग मात्र एक म्हातारा चरवाहा समोर येऊन त्या दोघांना दटावीत म्हणाला,

"मागें व्हा रे! फाजील कुठले!"

मग तो कालिंगाला बोलला,

"भैय्या, तूं कुठून आलास?"

"रेवामैय्याच्या जंगलांतून"

"कुणीकडे निघालास?"

"अहिलवाडला."

"अहिलवाड तर हेंच आहे. इथें तुझें काय काम आहे?"

"मला पण्डित भोजदेवांकडे जायचें आहे."

"पंडित भोजदेवांकडे? तर मग असाच नीट जा. वेशींतून आंत शिरल्यावर अगोदर तुला उंटांचा एक बाजार भरलेला दिसेल. तिथून पुढें गेलास, कीं एक मोठा तलाव लागेल. त्या तलावाच्या पलिकडे पंचकुइयांत तुला पण्डित भोजदेवांचें घर कुणीही सांगेल. अन् हें बघ, या मुलांच्या थट्टेकडे तूं लक्ष देऊं नकोस. ते असेच चारगट आहेत."

कालिंग सरळ त्या दिशेनें पुढें चालला. त्याला वाटेंत कांहीं घोडेस्वार भेटले. घोडे पळवीत ते भरधांव पुढें निघाले होते. त्यानें वेशींतून आंत प्रवेश केला. उंटांच्या बाजारांत कितीतरी उंट आणि पिलांसह उंटणी उभ्या होत्या. त्यांच्याभोंवतालीं मालक आणि गिऱ्हाइकें यांची वादावादी चालली होती. मधूनच एखादा माजलेला उंट अनावर होऊन डुरकत होता. त्याचा मालक नकेल ओढून त्याला ताळ्यावर आणी.

तलाव बराच लांबरुंद होता. चहूंबाजूंनीं तो बांधून काढला होता. मधेंमधें त्याला घाटही बांधले होते. एका घाटावर उतरून कालिंगानें हातपाय आणि तोंड स्वच्छ धुतलें. तलावावर स्नान करणाऱ्या एका माणसाला त्यानें विचारलें,

" पंचकुइया कुठें आहे ? "

त्याच्याकडे निरखून पहात तो भला माणूस म्हणाला,

" तूं परदेशी दिसतोस. तुला पंचकुइया कशाला हवी आहे ? "

" तिथें पण्डित भोजदेव रहातात—"

" हो हो. असा नीट पुढें गेल्यावर एक मोठें शिवमंदिर लागेल, तिथें जाऊन विचार. "

त्यानें दाखविलेल्या वाटेनें मंदिराजवळ गेल्यावर कालिंगानें हातीं पूजापात्री घेऊन पुटपुटत चाललेल्या एका ब्राह्मणाला मोठ्या नम्रतेनें विचारलें,

" पण्डित भोजदेव कुठें राहतात ? "

तो महाब्राह्मण ताडकन् उसकून म्हणाला,

" अरे दुरून बोल ! थुंकी तरी किती उडवितोस ? कुणी शूद्र दिसतो आहेस–"

" मी भिल्ल आहें–"

" तेंच तें ! शूद्र काय आणि भिल्ल काय ! भिल्ल म्हणजे तरी पंच-जनच ना ! "

किंचित् शरमून कालिंग म्हणाला,

" मला पण्डित भोजदेव–"

" बैला, महापण्डित म्हण ! "

" म्हणतों–महापण्डित भोजदेव हवे आहेत–"

त्यांचा हा संवाद ऐकून तिथें आणीक एक वृद्ध ब्राह्मण आला होता. त्याच्याकडे वळून महाब्राह्मण म्हणाला,

" ऐका याचें ! धर्मदेव महाराज पंचजनांना महाबलेश्वराच्या देव-ळांत न्या. तिथें आचार्यजी एका पायावर उभे राहून रुद्रावर्तन करीत आहेत. त्यांना नेऊन भेटवा या नृपतींना ! "

मग ते दोघे खूप हंसले. कालिंग आश्चर्यानें त्या दोघांकडे पहात राहिला. म्हातारा ब्राह्मण हात नाचवीत म्हणाला,

" शुंभा ! पहातोस कांय टुकुरटुकुर ! आचार्य भोजदेव मध्यान्ह टळून जाईपर्यंत प्रत्यक्ष मगधाधिपति आले, तरी त्यांनाही भेटत नाहींत! चालला थेट मंदिरांत आचार्यांना भेटायला ! "

ते दोघे निघून गेले. कालिंग हताश होऊन तिथेंच एका बाजूला उभा राहिला. किती तरी माणसें त्याच्या अंगावरून आलीं आणि गेलीं. शेवटीं तो पुनः एकदां आचार्यांचा शोध घ्यायला निघणार, एवढ्यांत एक सामान्य वस्त्रें नेसलेला काटकुळासा ब्राह्मण त्याच्याजवळ येऊन थबकला. त्याच्याकडे निरखून पहात ब्राह्मणानें म्हटलें,

" परदेशी दिसतोस ? "

" हो-"

" दिसतेंच आहे. माझें नांव विष्णुशर्मा. पण सगळे मला कुबेर म्हणतात. मी दरिद्री आहें ना ? म्हणून. तूं मला नुसते शर्मा म्हटलेंस तरी चालेल. अन् एक लक्षांत ठेव, लोक मला बडबड्याही म्हणतात. त्याचें असें आहे,-पण तुझें नांव काय ? "

" कालिंग-कालिंग भिल्ल-"

" कालिंग भिल्ल ! असेनास का भिल्ल ! इथें महाबलेश्वराच्या दरबारांत सगळेच सारखे. स्वतः महादेवही तर एकदां माता गिरिजेसाठीं भिल्ल झाले होते. तुला माहीत नाहीं ती कथा ? अरे ! ऐक तर. एकदां काय झालें, माता पार्वती भिल्लीण बनून-पण तूं कुठला ? "

" मी रेवातीरचा. "

" रेवातीरचा ? अरे वा ! नर्मदा माता तर प्रत्यक्ष शांकरकन्या ! उत्तम ! मग निघालास कुठें ? "

" इथेंच आलों आहें. "

" भगवान् महाबलेश्वराच्या दर्शनाला? अरे वा! मग उभा कां राहिलास असा? चल ना! तुला दर्शन घडवतों. कांहीं दक्षिणा दिलीस, तर आशीर्वाद देईन. न दिलीस तरी देईन हां! माझ्याजवळ तसा दुजाभाव नाहीं. सगळे गरीब मलाच घेऊन देवळांत जातात. त्यांच्या जवळ असलें, तर देतात मला. नसलें, तर नुसतेच पायां पडतात. आपलें काय बिघडतें? तेवढाच पुण्यसंचय! चल!"

कालिंग अवघडून म्हणाला,

" कुबेर महाराज, दर्शन मी सावकाश करीन. अगोदर आचार्य भोजदेव कुठें भेटतील तें सांगाल तर फार उपकार होतील!"

" तुला कशाला हवे आहेत?"

" मी त्यांच्याजवळ शस्त्रविद्या शिकण्यासाठीं आलों आहें."

विष्णुशर्मा क्षणभर डोळे बारीक करून उभा राहिला. मग म्हणाला,

" तूं जेवलास कुठें?"

" आत्तां तर मी आलों आहें–"

" तर मग अगोदर घरीं चल पाहूं!"

संकोचून कालिंग म्हणाला,

" पण कुबेर महाराज—"

" द्रव्य नाहीं तुझ्याजवळ, हेंच ना! अरे नसायचेंच! मी उज्जयिनीला शास्त्र पढायला गेलों होतों, तेव्हां माझ्याजवळ कुठें होतें द्रव्य? चल लाजूं नकोस. अरे, मला मिळतें तें तुमच्याच तर आशीर्वादानें!"

विष्णुशर्मा पुढें निघाला. या निष्कपट ब्राह्मणाचा आग्रह कालिंगाच्यानें मोडवेना. बऱ्याच गल्ल्या ओलांडून शेवटीं ते दोघे एका जुनाट पडक्या घरांत पोंचलें. विष्णुशर्मा म्हणाला,

" ये ना आंत! इथें ओटीवर आलास तरी चालेल–ऐकलेंत काय हो! अहो गृहस्वामिनी! अतिथि आला आहे–"

मळकट वस्त्रें ल्यालेली विष्णुशर्म्याची बायको बाहेर आली. डोई-वरील पदर सरसा करीत तिनें विचारलें,

" कोण आहे ? "

" अगे, साक्षात् शंकराचा अवतार– "

कालिंगाला पाहून ब्राह्मणीचें तोंड कोमेजलें. तिच्याकडे पाहून ब्राह्मण म्हणाला,

" उदास काय होत्येस ? वाटेंत भेटला बिचारा; उपाशी होता. आपण महाबलेश्वराचीं वाहनें. त्याच्या दरबारांत कोणी उपाशीं राहिला, तर तो आदिदेव रागावेल ना ! प्रसाद तयार आहे ना ? आण इथें बाहेरच. "

ब्राह्मणीनें एका पत्रावळीवर गव्हाच्या कोरड्या रोटया आणि वांग्याचें भरीत आणलें. हातपाय धुवून कालिंग ओट्यावरच जेवायला बसला. त्याच्यासमोर बसून विष्णुशर्मा म्हणाला,

" हां; आतां सांगा. आचार्यांकडे कशाला आलास तूं ? हो ! शस्त्रविद्या शिकण्यासाठीं. पण त्यांची कीर्ति थेट रेवातीरापर्यंत कशी पोंचली ? "

क्षणभर अडखळून मग कालिंग म्हणाला,

" मला एका भिख्खूंनीं त्यांच्याकडे पाठविलें– "

" भिख्खूनें ? " आश्चर्यानें ब्राह्मणानें विचारलें.

" होय. "

" वा: मोठी मजाच आहे ! त्याचें नांव ?

कालिंग संकोचून बोलला,

" त्यांचें नांव मीं आचार्यांजवळ सांगितलें, तर नाहीं का चालायचें ? "

" असूं दे, असूं दे. न सांगितलेस तरी चालेल. आमच्या या धर्म-पीठांतही श्रमणांचा उपद्रव आहेच. बेटे वारंवार येऊन इथूनही शिष्य

“ भगवान् महाबलेश्वराच्या दर्शनाला ? अरे वा ! मग उभा कां राहिलास असा ? चल ना ! तुला दर्शन घडवतों. कांहीं दक्षिणा दिलीस, तर आशीर्वाद देईन. न दिलीस तरी देईन हां ! माझ्याजवळ तसा दुजाभाव नाहीं. सगळे गरीब मलाच घेऊन देवळांत जातात. त्यांच्या जवळ असलें, तर देतात मला. नसलें, तर नुसतेच पायां पडतात. आपलें काय बिघडतें ? तेवढाच पुण्यसंचय ! चल ! ”

*कालिंग अवघडून म्हणाला,*

“ कुबेर महाराज, दर्शन मी सावकाश करीन. अगोदर आचार्य भोजदेव कुठें भेटतील तें सांगाल तर फार उपकार होतील ! ”

“ [redacted] कशाला हवे आहेत ? ”

[redacted] त्यांच्याजवळ शस्त्रविद्या शिकण्यासाठीं आलों आहें. ”

विष्णुशर्मा क्षणभर डोळे बारीक करून उभा राहिला. मग म्हणाला,

“ तूं जेवलास कुठें ? ”

“ आत्तां तर मी आलों आहें– ”

“ तर मग अगोदर घरीं चल पाहूं ! ”

संकोचून कालिंग म्हणाला,

“ पण कुबेर महाराज—”

“ द्रव्य नाहीं तुझ्याजवळ, हेंच ना ! अरे नसायचेंच ! मी उज्जयिनीला शास्त्र पढायला गेलों होतों, तेव्हां माझ्याजवळ कुठें होतें द्रव्य ? चल लाजूं नकोस. अरे, मला मिळतें तें तुमच्याच तर आशीर्वादानें ! ”

विष्णुशर्मा पुढें निघाला. या निष्कपट ब्राह्मणाचा आग्रह कालिंगाच्यानें मोडवेना. बऱ्याच गल्ल्या ओलांडून शेवटीं ते दोघे एका जुनाट पडक्या घरांत पोंचले. विष्णुशर्मा म्हणाला,

“ ये ना आंत ! इथें ओटीवर आलास तरी चालेल–ऐकलेंत काय हो ! अहो गृहस्वामिनी ! अतिथि आला आहे–”

मळकट वस्त्रें ल्यालेली विष्णुशर्म्याची बायको बाहेर आली. डोई-वरील पदर सरसा करीत तिनें विचारलें,

" कोण आहे ? "

" अगे, साक्षात् शंकराचा अवतार-- "

कालिंगाला पाहून ब्राह्मणीचें तोंड कोमेजलें. तिच्याकडे पाहून ब्राह्मण म्हणाला,

" उदास काय होत्येस ? वाटेंत भेटला बिचारा; उपाशी होता. आपण महाबलेश्वराचीं वाहनें. त्याच्या दरबारांत कोणी उपाशीं राहिला, तर तो आदिदेव रागावेल ना ! प्रसाद तयार आहे ना ? आण इथें बाहेरच. "

ब्राह्मणीनें एका पत्रावळीवर गव्हाच्या कोरड्या रोट्या आणि आंब्याचें भरीत आणलें. हातपाय धुवून कालिंग ओट्यावरच जेवायला बसला. त्याच्यासमोर बसून विष्णुशर्मा म्हणाला,

" हां; आतां सांगा. आचार्यांकडे कशाला आलास तूं? हो ! शस्त्रविद्या शिकण्यासाठीं. पण त्यांची कीर्ति थेट रेवातीरापर्यंत कशी पोंचली ? "

क्षणभर अडखळून मग कालिंग म्हणाला,

" मला एका भिख्खूंनीं त्यांच्याकडे पाठविलें-"

" भिख्खूनें ? " आश्चर्यानें ब्राह्मणानें विचारलें.

" होय. "

" वा: मोठी मजाच आहे ! त्याचें नांव ?

कालिंग संकोचून बोलला,

" त्यांचें नांव मीं आचार्यांजवळ सांगितलें, तर नाहीं का चालायचें ? "

" असूं दे, असूं दे. न सांगितलेस तरी चालेल. आमच्या या धर्म--पीठांतही श्रमणांचा उपद्रव आहेच. बेटे वारंवार येऊन इथूनही शिष्य

" भगवान् महाबलेश्वराच्या दर्शनाला? अरे वा! मग उभा कां राहिलास असा? चल ना! तुला दर्शन घडवतों. कांहीं दक्षिणा दिलीस, तर आशीर्वाद देईन. न दिलीस तरी देईन हां! माझ्याजवळ तसा दुजाभाव नाहीं. सगळे गरीब मलाच घेऊन देवळांत जातात. त्यांच्या जवळ असलें, तर देतात मला. नसलें, तर नुसतेच पायां पडतात. आपलें काय बिघडतें? तेवढाच पुण्यसंचय! चल!"

कालिंग अवघडून म्हणाला,

"कुबेर महाराज, दर्शन मी सावकाश करीन. अगोदर आचार्य भोजदेव कुठें भेटतील तें सांगाल तर फार उपकार होतील!"

"तुला कशाला हवे आहेत?"

"मी त्यांच्याजवळ शस्त्रविद्या शिकण्यासाठीं आलों आहें."

विष्णुशर्मा क्षणभर डोळे बारीक करून उभा राहिला. मग म्हणाला,

"तूं जेवलास कुठें?"

"आत्तां तर मी आलों आहें–"

"तर मग अगोदर घरीं चल पाहूं!"

संकोचून कालिंग म्हणाला,

"पण कुबेर महाराज——"

"द्रव्य नाहीं तुझ्याजवळ, हेंच ना! अरे नसायचेंच! मी उज्ज-यिनीला शास्त्र पढायला गेलों होतों, तेव्हां माझ्याजवळ कुठें होतें द्रव्य? चल लाजूं नकोस. अरे, मला मिळतें तें तुमच्याच तर आशीर्वादानें!"

विष्णुशर्मा पुढें निघाला. या निष्कपट ब्राह्मणाचा आग्रह कालिंगा-च्यानें मोडवेना. बऱ्याच गल्ल्या ओलांडून शेवटीं ते दोघे एका जुनाट पडक्या घरांत पोंचलें. विष्णुशर्मा म्हणाला,

"ये ना आंत! इथें ओढीवर आलास तरी चालेल—ऐकलेंत काय हो! अहो गृहस्वामिनी! अतिथि आला आहे–"

मळकट वस्त्रें ल्यालेली विष्णुशर्म्याची बायको बाहेर आली. डोई-वरील पदर सरसा करीत तिनें विचारलें,

" कोण आहे ? "

" अगे, साक्षात् शंकराचा अवतार–"

कालिंगाला पाहून ब्राह्मणीचें तोंड कोमेजलें. तिच्याकडे पाहून ब्राह्मण म्हणाला,

" उदास काय होत्येस ? वाटेंत भेटला बिचारा; उपाशी होता. आपण महाबलेश्वराचीं वाहनें. त्याच्या दरबारांत कोणी उपाशीं राहिला, तर तो आदिदेव रागावेल ना ! प्रसाद तयार आहे ना ? आण इथें बाहेरच. "

ब्राह्मणीनें एका पत्रावळीवर गव्हाच्या कोरड्या रोटया आणि वांग्याचें भरीत आणलें. हातपाय धुवून कालिंग ओट्यावरच जेवायला बसला. त्याच्यासमोर बसून विष्णुशर्मा म्हणाला,

" हां; आतां सांगा. आचार्यांकडे कशाला आलास तूं? हो ! शस्त्रविद्या शिकण्यासाठीं. पण त्यांची कीर्ति थेट रेवातीरापर्यंत कशी पोंचली ? "

क्षणभर अडखळून मग कालिंग म्हणाला,

" मला एका भिख्खूनीं त्यांच्याकडे पाठविलें–"

" भिख्खूनें ? " आश्चर्यानें ब्राह्मणानें विचारलें.

" होय. "

" वाः मोठी मजाच आहे ! त्याचें नांव ?

कालिंग संकोचून बोलला,

" त्यांचें नांव मीं आचार्यांजवळ सांगितलें, तर नाहीं का चालायचें ? "

" असूं दे, असूं दे. न सांगितलेस तरी चालेल. आमच्या या धर्म-पीठांतही श्रमणांचा उपद्रव आहेच. बेटे वारंवार येऊन इथूनही शिष्य

गोळा करून घेऊन जातातच. पण त्या भिल्लूनें तुला कशासाठीं पाठविलें ? शस्त्रविद्या शिकण्यासाठीं ?"

"होय.'

क्षणभर थांबून ब्राह्मण म्हणाला,

"गड्या, तुझें काम होणें कठिण आहे. !"

"कां ?"

"काय सांगूं ? देशांत शकासुरांचा उपद्रव सुरू झाला आहे ना ? त्यांच्या पराभवासाठीं आचार्य ब्राह्ममुहूर्तापासून मध्यान्हापर्यंत एका पायावर उभे राहून मंदिरांत रुद्राचीं आवर्तनें करतात. अन् सायंकाळीं ते भोंवतालच्या मोठमोठ्या सामंतांच्या मुलांना शस्त्रविद्या शिकवितात. त्या सामंतपुत्रांना तुझ्याबरोबर शिकणें कसें बरें वाटेल ?"

"कां नाहीं वाटायचें ?"

हंसत विष्णुशर्मा म्हणाला,

"तूं दरिद्री भिल्ल आहेस ना ? आपल्यामध्यें तूं कसा चालशील त्यांना ?"

"अन् मग तुम्हांला कसा चाललों ?"

"आलें लक्षांत. पण मी तर आतां दरिद्र्यांचा पंडा म्हणून चहूंकडे माहीत झालों आहें बाबा रे ! कधीं हे भेद मिटायचे ते मिटोत."

"तर मग आचार्यांची भेटही व्हायची नाहीं ?"

"वा वा ! भेट कां नाहीं व्हायची ? अवश्य होईल. माझ्यावर त्यांची तशी मोठी कृपा आहे. आज सायंकाळींच आपण त्यांना भेटायला जाऊं. जेवण उरकल्यावर तूं इथेंच ओट्यावर थोडी विश्रांति घे. मी पुनः बाहेर जाऊन येतों. सायंकाळीं आचार्यांना भेटल्यावर मग देव-दर्शनाला जाऊं. अरे क्षेत्रांत आल्यावर देवदर्शन करावें, आलें ना लक्षांत ?"

भोजनानंतर कालिंग तिथेंच थोडा विसांवला. सुमारें दोन घटकांनीं विष्णुशर्मा परतला, अन् पुनः मग कालिंगाशीं बोलत बसला—म्हणजे एकटा ब्राह्मणच बोलत होता. कालिंगाला एखादंदुसरा शब्द बोलायची संधि मिळाली न मिळाली, तों पुनः ब्राह्मणाचा शब्दयज्ञ सुरू होई !

सायंकाळीं ते दोघे बाहेर पडले. वाटेंत भेटलेल्या बहुधा प्रत्येक ओळखीच्या माणसाशीं विष्णुशर्मा बोलत होता. कांहीं वेळ कोणीच भेटले नाहीं, तेव्हां तो कालिंगाला म्हणाला,

" ऐकलेंस काय मित्रा, सगळ्यांशीं संबंध चांगले ठेवावेत. भाग्याची रेघा कधीं कुठून कशी उमटेल, तें कां सांगतां येतें ? एखादे दिवशीं कुण्या भल्या माणसाच्या रूपानें प्रत्यक्ष भगवान शंकर उभे रहायचे, अन् जन्माची ददात दूर व्हायची ! प्रपंच चालवितांना ब्राह्मणीला फार कष्ट होतात रे ! "

शेवटीं ते दोघे गांवाबाहेर एका रंगशालेजवळ पोचले. तिथें जें दृश्य दिसलें तें पाहून कालिंग थक्क झाला.

कांहीं युवकांनीं घोडे रंगणावर धरले होते. कांहीं जण समोर मांडलेल्या लक्ष्यांवर बाण सोडीत होते. कांहीं खड्गें फिरवीत होते, तर कांहींनीं आपल्या भाल्यांच्या फेंकी करणें चालविलें होतें. एक तेजस्वी, धूतवस्त्र परिधान केलेले धिप्पाड गृहस्थ त्या सर्वांमध्यें हिंडून त्यांना निरनिराळ्या सूचना करीत होते. त्यांच्या मस्तकावर काळा कुळकुळीत, अति स्वच्छ केशभार होता. लांब मिशा, दाढी मुंडलेली, गळ्यांत स्वच्छ जानवें.

विष्णुशर्मा त्यांच्याकडे बोट दाखवून म्हणाला,

" बघ ते आचार्य ! "

" ओळखलें ! "

कालिंग आचार्यांकडे पहात राहिला. ते एका धनुष्यधारी युवका-जवळ थांबून म्हणाले,

"नीट—डाव्या हाताची मूठ मजबूत—प्रत्यंचा नीट स्वच्छ काना-पर्यंत ओढ—थरथरूं देऊं नकोस. अगदीं सहज झाली पाहिजे ही क्रिया. बाणाची पुच्छाजवळची खांच नीट प्रत्यंचेत वसूं दे. अगदीं चपखल—आतां लक्ष्याकडे दृष्टि—बाणाचें टोंक, पुच्छ अन् लक्ष्य—तिन्ही एका रेषेंत येऊं दे—आतां किंचित् वर उचल—धनुष्य नव्हे, पुढचें टोंक—श्वास रोधून धर—धरलास? तयार? दे सोडून! शाब्बास! थोडेंसें चुकलें. येईल पुढल्या वेळेला!"

मग ते एका खड्गधाऱ्याकडे गेले. किंचित् उपरोधानें त्याला म्हणाले,

"वाः! प्रेतांचा नुसता सडा पडला भोंवतालीं!: वा रे वीर! भल्या माणसा, असें लटपटीत खड्ग धरून केळीचें पान तरी कापलें जाईल का? मुठींत नीट खड्ग जमूं दे. मूठ नीट जमली तर पुढलें पातें फिरतांना कळत सुद्धां नाहीं. हां, अस्सें:! आतां काढ वार. तिरका—! तिरका छेद गेला पाहिजे. अन् वारा वाजला न पाहिजे. कर कर, अभ्यास कर!"

कालिंगाची विस्मयचकित मुद्रा पाहून विष्णुशर्मा म्हणाला,

"काय कालिंगा? कसें काय आहे?"

"काय बोलूं? माझ्याच्यानें बोलवत नाहीं."

"कां रे?"

"हें असें मीं कधींच पाहिलें नव्हतें!"

"नव्हतेंस?"

"ऊंहूं! आम्ही भिल्ल शिकार करतों. आमच्यांतले चांगले शिकारी बाण मारतात. खूप ताकत. पण असलें शिक्षण कुठें? दहा बाण मारतील, तेव्हां एक लागायचा. पण आचार्यांचें सगळेंच वेगळें!"

" गड्या, तूं तर खूप लोभावला आहेस. पण हे सगळे विद्यार्थी पाहिलेस ना ? एकेकाचीं वस्त्रें बघ. त्या पलिकडच्याच्या धोतराची जरीची किनार नेऊन बाजारांत विकलीस, तर वर्षभर पुरेल एवढें धान्य विकत मिळेल. पण भाला कसा चालवतोय बघ. जसा दुधाच्या कढईंत झारा फिरवतोय् ! हे सगळे मोठ्या बापांचे लाडू आचार्यांनीं धरून शिकायला बसवले आहेत. तुझें कसें जुळायचें यांच्यांत ? "

तोंवर सूर्यास्त व्हायला आला. एकेक विद्यार्थी आचार्यांना नमस्कार करून घरीं परतला. ते एकटे राहिले, असें पाहून विष्णुशर्मा कालिंगाला घेऊन पुढें झाला. हंसत आचार्य म्हणाले,

" काय कुबेर पंडित ? देवभांडाराचा बंदोबस्त कसा काय आहे ? "

" कुशल आहे महाराज– ? "

तोंवर कालिंगानें आचार्यांपुढें साष्टांग नमस्कार घातला होता. आशीर्वाद देत आचार्य म्हणाले,

" हा कोण अतिथि ? "

" ज्ञानेच्छु विद्यार्थी आहे महाराज. पण दरिद्री आहे महाराज– रेवातीरचा महाराज– "

मान खालीं घालून, हात जोडून कालिंग म्हणाला,

" आचार्य, मी भिक्खु कूटदन्तांकडून आलों आहें– "

चमकून आचार्य म्हणाले,

" कूटदन्तांकडून ? म्हणजे– "

" अभिमानसिंहांकडून. ही त्यांनीं दिलेली खूण ! "

कालिंगानें दिलेला ताईत आचार्यांनीं तत्क्षणीं ओळखला. एकदम त्यांचे डोळे ओलावले. स्वर स्वच्छ करीत ते म्हणाले,

" तो माझा सुहृद् कुठें आहे ? "

" आचार्य, ती मोठी कथा आहे– "

" सांग मुला, सांग ! "

कालिंगानें सांगितलेली कथा ऐकतांना अनेकदां आचार्य गहिंवरले. ती ओबडधोबड भाषेंत सांगितलेली हृदयाची कथा होती. तींत कालिंगानें आपलें सर्वस्व ओतलें होतें. शेवटीं डोळे पुशीत तो म्हणाला,

" आचार्य, ही अशी माझी–माझ्या भिल्ल जातीची कथा. कूटदन्त म्हणाले, आचार्य तुला शिकवतील. त्या एका आशेवर मी इतका लांब आलों—"

आचार्य त्याला थांबवून म्हणाले,

" ऐक मुला. कूटदन्त–अभिमानसिंह हा माझा जिवलग मित्र. त्यानें परणून आणलेली पत्नी मला आपला पिता मानीत असे. ती देवानें नेली, अभिमानसिंहही नाहींसा झाला. त्याची सांगी मी शिरावर धरीन. मात्र तुला एक केलें पाहिजे—"

" काय ? "

" हा गंगायमुनांचा देश आज शकांच्या हिंस्र पावलांनीं अपवित्र झाला. तो पुनः शकशून्य व्हावा, म्हणून मी प्रयत्न करीत आहें. या विद्यार्थ्यांकडून शिकणें कितपत होईल, हरि जाणे. द्रव्य मात्र मिळूं शकेल. त्याचीही अत्यंत आवश्यकता आहे. तुला यांच्यावरोबर शिकविलें, तर हे बिथरतील. तूं हे शिकत असतां यांचे बाण परत आणून देत जा. यांना मी शिकवीन तें ध्यानीं धरीत जा. सायंकाळीं तूं एकटा अभ्यास करीत जा. चालेल ? "

पुनः दंडवत घालून कालिंग म्हणाला,

" आचार्य, शिक्षणासाठीं मी वाटेल तें करीन ! "

गंभीर स्वरांत आचार्य म्हणाले,

" तर मग मी तुला आशीर्वाद देतों, तुला विद्या येईल ! "

****

## प्रकरण नववें

आचार्य: भोजदेवांनीं कालिंगाला आपल्या आश्रमांतच ठेवून घेतलें. दुसऱ्या दिवसापासून त्याची ज्ञानसाधना सुरू झाली.

रोज सायंकाळीं ते श्रीमंत सामंतांचे गबाळये पुत्र आचार्यांच्या रंगशाळेंत येत. विद्या यावी, ही इच्छा त्यांतील अगदीं थोड्यांना. बहुतेक सगळे वेळकाढूच. घरच्या पालकांच्या आग्रहामुळेंच ते वर्गाला येत.

आचार्य येईपर्यंत रंगशाळेंत त्यांची निव्वळ टंगळमंगळ सुरू असे. दुसऱ्या दिवशीं असे काळकाढू जमल्यावर एक म्हणाला,

" काय अभिजिता, पाठ काय म्हणत्ये ? "

" छे रे ! लचक अजून निघाली नाहीं—" दुसरा उत्तरला.

" कशी निघणार ? रोज उगीचच वाऱ्यावर खड्गाचे वार काढावे लागतात ! "

" अगदीं खरें विचारशील शूरसिंहा, तर मला कांहीं हें अजिबात आवडत नाहीं ! "

" अन् इथें कुणाला आवडतंय् ? "

" अरे, परवां अंबुकाला सतत तीन घटका भाल्याचे हात करायला लावले आचार्यांनीं ! मी म्हणतों, येत्ये यांना शस्त्रविद्या. अरे म्हणून काय असें घामट काढायचें थोरांघरच्या मुलांचें ? शस्त्रविद्येंतल्या चार खुब्या हळूच सांगून टाकायच्या—झालें ! "

" आमचे पिताश्रीही असे आहेत !. परवां पण्डित दिग्गजाचार्य

वात्स्यायनाच्या सूत्रांवरली टीका समजावून सांगत होते—असा रंग आला होता ! तर दिलें इकडे धाडून !"

तेवढ्यांत त्यांना कालिंग दिसला. अभिजित हंसून म्हणाला,

" तो बघा, काळोखाचा पुतळा !"

" केवळ दांत तेवढे पांढरे दिसताहेत— "

" अन् डोळ्यांतला कांहीं भाग. "

" पण हा इथें कशाला ? ए, ए ! इकडे ये. "

कालिंग त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिला. त्याची भरदार उघडी छाती कांहीं शूरसिंहाला पाहवली नाहीं. तो खेंकसला,

" आमच्यासमोर छाती काढतोस ?"

" कुणासमोर उभा आहेस तूं ? "

" इथें कुणाच्या अनुज्ञेनें आलास ? "

" बोल ! कीं डोळ्यांत खुपसूं भाल्याचें पान !"

" पहा पहा ! त्याची दृष्टि पहा ! जसा लांडगा आहे भुकेजलेला— "

कालिंगाचे ओंठ संतापानें फुरफुरूं लागले. त्याच्या मुठी वळल्या. शूरसिंह घोड्यावर बसला होता. कालिंगाचा आवेश पाहून तो आपला घोडा त्याच्या अंगावर घालणार, तोंच आचार्य रंगशाळेंत आले. त्यांना पाहून सगळे गप्प झाले.

कालिंगाची मुद्रा पाहून आचार्यांनीं झाला प्रकार हेरला. ते जवळ येत म्हणाले,

" कालिंगा, काय झालें ? "

आवेग गिळून कालिंग म्हणाला,

" कांहीं नाहीं आचार्य !"

त्याचा संयम पाहून आचार्यांना बरें वाटलें. ते म्हणाले,

" ऐकलेंत मुलांनो, हा कालिंग भिल्ल. तुम्ही बाण सोडतां, ते परत

आणायची खटपट तुम्हांलाच करावी लागते. तुमचे श्रम वांचावेत, म्हणून त्या कामावर मीं आजपासून याची योजना केली आहे. मात्र केवळ हा रंगशाळेंतलेंच काम करील. एऱ्हवीं तुम्हीं याला काम सांगतां कामा नये. आलें लक्षांत ? "

" उत्तम आचार्य ! हें फार चांगलें झालें ! " एका जाड्या विद्यार्थ्यानें जांभई देत म्हटलें.

" काय चांगलें झालें ? " दुसऱ्या एका उंच विद्यार्थ्यानें हळूच प्रश्न केला.

त्याच स्वरांत जाड्यानें उत्तर दिलें,

" तुला कळत नाहीं. हा आपण आचार्यांवर मिळविलेला विजय आहे. "

" कसा काय ? "

" अरे, आजपर्यंत आचार्यांचा आग्रह असा कीं, ज्यांचीं कामें त्यांनींच करायचीं ! आतां पादडायला बरें एक सोंग हाताशीं आलें ! "

वर्ग सुरू झाला. लक्ष्यभेद करणारे आपापलीं धनुष्यें सांवरून एका वेळींच लक्ष्यांवर बाण मारूं लागले. कालिंग धांवत जाऊन त्यांचे बाण परत त्यांच्याजवळ नेऊन देई. पण कालिंगानें एवढे कष्ट केले, तरी सामंतपुत्रांचें समाधान होईना. म्हणून मग त्यांनीं बाण मारणें मागेंपुढें केलें. कालिंग एकाचा बाण घेऊन परततो आहे, तोंच दुसरा वीर ओरडे,

" अरे, बघतोस कुणीकडे ? बाण आण माझा."

कालिंग त्याचा बाण घेऊन धांवत सुटे, तों आणीक एक वीर खेकसून म्हणे,

" ए आंधळ्या ! माझा बाण दिसतो कीं नाहीं तुला ? "

अगोदर कांहीं दिवस तर कालिंगाला अपार परिश्रम करावे लागले.

दुपारपासून तों सायंकाळपर्यंत तो सारखा धांवत असायचा. एवढ्यानेंच भागलें नाहीं. इतर अतिरथी अन् महारथीही त्याला कामें सांगत. भाला लक्ष्याकडे फेंकून एकजण म्हणे,

"ए भिल्ला, तूं फार चांगला पळतोस गड्या! तेवढा तो भाला आण ना माझा!"

दुसरा त्याची प्रशंसा करून त्याला सांगे,

"ए, जरा माझ्या घोड्याचा लगाम धरून पळ कीं! तो अवखळपणा करतोय्—"

एका महाभागानें तर त्याला म्हटलें,

"ए काळोखा! जरा तिथें उभा रहातोस का?"

"कुठें?"

"त्या तिथें—अजून थोडा दूर— हां आतां तुझा हात पसर. त्याचीं बोटें फांकून धर. मी तुझ्या दोन बोटांतून बाण मारतों."

"अन् त्याच्या हाताला लागला तर?"

"मग? तो काय एवढ्याश्या जखमेची चिंता करील? तो भिल्ल आहे!"

हें सगळें कालिंग मुकाटयानें सहन करी. आचार्यांचें इकडे संपूर्ण लक्ष होतें. ते कालिंगाची जणूं परीक्षाच पहात होते. पण कालिंग निरतिशय श्रद्धेनें हे कष्ट झेलीत आहे, हें पाहून ते प्रसन्न झाले.

कालिंगाला पूर्वसूचना न देतां त्यांनीं चापविद्येच्या विद्यार्थ्यांना लक्ष देऊन शिकविण्यास प्रारंभ केला. लक्ष्याच्या वेधाची सरल गति, वक्रगति, मंडलगति, शरवर्षाव करणें, थांबून थांबून बाण मारणें, चहूंबाजूंस शरवर्षाव करणें, उताणे झोंपून बाण मारणें, पालथें निजून लक्ष्य वेधणें, दोन्ही पायांमधून बाण फेंकणें, चालतां चालतां शरवर्षाव करणें, पळत असतां लक्ष्याचा ठाव घेणें—नानापरी भराभर त्यांनीं विद्यार्थ्यां-

समोर ओतल्या. शेवटीं विद्यार्थी कंटाळले. पण कालिंग मात्र अत्यंत आनंदित होऊन हपापल्याप्रमाणें ती सर्व विद्या पिऊन टाकूं लागला.

वर्ग संपला, कीं बहुधा सर्व विद्यार्थी भराभर घरीं पळत. मग सगळ्या रंगशाळेंत एकटा कालिंग वावरे. चांदण्यांत रात्र उलटून जाई, पण कालिंगाचा अभ्यास संपत नसे !

तो भिल्ल होता. धनुर्विद्या त्याचें पिढ्यापिढ्यांचें धन होतें. केवळ



त्याचा विकास झाला नव्हता. इथें त्याला योग्य गुरु लाभला. कालिंगानें प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

कांहीं दिवस त्यानें आचार्यांस एकही प्रश्न केला नाहीं. केवळ ते विद्यार्थ्यांस शिकवीत असतां तो जिवाचे कान करून ऐकत असे. आचार्य मधूनच त्याच्याकडे तिरक्या नजरेनें पहात. त्याची एकाग्रता त्यांच्या ध्यानीं येई. मग ते विद्येंतले अधिकच बारकावे उलगडीत.

दिवसां कालिंग जें ऐके, तें तो रात्रीं घटवीत असे. प्रत्येक गतीवर त्यानें कसून श्रम केले. प्रत्येक लक्ष्यभेद त्यानें मनापासून अभ्यासला–थंडी, पाऊस, कशाचीही चिंता न करतां.

अन् मग एके दिवशीं आचार्य घरीं परतत असतां तो त्यांच्याजवळ जाऊन नम्रपणें बोलला,

“ आचार्य ! ”

हंसून आचार्य म्हणाले,

“ काय कालिंगा ! ”

“ आज थोडें थांबावें— ”

“ कां रे ? परीक्षा देतोस ? ”

“ नाहीं. अडलें तें विचारतों. ”

“ ठीक आहे. आज चतुर्दशी. मी सायंसंध्या उरकून येतों. मग स्वच्छ चांदण्याच्या प्रकाशांत–आलें ना लक्षांत ? ”

“ होय आचार्य ! ”

थोड्या वेळानें ते दोघे गुरुशिष्य रंगशाळेंत आले. आचार्यांसमोर दंडवत घालून कालिंग म्हणाला,

“ मी शिकलों तें करून दाखवितों– ”

“ होय रे मुला होय ? ”

अन् मग कालिंगानें एकामागून एक लक्ष्यवेध घेण्यास प्रारंभ केला. सगळीं लक्ष्यें त्यानें तडातड उडवलीं. अगदीं कठिणांत कठिण सुद्धां. मध्यें एवढेंसेंही न थांबतां तो गति आणि प्रकार बदली.

तों अचानक मध्येंच कालिंग थांबला. आचार्य उभे होते, त्या दिशेकडे तो टक लावून पाहूं लागला. आचार्य बोलले,

" थांबलास कां कालिंगा? काय पहात आहेस ? "

एकदम तो बाणाचें तोंड आचार्यांकडे वळवून धांवूं लागला, आणि कांहीं क्षणांतच त्यानें बाण सोडला ! आचार्यांच्या पावलांजवळ हातभर अंतरावर तो खप्पदिशीं जमिनींत रुतला. आचार्य हतबुद्ध होऊन त्याच्याकडे पाहूं लागले.

पुढच्या क्षणीं आचार्यांजवळ येऊन कालिंगानें धनुष्याचें टोंक जमिनीस टेंकलें, आणि कांहींतरी वर उचललें आचार्यांनीं पाहिलें तों–

तीन हात लांबीचा डोकें तुटलेला एक नाग धनुष्याच्या कामठ्यावर वळवळत होता ! त्याचें मस्तक पलीकडे पडलें होतें.

स्तिमित होऊन आचार्यांनीं विचारलें,

" माझ्या लाडक्या, तुला हें कसें दिसलें ? "

" लक्ष्याकडेच एकाग्र झालेल्या मला एकदम सळसळ ऐकूं आली. "

" पण इतक्या लांबून अन् एवढ्या कमी प्रकाशांत तूं नेमका त्याचा वेध कसा घेतलास ? "

" मला माहीत नाहीं आचार्य ! पण एकदां तुम्हीं सांगितलें होतेंत, उत्कटतेनें चटकन् वेध घेतां येतो–मला वाटलें, याला मारलेंच पाहिजे–हा मेलाच पाहिजे–नाहींतर–कांहीं क्षणांतच— "

" होय रे होय ! कांहीं क्षणांतच सगळें संपलें असतें ! "

कांहीं वेळ आचार्य न बोलतां उभे राहिले. नंतर गद्गद् स्वरांत त्यांनीं हांक मारली,

" कालिंगा ! इकडे ये ! "

कालिंग आचार्यांजवळ येऊन उभा राहिला. त्याला प्रेमानें कुरवाळून ते म्हणाले,

" मुला नुसतें ऐकून ऐकूनच शिकलास ना हें वेधकौशल्य?" विनयानें कालिंग म्हणाला,

" आचार्य, मला तर कांहींच येत नाहीं."

" तुला फार येतें रे, फार येतें—आज तूं तुझ्या गुरूला पुनर्जन्म दिला आहेस!"

" पण डोळे बांधून लक्ष्यवेध कुठें करतां येतो मला?"

" तो मी तुला शिकवीन! सर्वांसमोर प्रकटपणें."

" आचार्य–"

" होय मुला. त्या सर्व दगडांना उद्यां मी हें तुझें हस्तलाघव दाखवीन. मग तुला डोळे बांधून लक्ष्यवेध शिकवीन–"

कालिंग एकदम गहिंवरून मुसमुसूं लागला. त्याला पोटाशीं धरीत आचार्य म्हणाले,

" रडायला काय झालें बाळ? रडूं नकोस. जातीनें भिल्ल खरा. पण तूं अत्यंत परिश्रमांनीं विद्या हस्तगत केलीस. तुला फार कष्ट झाले–"

" कष्टांची मला संवय आहे आचार्य–"

" मग गहिंवरलास कां?"

" मला जर विद्या अगोदर शिकायला मिळाली असती तर–"

" तर काय?"

" माझी आई, माझ्या दोन बहिणी–"

" होय रे मुला होय! तुझें पाझरणारें मन मला उमगतें. पण थोडा थांब. तुला अनुकुल संधि लवकरच चालून येत आहे."

" कशाची संधि?"

" शकाधिप रोदरत्सेंगाच्या अत्याचारांनीं मालव राज्य त्रस्त झालें आहे. तिकडे सम्राट समुद्रगुप्तांच्या निधनानंतर त्यांचा थोरला पुत्र

रामगुप्त मगधाच्या गादीवर बसला आहे. राज्य चालविण्याचें तंत्र रामगुप्ताला माहीत नाहीं. केवळ कलाप्रियता अंगीं असली, तेवढयानें राज्यशकट हांकतां येत नाहीं. रामगुप्ताच्या या दुर्बलतेमुळेंच शक भारतांत इतका धुमाकूळ घालूं शकले. पण लवकरच शकांची सद्दी संपणार, अशीं लक्षणें दिसत आहेत.

" कशी काय ? "

" आम्हां सर्वांचें लक्ष मगधाधिप रामगुप्ताचा धाकटा भाऊ चन्द्र-गुप्त याच्यावर एकत्र झालें आहे. रामगुप्ताच्या राज्यांतच शकांनीं इतका धुमाकूळ घातला आहे, कीं चन्द्रगुप्त हें सर्व सहन करूं शकणार नाहीं. त्याला हातीं शस्त्र घेऊन उठावें लागेल ! "

" पण शकांचा पराभव होईल आचार्य ? "

" मुला, शकांचा पाहिला तडाखा असह्य असतो, हें मान्य. पण राज्य करणें शकांना माहीत नाहीं. त्यांना जें कधींच जमलें नाहीं, तें ते करूं लागले आहेत. वृत्तींत नाहीं, त्यासाठीं मूर्खासारखी धडपड चालली आहे त्यांची. अन् हेंच पराभवाचें मूळ आहे ! "

" तुमचें बोलणें सगळें समजलें नाहीं आचार्य ! पण तुमच्यावर माझा विश्वास आहे, भक्ति आहे. जर तुम्ही शकांचा नाश होण्यासाठीं धडपडत आहांत, तर तो झालाच पाहिजे. तुमच्यासारख्या देवमाणसाच्या शापापासून शक वांचूं शकत नाहींत— "

" तसेंच होईल मुला ! तसेंच होईल ! "

ते दोघे गुरुशिष्य घरीं परतले.

विष्णुशर्मा कधीं कधीं कालिंगाशीं गप्पा मारायला येत असे. या कठिण तपश्चर्येंत तेवढाच एक विरंगुळा होता. दुसरा कोणीही सखा-सोबती नाहीं. मग कालिंगाला त्या निरुपद्रवी, भावड्या माणसाचें बोलणें फार आवडे.

दुसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें कालिंग आचार्यांच्या घोड्याला खरारा करीत होता, तों लगबगीनें विष्णुशर्मा त्याला शोधीत आला. त्याला पाहतांक्षणींं विष्णुशर्मा ओरडला,

" कालिंगा काय करतो आहेस ? "

" खरारा— "

" अरे पुरे झाला खरारा ! तुला एकदां कडकडून मिठी मारूं दे–"

" कुबेर महाराज, विटाळ होईल ना–" :

" झाला तर पुनः स्नान करीन एकदां ! अरे पण हें सगळें केव्हां केलेंस तूं ? "

" काय ? "

" वा वा ! म्हणजे आम्हांला अजिबात सांगितलें नाहींस–"

" पण काय ? "

" काय सामान्य गोष्ट आहे ही ? वा वा—"

" अहो पण कुबेरमहाराज, काय ? "

" अरे मी तोंड गोड करण्यासाठीं मिठाईच आणणार होतों—"

" कशासाठीं ? "

" ब्राह्मणीला म्हटलें, एखादें नाणें असेल तर दे ! पण ती म्हणाली—"

" कुबेरमहाराज—"

" ती म्हणाली, त्याला घरीं घेऊन या ! तुला घरीं आलें पाहिजे हां ! "

" अहो पण—"

" छे छे ! पणबीण कांहीं चालायचें नाहीं ! "

" अहो—"

" तर काय ! ब्राह्मणी मोठी रागीट आहे बरें का ! नाहीं म्हणजे

उगीच रागावत नाहीं ! मी असें कांहीं तरी करून बसतों, म्हणून मग रागावते ती. तर तिनें अगदीं आज्ञाच केली म्हणेनास ! ”

“ कुबेरमहाराज ! कुबेरमहाराज ! मला एकदां समजूं द्या तरी ! काय झालें ? ”

“ काय झालें ? घ्या ! म्हणजे तुला माहीतच नाहीं ? ”

“ छे बुवा ! ”

“ अरे, स्वतः आचार्य–दुसरें तिसरें कोणी नव्हे, प्रत्यक्ष आचार्य बरें ! मी खोटें बोलायचा नाहीं. हां, बडबड करीन हवी तितकी. म्हणून तर लोक मला हंसतात— ”

“ अहो पण आचार्यांनीं काय केलें ? ”

“ काय केलें ? अरे भर देवळांत त्यांनीं सामन्त महासेनांना सांगितलें, कीं माझा कालिंग एकलव्य आहे ! ”

हें बोलतांना विष्णुशर्म्याचे डोळे भरून आले. पण ते न पुसतां हंसून तो म्हणाला,

“ स्वतः आचार्य तुला ‘ माझा कालिंग– ’ म्हणाले ! मुला, आहेस कुठें ? ”

कालिंगानें पटादिशीं वांकून विष्णुशर्म्याला नमस्कार केला. घवघवीत आशीर्वाद देत तो ब्राह्मण म्हणाला,

“ आज सायंकाळीं तुझे शस्त्रविद्येचे प्रयोग आहेत म्हणे ! कालिंगा, उद्यां माझ्या घरीं जेवायला आलें पाहिजे हां तुला ! ”

कालिंगाच्यानें बोलवलें नाहीं. त्यानें नुसतीच मान हलविली.

सायंकाळीं रंगशाळेचें आवार भरून गेलें होतें. कालिंग नेहमींप्रमाणें आचार्यांच्या अगोदर तिथें पोंचून सामंतपुत्रांच्या अभ्यासाची तयारी करीत होता. मात्र आज त्या लाडूगडूंची त्यांच्याकडे पाहाण्याची दृष्टि बदलली. शूरसेन त्याला म्हणाला,

" राहूं दे कालिंगा. तूं कशाला करतोस हें ? "

" अरे, जरा वरीं वस्त्रें नेस कीं !: हें माझें अंगवस्त्र कमरेला बांधतोस ? "

तोंच आचार्य आले. ते सर्वांचे प्रणाम घेत मातीच्या ओट्यावर जाऊन उभे राहिले. नंतर ते कालिंगाला हांक मारून म्हणाले.

" कालिंगा, ये मुला इकडे. "

शूर, नम्र कालिंग त्यांच्यापुढें जाऊन उभा राहिला. सामंत महासेनांकडे वळून आचार्य म्हणाले,

" सामंत, पाहिलात माझा एकलव्य ? "

" होय महाराज ! पण अजून त्याची विद्या अनुभवास आली नाहीं. "

" तीही येईल. कालिंगा, तुझें सामान्य धनुष्य आणि साधेच बाण— हं ! कर सुरू ? "

समोर उभारलेल्या फळ्यांना निरनिराळीं लक्ष्यें लावून ठेवलेलीं असत. कालिंगानें आचार्यांस साष्टांग नमस्कार घातला, आणि तो रंगशाळेच्या एका टोंकाला जाऊन उभा राहिला. सर्वजण त्याच्यासमोर असलेल्या लक्ष्यांकडे ध्यान देऊन बसले.

सपासप बाण सुटूं लागले. पटापट लक्ष्यभेद होऊं लागला. एका क्षणाची उसंत न घेतां कालिंगानें सगळीं लक्ष्यें फोडून टाकलीं. नंतर तो धांवत रंगशाळेच्या मध्यभागीं येऊन उताणा निजला. धनुष्यापासून बाण आकाशांत झेंपावूं लागले. पहातां पहातां सर्व दिशा त्यांनीं व्यापल्या. जसें एखादें कारंजें उडावें, तसें बाणांचें कारंजें कालिंगा-भोंवतीं तयार झालें. कालिंगा त्यांत दिसेनासा झाला !

हर्षनिर्भर होऊन समूह ओरडूं लागला,

" वा ! भले ! "

" आश्चर्य ! खरोखरीच आश्चर्य— "

" कालिंगा, तूं धन्य आहेस ! "

बाण खालीं उतरल्यावर कालिंग उठला, आणि पुनः एकदां आचार्यांस दंडवत घालून नम्रपणें उभा राहिला. डोळे पुशीत आचार्यांनीं त्याला कडकडून मिठी मारली. सामंत महासेन जवळ येत म्हणाले,

" आचार्य ! आज दृष्टीचें पारणें फिटलें ! याला काय देऊं ? "

" देतां ? सर्वांबरोबर प्रगटपणें अध्ययन करण्याची अनुज्ञा द्या ! "

" मी काय देणार ? ती अनुज्ञा तर यानें स्वतःच मिळविली आहे. "

****

## प्रकरण दहावें

दुसऱ्या दिवसापासून कालिंग विद्यार्थ्यांचा मुकुटमणि झाला. जो तो त्याला मदत करायची धडपड करी शूरसिंह त्याला म्हणाला,

" मित्रा कालिंगा, तुला घोड्यावर बसतां येतें काय ? "

" नीटसें नाहीं. "

" तर मग माझा घोडा घेऊन पांचदहा रिंगणें कां फिरेनास ! "

तेवढ्यांत अभिजित पुढें सरून म्हणाला,

" तूं तरी असा आहेस शूरसिंहा ! "

" कां ? काय झालें ? "

" तुझ्या नाठाळ पंचकल्याणी घोड्यानें कालिंगाला फेंकून दिलें म्हणजे ? "

मग अंबुकासिंह आपल्या घोड्यावरून उडी टाकीत म्हणाला,

" कालिंगा, तूं आपला माझाच घोडा घे रे ! "

दोघाचौघांनीं हात देऊन कालिंगाला घोड्यावर बसविलें. कालिंगानें लगाम नीट धरून घोडा पुढें काढला. स्वाराचें नवखेपण ओळखून घोड्यानें थोडी कुचराई चालविली. तेव्हां मग चारसहा विद्यार्थी घोड्यामागें त्याला हांकीत धावूं लागले. अंबुकासिंह लगामास हात देऊन पुढें पळूं लागला.

घोड्यानें वेग घेतल्यावर धांपा टाकीत धांवणारे विद्यार्थी जागींच उभे राहिले. मग ते ओरडून सूचना देऊं लागले.

" रिकिबींतले पाय हलूं देऊं नकोस– "
" थोडा पुढें झुकून बैस–हां, अस्सा!"
" लगाम फारसा ताणून ओढूं नकोस– "
" सैलसरच राहूं दे!"
" शाबास! छान!"
" आतां रिकिबींत पावलें रोवून उभा राहिलास तरी चालेल!"
" भले कालिंगा! तूं दोन दिवसांतच पटाईत अश्वारोही बनशील!"

एक घटका घोडा पळवून मग कालिंगानें लगाम ओढला. घामाघूम झालेला घोडा थांबला. लगेच सगळेजण कालिंगाकडे धांवले, आणि त्यांनीं त्याला घोड्यावरून खालीं उतरविलें. शूरसिंह म्हणाला,

" कालिंगा, तूं तर माझ्याही घोड्यावर बसूं शकशील. "

अभिजितानें पुष्टि दिली,

" बसेल तर काय झालें!"

आचार्य आल्यावर त्यांनीं स्वतः डोळे बांधून नाना परींचे ध्वनिवेध घेऊन दाखविले. नंतर कालिंगाचे डोळे बांधून त्यांनीं त्याला सांगितलें

" हां, आतां समोरच्या खांबावर काठीचा प्रहार होतोय्, तो ऐक ऐकलास?"

" होय आचार्य. "

" तो ध्वनि जिथून उमटतो आहे, तें ठिकाण लक्षांत घे. ध्यानांत असूं दे, कीं ध्वनि चहूं दिशांना पसरत असतो. जमिनीजवळ अड-खळून तो पुनः वर उसळतो. म्हणून ती त्याची गति समजावून घे. ऐकलास ध्वनि?"

" होय आचार्य. "

" नेम धरलास?"

" धरला. "

" आतां बाण कणभर खालीं सरकवून सोडून दे अरे! थोडा चुकला. पुन्हा धर नेम. नीट सजगपणें—धरलास?"

" होय."

" दे सोडून."

कालिंगाचा बाण खप्पदिशीं खांबांत घुसला, आणि विद्यार्थ्यांनीं हर्षानें गदारोळ केला.

चार-आठ दिवसांत आचार्यांनीं त्यांना येत होती, ती सर्व धनुर्विद्या कालिंगास शिकविली. नंतर ते म्हणाले,

" कालिंगा, आतां मजजवळ कांहीं राहिलें नाहीं. मात्र मी तुला धनुर्विद्या देऊन श्रीमंत झालों आहे. धनुर्विद्या आली, कीं भाल्याची फेंक आणि तलवारीची हातघाई कांहीं फारशी अवघड नाहीं. आतां फार लवकर तूं त्या दोन्ही विद्यांतही प्रवीण होशील."

दुसऱ्या दिवसापासून कालिंगानें भाल्याचे आणि तलवारीचे हात घटवणें सुरू केलें. फार लवकर तो त्यांतही प्रवीण झाला.

एके दिवशीं तो आचार्यांच्याच घोड्यावर भरधांव रपेट करून बाणानें लक्ष्य वेधण्याचा अभ्यास करीत असतां शूरसिंह घोडा उधळवीत त्याच्याकडे आला. तो ओरडून म्हणाला,

" कालिंगा!"

घोडा थबकवून कालिंगानें विचारलें,

" मला कांहीं सांगत होतात?"

" होय, असशील तसा आचार्यांनीं तुला बोलाविलें आहे."

लगेच घोडा दौडवीत कालिंग आचार्यांच्या आश्रमाकडे निघाला. आश्रमाच्या बाहेरच घामानें न्हालेली एक सांडणी धापा टाकीत उभी होती. बाहेरच्या अशोकाच्या झाडाला घोडा गुंतवून कालिंग पडवींत गेला. व्याघ्रासनावर आचार्य बसले असून शेजारींच धुळीनें वस्त्रें माख-

लेला एक सशस्त्र पुरुष बसला होता.

" बैस कालिंगा. " आचार्य म्हणाले. नंतर त्यांनीं सशस्त्र पुरुषाला विचारलें,

" पाटलीपुत्रांतील सैन्य तयार आहे काय ? "

" होय महाराज. "

" तुमच्या हेरांनीं नीटपणें तपास केला आहे काय ? "

" त्यांची माहिती अगदीं आंतील गोटांतली आहे. "

" आतां तुम्हांला कशाची आवश्यकता आहे ? "

" आम्हांला नार्मदीय वनप्रदेश तेवढा बंदिस्त हवा आहे. "

" म्हणजे ? "

" म्हणजे त्यांना तिथें आसरा न मिळाला पाहिजे. "

" हें किती दिवसांत झालें पाहिजे ? "

" नुकता वसन्तऋतु लागतो आहे. वर्षा लागण्याच्या आंत हें उरकलें पाहिजे. "

आचार्य कांहीं वेळ चिंतन करीत बसले. मग कालिंगाकडे वळून ते म्हणाले,

" कालिंगा, तुला कांहीं यांतलें उमगलें काय ? "

" नाहीं आचार्य. "

" न कळूं दे. तुझ्या प्रांतांत एकूण तरुण भिल्ल किती भरतील ? "

" कांहीं नेमकें सांगतां येणार नाहीं. "

" एक हजार भिल्लांना तूं दीड महिन्यांत तयार करूं शकशील काय ? "

" आपली आज्ञा असेल तर करीन. "

" तर मग ऐक, एक महिन्यांत मागधसेना मालव प्रांतांची वाट चालूं लागेल. तिला मालवांत पोंचायला सुमारें पंधरा दिवस लागतील

तोंपर्यंत तूं तुझें भिल्ल सैन्य तयार कर. या गृहस्थांचें नांव शक्तिपाल. हे तुला येऊन भेटतील. कुठें भेटायचें तेवढें सांग म्हणजे झालें."

थोडा वेळ विचार करून कालिंग म्हणाला,

" नर्मदामैय्याच्या उत्तर तटाकावर पातालेश्वराचें स्थान आहे–"

शक्तिपाल म्हणाला,

" सांपडेल. पुढें ?"

" त्याच्या उत्तरेस दहा कोसांवर जंभदुर्ग आहे –"

" शोधून काढीन. तिथें ?"

" होय. तिथें वैशाखी पौर्णिमेला मी तुमची वाट पाहीन."

" ठीक आहे. आचार्य, निघूं मी आतां ?"

" जेवणही केलें नाहींत –"

" शकांचा निःपात झाल्यावर मग आपल्या आश्रमांत प्रसाद घ्यायला येईन आचार्य !"

आचार्यांना नमस्कार करून शक्तिपाल उठला, आणि सांडणीवरचें पालाण कसून वाटेला लागला. त्याला दारापर्यंत पोंचवायला गेलेले आचार्य परतून कालिंगाला म्हणाले,

" कालिंगा, वाट पहात होतों, तो क्षण जवळ येऊं पहात आहे ! नरभक्षक शकांची धाड या देशांतून कायमची घालवून देऊं, अशा निश्चयाने मागध सैन्य तयार आहे. तुला मात्र उद्यांच निघालें पाहिजे !"

" उद्यांच आचार्य !"

" होय मुला !"

" अजून तर मी कांहींच शिकलों नाहीं –"

" तूं फार शिकला आहेस. कुशल सेनापतीला एवढेंही लागत नाहीं."

कालिंगाचें तोंड एवढेंसें झालें. तें पाहून आचार्य हंसून म्हणाले,

"कालिंगा, तुझ्या दोघी बहिणींची आठवण तुला दिली पाहिजे काय ?"

" नको नको ! "

" तर मग उद्यांच नीघ. शकांचा निःपात कर, तीच माझी गुरु-दक्षिणा. माझा घोडा तूं घेऊन जा, म्हणजे लवकर पोंचशील. "

कालिंगानें आचार्यांचीं पावलें आंसवांनीं भिजविलीं. ते गहिंवरून म्हणाले,

" ऊठ माझ्या कालिंगा ! तूं यशस्वी होशील, असा माझा तुला आशीर्वाद आहे. "

त्या रात्रीं कालिंग विष्णुशर्म्याच्या घरीं गेला. विष्णुशर्मा नुकतांच संध्या करून उठत होता. कालिंगला पाहून आनंदित होऊन त्यानें आरडा सुरू केला,

" ब्राह्मणी, पाहिलेंस का ? घरीं कोण आलें आहे ? "

ब्राह्मणी हातीं दिवली घेऊन बाहेर येत म्हणाली,

" कोण ? "

कालिंगानें नमस्कार करीत म्हटलें,

" मी कालिंग. "

विष्णुशर्मा म्हणाला,

" अरे नुसता कालिंग नव्हे ! एकलव्य कालिंग – एकलव्या, प्रति-पदेच्या दिवशीं ब्राह्मणी तुझी फार आठवण काढीत होती. मीं म्हटलें, आतां कालिंग मोठा झाला आहे ! आतां तो तुझ्या घरीं कशाला येईल ? "

" छे छे ! कांहीं तरीच – "

" बरें, कांहींतरीच ! पण एकलव्या, तुला पौर्णिमेला मात्र जेवा-यला इथें आलें पाहिजे हां ! "

" कुबेरमहाराज, मी पौर्णिमेला इथें असणार नाहीं. "

ब्राह्मणीनें विचारलें,

" मग ? "

" माताजी, मीं उद्यांच माझ्या प्रांतीं निघावें, अशी आचार्यांची आज्ञा आहे. "

" उद्यांच ? "

" होय माताजी. "

मग कालिंगानें त्या दोघांस सर्व हकिकत सांगितली. शेवटीं म्हणाला,

" कुबेरमहाराज, हें कुठें बोलायचें नाहीं, बरें का ! "

" नाहीं रे बाबा—"

त्याला मध्येंच थांबवून कालिंग म्हणाला,

" कुबेरमहाराज, माताजी, तुमचे उपकार जन्मजन्मीं फिटायचे नाहींत. तुम्ही मला पहिल्या दिवशीं अन्नाला लावलेंत, आचार्यांची भेट तुमच्यामुळेंच झाली—"

त्याला पुरतें न बोलूं देतां ब्राह्मणी म्हणाली,

" बाबा रे, ही तर ज्याच्या नगरींत रहातों, त्याची कृपा आहे. "

विष्णुशर्मा मान हालवून हात जोडीत बोलला,

" तर काय रे बाबा ! त्याच्याच मनांत होतें, म्हणून हें घडून आलें. बघितलेंस ब्राह्मणी, महाबलेश्वर माझ्या हातून कसकशीं कामें करवून घेतो तीं ! तुझा विश्वास नाहीं माझ्या वागण्यावर, नाहीं तर लवकरच तुझें घर सोन्याच्या नाण्यांनीं भरून टाकीन ! "

" पुरे हो पुरे ! तर बाबा कालिंगा, उद्यांच निघणार ना तूं ? "

" होय. बहुधा उद्यां पहांटे. "

" तर मग थांब. "

ब्राह्मणी घरांत गेली, आणि महाबलेश्वरावर घातलेली फुलांची माळ आणि थोडा प्रसाद घेऊन बाहेर आली. तें तिनें कालिंगाला दिलें. कालिंग म्हणाला,

" हें काय माताजी ? "

" बाबा रे, हा महाबलेश्वराचा प्रसाद अन् त्यावर वाहिलेलीं फुलें आहेत. मात्र कालिंग, एक कर हां ! "

" काय ? "

" हा प्रसाद नेणाऱ्याला काम झाल्यावर पुनः देवाला प्रसाद आणि फुलांचा हार वहावा लागतो. तेवढें करण्यासाठीं पुनः एकदां इथें ये. आम्ही तुझी वाट पाहूं ! "

" येईन माताजी ! जरूर येईन ! या घरचें अन्न मी जन्मभर विसरणार नाहीं. "

कालिंग पुनः एकदां त्या दोघांना नमस्कार करून बाहेर पडला. आश्रमांत येऊन तो अंथरुणावर पहुडला खरा, पण बराच वेळ त्याला झोंप लागली नाहीं. त्याच्या दृष्टीसमोर पुनः एकदां रानांतली गुहा, तंगा, कंका, भिख्खु हें सर्व उभें राहिलें.

पहाटेसच आचार्यांनीं हांक मारून त्याला उठविलें. ते म्हणाले,

" कालिंगा, तुला निघालें पाहिजे ना ? ऊठ. "

थोड्याच वेळांत तो तयार झाला. त्यानें भाता पाठीशीं बांधला होता. खांद्यावर धनुष्य होतें. एका बाजूला कमरेस आचार्यांनीं दिलेली तरवार लटकत होती. दुसऱ्या हातीं भाला होता. त्यानें घोडा जीन कसून दारांत उभा केला, आणि नंतर एकदम तो आचार्यांच्या पायीं कोसळला. आचार्यांनीं त्याला उठवून जवळ घेतलें, आणि पाठीवर थोपटीत ते म्हणाले,

" माझ्या मुला, तशीच आवश्यकता भासली, म्हणूनच मी तुला दूर पाठवीत आहें. कळलें ना ? "

" होय आचार्य ! "

" नीट जपून वाग. मनाचा तोल कधींहीं जाऊं देऊं नकोस. "

" नाहीं. "

" एवढें काम संपल्यावर परत येशील ना ? "

" येईन आचार्य ! "

" ये, अरे विद्या तर अनंत आहे, जन्मभर शिकशील तरी पुरे व्हायचें नाहीं. बरें. नीघ आतां— "

" आचार्य पुनः एकदां— "

" काय रे आतां ? "

" मला–मला तुमचा मुलगा म्हणा ! "

" होय रे होय ! तूं माझाच मुलगा आहेस. तुझ्याएवढा आवडता मला कोणीही नाहीं. ये, आतां उशीर करूं नको. "

पुनः आचार्यांस नमस्कार करून डोळे पुशीत कालिंग घोड्यावर बसला, आणि त्यांच्याकडे वळून पहात त्यानें घोडा गांवाबाहेर काढला. गांव संपल्यावर त्यानें घोड्यास टांच मारली. घोडा पूर्वेकडे भरधांव निघाला.

****

# प्रकरण तेरावें

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं त्याचा मुक्काम क्षिप्रेवर झाला. तिथें एका खेडुताच्या घरासमोर घोडा बांधून त्यानें रात्र काढली. सकाळीं तो घोड्यास खरारा करून खोगीर चढवीत असतां त्याला कांहीं शक स्वार खेड्यांत शिरतांना दिसले. ते खेड्यांतल्या कोंबड्या आणि बकरीं खेडुतांपासून हिसकावून घेऊं लागले. न देतील त्यांना चाबकाचा प्रसाद द्यायलाही शक स्वारांनीं कमी केलें नाहीं.

क्षणभर कालिंगाची नजर तांबारली. त्याच्या मुठी वळल्या. तो पुढें होऊन शकांना हांकारून म्हणाला,

" ही लुटालूट तुम्ही कां करीत आहांत ? "

आतांपर्यंत शकांना हा असा कडक स्वर ऐकायची संवयच नव्हती. ते क्षणभर तर उभे राहिले. पण दुसऱ्या क्षणीं त्यांचा नायक तोंड वांकडें करीत म्हणाला,

" ओ हो हो ! आपण कुणा साम्राज्याचे सम्राट् आहांत ? "

" मी तर एक सामान्य माणूस आहें. पण लक्षांत असूं द्या— "

" क्यॅय् ? " शकानें वेडावीत विचारलें.

" अत्याचारांचा काल संपत आला आहे ! "

" अरे वा ! नव्हतें माहीत ! "

" माहीत नसलें, तर कळेल. या देशाचे निवासी जेव्हां धनुष्यबाण घेऊन उठतील— "

शकनायक भडकून ओरडला,

" धरा रे त्याला–त्याचा घोडाही छान दिसतोय्–आणा इकडे!"

शक सैनिकांचा मोर्चा कालिंगाकडे वळला, तों डोळ्याचें पातें लवे न लवे इतक्या वेळांत कालिंगानें धनुष्याला बाण जोडला. शकनायक निंबाच्या झाडाखालीं उभा होता, त्याच्या कापडी शिरस्त्राणावर नेम धरून कालिंगानें इतक्या वेगानें बाण सोडला, कीं तें शिरस्त्राण निंबाच्या खोडांत जसा कुणीं खिळा ठोकावा, तसें रुतून बसलें. बाणाचा पिसारा केवळ एक वीतभरच बाहेर राहिला!

आश्चर्यानें थक्क होऊन सगळे शक सैनिक तोंडांत बोटें घालून उभे राहिले. घोड्यावर उडी टाकून कालिंग म्हणाला,

" हा तर केवळ प्रारंभ आहे. आतां युद्ध सुरू होईल तेव्हां—"

त्यानें घोडा त्यांच्या अंगावरून पुढें काढला. तो येतो आहे, हें पाहून शक सैनिकांनीं कोंबड्या आणि बकरीं तिथेंच सोडून पटापट आसरा शोधला. बकऱ्यांचें बेंबटणें अन् कोंबड्यांचा कलकलाट, यानें सगळें वातावरण भरून गेलें. कालिंग हंसत धुळीचे लोट उडवीत वेगानें पुढें निघाला.

सायंकाळीं तो दोन्ही डोंगर ओलांडून खिंडींत उभा राहिला. त्याला त्याच्या ओळखीचा प्रांत आज तीन वर्षांनीं दिसत होता. तींच तीं त्याच्या परिचयाचीं सागाचीं अन् मोहाचीं झाडें. त्याच खिरण्या. तींच करवंदें, तींच कुंदाचीं फुलें!

क्षणभर कालिंगाचे डोळे ओलावले. पण ते न पुसतां त्यानें घोडा पुढें काढला. सूर्यास्ताच्या सुमारास तो गुहेजवळ जाऊन पोंचला, तों काय आश्चर्य! इथें तर किती तरी भिल्ल एकत्र झाले आहेत! अन् मग तंगा कुठें आहे! कूटदन्त—

त्याला ऐकूं आलें,

" भैय्या आला ! माझा भैय्या आला ! "

" कुठें आहे ! होय कीं ! "

" वा वा ! कसा मुहूर्तावर येऊन पोंचला ! "

गुहेंतून माणसांचा लोंढा कालिंगकडे धांवूं लागला. कालिंगानें घोड्यावरून खालीं उडी मारीत पुढें धांव घेतली. कांहीं क्षणांतच तंगा त्याच्या मिठींत उभा राहिला. कालिंगाला कांहीं बोलवेना. पण त्याच्या मिठींतून सुटत तंगा म्हणाला,

" भैय्या, हा तुझा घोडा शिंगाबिंग मारीत नाहीं ना ! अरे ! याला शिंगेंच नाहींत !—"

ती सबंध रात्र एकमेकांच्या कहाण्या ऐकत आणि ऐकवीत कशी गेली, तें कळलेंच नाहीं. तंगानें तर रात्रभर कालिंगाच्या कुशींत जी दडी दिली, तो कांहीं उठला नाहीं.

इकडे झालें होतें असें—कंका, कूटदन्त आणि तंगा हे तिघेही स्वस्थ बसले नव्हते. कालिंग इथें नव्हता, त्या तीन वर्षांत ते तिघे मिळून त्या वनप्रदेशांत खूप हिंडले. कूटदन्तानें आपला पिवळा वेश कायम ठेवला होता. त्यामुळें कोणत्याही भिल्लांच्या वस्तींत त्यांना सहज प्रवेश मिळे. त्या वनप्रदेशांत सुमारें शें-शंभर ठिकाणीं भिल्लांच्या वस्त्या होत्या. पैकीं कांहीं वस्त्यांत तर कालिंगाच्या वस्तीचे नातलगच रहात होते. त्या वस्त्यांपैकीं कांहींना शकांचा प्रसादही मिळाला होता.

जिथें जात, तिथें ते तिघे शकांच्या या हिंस्र अत्याचारांविरुद्ध प्रचार करीत. पेटलेल्या शेकोट्यांपुढें जमलेल्या भिल्लांसमोर कंका आपला एक हात उभारून म्हणे,

" भिल्ल गडे हो ! हा माझा एक हात दिसतो का तुम्हांला ! "

" हो ! दिसतो ! " सगळे भिल्ल म्हणत.

" दुसरा हात कुणीं तोडला ? "

" कुणीं ? "

" दोन पायांच्या पिसाळलेल्या लांडग्यांनीं तोडला ! "

" होय ! लांडग्यांनीं तोडला. "

" माझी बाईल—फार चांगली होती ती. "

" होय, होती. " भिल्ल ओरडतं.

" ती कुणीं ठार मारली ? "

" कुणीं मारली ? "

" त्याच लांडग्यांनीं ! "

" मग त्यांना चेंचून मारलें पाहिजे ! "

" होय होय ! "

" त्यांना आमच्या दरीडोंगरांतून हांकून दिलें पाहिजे ! "

" होय होय ! "

भिल्ल जमात अगदीं भोळी. त्यांना पेटवायला थोडासाही विस्तव पुरेसा होई. फारसा युक्तिवाद करावा लागत नसे. कंका शकांच्या अत्याचारांच्या कहाण्या सांगे, अन् भिल्लांचे डोळे तांबडेलाल होत.

मग उभा राही कूटदन्त. जळत्या आगीच्या प्रकाशांत त्याचीं पिवळीं वस्त्रें अधिकच तेजस्वी दिसंत. तो तंगाला जवळ घेऊन म्हणे,

" नर्मदेच्या पुत्रांनो ! शकराक्षसांनीं ज्याची आई भाला भोंसकून ठार मारली, असें हें लहानगें लेंकरूं पहा ! त्यांना तुम्ही क्षमा कराल काय ? "

" नाहीं नाहीं ! "

" पण लक्षांत ठेवा, शकांच्या बाणांचा वेग असह्य असतो ! "

यावर काय बोलावें तें भिल्लांना सुचत नसे. मग कूटदन्त म्हणे,

" शूर भिल्लांनो, असे गोंधळून जाऊं नका. शक कांहीं आकाशांतून पडले नाहींत, कीं धरतींतून वर आले नाहींत. या मुलाचा थोरला

भाऊ एका फार मोठ्या आचार्यांजवळ शस्त्रविद्या शिकण्यासाठीं गेला आहे. तो लवकरच परतेल. तो तुम्हांला शकांशीं कसें झुंजावें तें शिकवील. मात्र तुम्हीं तयार झालें पाहिजे—"

"आम्ही तयार होऊं !"

"शकांनीं पळविलेल्या तुमच्या आयाबहिणींचें स्मरण करून—"

"होय होय !" भिल्ल दांत खाऊन ओरडत.

अशा रीतीनें त्या तिघांनीं दोन वर्षांत सर्व भिल्ल वस्त्या हाताळल्या. कधीं कधीं तंगा उदास होई. कंका सचिंत होऊन म्हणे,

"कालिंग परत येईल काय ?"

कूटदन्त उत्तर देई,

"निश्चितच येईल. तो मोठा निर्धाराचा तरुण आहे."

गुहेपलीकडे एक दिवसाच्या वाटेवर जंगादेव नांवाचा भिल्लांचा देव होता. भिल्लांच्या मताप्रमाणें वनदेवाचाच तो अवतार होता. त्याची मोठी यात्रा भरे. यात्रेच्या निमित्तानें एकत्र जमलेल्या भिल्लांमध्येंही कूटदन्तानें खूप प्रचार केला.

फाल्गुनाच्या महिन्यांत भिल्लांची पंचायत भरून असें ठरलें होतें, कीं कालिंग येईल तेव्हां येईल. तोंपर्यंत आपण शेंपन्नास भिल्लांनीं गुहेवर पंधरा दिवसांनीं एकत्र जमून हळूहळू तयारी करायची.

या बेताप्रमाणें सगळ्या रानभरांतले भिल्ल गुहेजवळ एकत्र झाले होते. कालिंगाला पाहून त्यांना सगळ्यांनाच फार संतोष झाला. कालिंग रंगानें बराच उजळला होता. त्याची भाषाही खूप शुद्ध झाली होती. त्याच्या अंगावर वस्त्रेंही सुरेखच होतीं. घोडा हें सपाटीवरलें जनावर रानांत वर्षोनुवर्षें राहणाऱ्या भिल्लांपैकीं फार थोड्या लोकांनीं पाहिलें होतें. कालिंगाचा घोडा देखणा अन् बहुगुणी होता. यामुळें त्या भिल्लांना त्याचेंही फार कौतुक वाटलें. असा तो कालिंग जेव्हां अगदीं



२.२.१

त्यांच्या भाषेंत त्यांच्याशीं बोलूं लागला, तेव्हां त्यांनीं ठरवून टाकलें, कीं आपला नायक कोणी असेल तर तो हा कालिंग !

कूटदन्ताच्या सल्ल्यानें कालिंगानें असें ठरविलें कीं, अगोदर पंधरा दिवसांत वीस भिल्लांची एक तुकडी खूप शिकवायची. रात्रंदिवस त्यासाठीं परिश्रम घ्यायचे, अन् मग या वीस जणांनीं भिल्लांचें नामवंत सैन्य तयार करायचें.

त्याप्रमाणें त्यानें त्या जमलेल्या भिल्लांशीं बोलणें केलें. त्यांतला एक होला भिल्ल फार समजूतदार होता. वयानेंही तो पन्नाशीच्या पुढला होता. त्यामुळें त्याचें बोलणें कोणी नाकारीत नसे. तर तो कालिंगाचें म्हणणें ऐकतांक्षणीं खूष होऊन म्हणाला,

"वा वा ! काय नामांकित बेत आहे ! असेंच करायचें रे गडे हो ! असेंच."

लगेच दुसऱ्या दिवसापासून निवडक वीस तरुणांची तुकडी कालिंगाजवळ धनुर्विद्या शिकूं लागली. होला, कंका आणि दुसरे चार-सहा त्यांच्या जेवणाची व्यवस्था करीत: कधीं डुकरें, कधीं हरणें, कधीं होले, कधीं ससे, कधीं घोरपडी अन् मग भरीला कंद, मक्याचीं उकडलेलीं कणसें, मध असा सज्जड बेत होता.

त्या वीस जणांना सकाळपासून सायंकाळपर्यंत इतके परिश्रम करावे लागत, कीं रात्रीं केव्हां एकदां भुईवर अंग टाकतों, असें त्यांना होऊन जाई. कालिंग शिकविण्याच्या बाबतींत मुळींच क्षमा करीत नसे. तो स्वत:ही त्यांच्याबरोबर तितकेच श्रम करी. अहिलवाडला बाण मारण्यासाठीं लक्ष्यें बनवावीं लागत. इथें बनांत काय ! लागतील तितकीं लक्ष्यें ! दोन दोन घटका त्या सर्वांना सतत, वेगानें बाण मारावे लागत. पळाची उसंत मिळत नसे. लवकरच त्यांच्या हातांचे घट्टे खूप कडक झाले.

या सर्वांबरोबर तंगाही तेवढेच श्रम करी. भावाच्या तालमींत तोही लवकरच तयार झाला.

रात्रीं हे सर्व वीर गुहेखालच्या राईंत गाढ झोंपीं जात. कंका आणि त्याचे साथीदार तीनतीन चारचार घटका शेकोटीसमोर गप्पा मारीत बसत. कधीं कधीं त्या रानांत ढोलाचाही नाद घुमे. पण या वीस जणांना कांहीं त्या गप्पांचें अथवा ढोलाच्या आवाजाचें भान नसे.

कालिंग अन् कूटदन्त हे दोघे मात्र एका बाजूला बसून पुढील योजनांचा विचार करीत. कालिंग म्हणे,

" मी तर कांहीं भिलवाड्यांत फिरलों नाहीं– "

" पण मी फिरलों आहें ना ! "

" सगळे भिल्ल लढायला तयार आहेत ? "

" अगदीं सगळे. अरे, त्यांच्यापैकींही अनेकांना शकांचे घाव खावे लागले आहेत. "

उग्र मुद्रेनें कालिंग म्हणे,

" थोडें थांबा म्हणावें ! लवकरच मगध सेना मालव प्रांतांत चालून येत आहे. "

दहा दिवसांनंतर कालिंगानें त्या वीस भिल्लांस भाला कसा वापरावा तें शिकविलें. एकदां ओढ्याकांठच्या दरडींत क्षणभर विसावले असतां तो त्यांना म्हणाला,

" मित्र हो ! मी कसें शिकवतों, तें लक्षांत घ्या. वेळ फार थोडा आहे. तुमचें शिक्षण झालें, एवढ्यानें भागलें नाहीं. तुम्हांला तुकड्या तयार करायच्या आहेत, हें ध्यानांत असूं द्या. सतत दोन दोन प्रहर धनुष्य चालवीत रहायची संवय त्यांच्याकडून करायला हवी. नाहीं तर एक बाण मारला, मग मध्यें विसावून तंबाखू खाल्ली, जांभया दिल्या, पुनः एक मारला. झालें सकाळचें काम. मग एका छानशा झाडाखालीं

हात उशाला घेऊन एक डुकली लावून दिली. पुनः संध्याकाळीं बाण जोडायला जावें, तों कामठाच तुटला ! मग चार दिवस कामठा दुरुस्त करण्यांत घालविले, हें मुळींच उपयोगाचें नाहीं.

" लक्षांत असूं द्या, शकांचा बाणांचा वेग भयंकर आहे. ते एका जुटीनें मैदानांतून उधळत येतात, अन् अतिशय वेगानें बाण मारतात. या दोन गोष्टींमुळें ते जिंकतात, आम्ही हारतों—"

मध्येंच एक जण बोलला,

" कालिंगराय, आतां तर आम्हीही त्यांच्याच वेगानें त्यांना उत्तर देऊं शकूं. पण आम्हांला एक सांगा—"

" काय ?"

" ते घोड्यांवर बसून येतात—"

" मग ?"

" या त्यांच्या धडकीला तोंड कसें द्यायचें ?"

कालिंग म्हणाला,

" लक्षांत ठेवा, त्यांच्याजवळ घोडे आहेत, तर आमच्याजवळ कडे अन् कपारी आहेत."

" भले ! कडे अन् कपारी काय पळतात तुझ्या घोड्यासारख्या ?" तंगा हंसून म्हणाला,

" पळत नाहींत, पण आसरा देतात. या कडेकपारींत बसून खालीं घोड्यांवर पळत येणाऱ्या हजार शकांना पंचवीस तीरंदाज भिल्ल पराजित करूं शकतात !"

सोळाव्या दिवशीं पहांटेस कालिंग कूटदन्ताला बोलला,

" माझे गडी तयार आहेत."

उगवत्या सूर्याबरोबर सगळे भिल्ल गुहेसमोरच्या निरुंद जागेंत जमले. कालिंग त्यांना बोलला,

" मित्र हो ! आपल्याजवळ केवळ एक महिना आहे—किती ?"
" एक महिना."
" या महिन्यांत आम्ही एका क्षणाची विश्रांति घेणार नाहीं—"
" नाहीं—"
" रात्रंदिवस परिश्रम करूं—"
" करूं—"
" जिवाची शर्थ करून भिल्ल सैन्य तयार करूं—"
" करूं—"
" अन् मग तीन वार उलटल्यावर पुनः तयारीनिशीं इथें एकत्र जमूं—"
" जमूं—"
" पापी राक्षसांना या धरतीवरून हुसकून लावूं—"
" होय होय, लावूं !"
" हें करतांना प्राण गेले तरी चिंता नाहीं—"
" चिंता नाहीं !"
" बोला तर मग, जय हर जय हर !"
" जय हर जय हर !"

कालिंग बाजूस झाला, अन् कूटदन्त समोर आला. तुकडीकडे नजर देऊन तो म्हणाला,

" भिल्ल हो, तुमच्या रानांत, तुमच्या झोंपड्यांसमोर, तुमच्या धुन्यांसमोर मीं तुम्हांला एक शब्द दिला होता. कालिंग येईल. शस्त्रविद्या घेऊन येईल. मग ती तुम्हांला देईल. त्याप्रमाणें झालें ना ?"

" झालें !"
" कालिंगावर तुमचा भाव जडला ना ?"
" होय होय ! कालिंगराय आमचा आहे."

" भैय्या, हें तुला कोणीं शिकविलें ? "

" आचार्यांनीं. "

" अरे वा ! गंमत आहे हां ! तर मग भैय्या, हीं झाडें करणारा देव अन् डोंगर करणारा देव, दोन्ही एकच असतील ? "

" होय. "

" अन् मग त्या देवाला तर सगळेंच माहीत असेल ? "

" होय तंग्या ! चूली भेटेल कीं नाहीं, सोर्णमयी कुठें असेल, हें सगळें त्या एकाच देवाला माहीत आहे. "

तंगाला ही एक नवीनच गोष्ट कळली. मग दिवसभर तो निरनिराळ्या वस्तू पाहून एकाच देवानें या कशा केल्या असतील, त्याचा विचार करीत राहिला.

दोनच दिवस विसावून मग ते चौघे पुनः गुहेबाहेर पडले. कालिंगाच्या घोड्यावर कधीं तंगा बसे, कधीं कूटदन्त, तर कधीं कालिंग. कंकानेंही आपली घोड्यावर बसायची हौस भागवून घेतली.

एकवीस दिवसपर्यंत कालिंगानें शिकवून तयार केलेल्या नायकांनीं खूप परिश्रम घेतले. भिल्लही सगळे मन लावून शिकत. त्यांना बुद्धि कमी, पण श्रम करायचा उत्साह मात्र दांडगा. प्रत्येक वस्तीवर राहून स्वतः कालिंगानें एक-एक दोन-दोन दिवस नायकांच्या शिकविण्यावर लक्ष ठेवलें.

वैशाख शुद्ध दशमीला ते गुहेवर परतले. कालिंग कूटदन्ताला म्हणाला,

" अभिमानदादा, आतां तुम्हांला इथें थांबलें पाहिजे. नायक येतील, त्यांची व्यवस्था– "

" मी करतों तें सगळें. तूं जंभदुर्गाकडे नीघ. "

मग दुसरे दिवशीं एकटा कालिंग घोड्यावर बसून निघाला, तो

त्रयोदशीस पातालेश्वरीं पोंचला. नर्मदामैय्याचें स्नान करून त्यानें आपले सर्व संकल्प तिला मनोमनीं सांगितले. दुसऱ्या दिवशीं त्यानें जंभदुर्गाकडे घोडा काढला. दुर्गम वनांतून वाट काढीत तो चतुर्दशीला सायंकाळीं दुर्गाच्या पडीक दरवाजाजवळ पोंचला. आंत एक महादेवाचें देऊळ आणि लहानसें तळें होतें. तिथें त्यानें रात्र काढली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो जंभदुर्गाच्या पडलेल्या तटांवर हिंडत होता, तों त्याला अरण्यांतून गडाच्या रोखानें एक घोडेस्वार येतांना दिसला. तो जवळ येतांच धनुष्यावर बाण चढवून कालिंग ओरडला,

"येणारे गृहस्थ शक्तिपाल नसतील, तर आचार्य भोजदेवांच्या शिष्याचा बाण–"

खालून आवाज आला,

"थांबा कालिंग!"

थोड्याच वेळांत दरवाजांत दोघांची गांठ पडली. कालिंगाला मिठी मारून शक्तिपाल म्हणाला,

"मित्रा, मगधसेना येत आहे! आजपासून आठव्या दिवशीं युद्धास तोंड लागेल–"

"भिल्लसेना तयार आहे!"

****

“ तर मग त्याच्यासाठीं—”

“ होय, त्याच्यासाठीं— ”

“ तुमच्या आयाबहिणींसाठीं— ”

“ होय, आयाबहिणीसाठीं — ”

“ नर्मदामैयाचा कांठ केवढी पवित्र वस्तु ! त्याचें पावित्र्य राखण्यासाठीं— ”

“ होय ! राखण्यासाठीं— ”

“ आतां मागें सरणें नाहीं — ”

“ नाहीं नाहीं ! ”

“ रणांतून फिरणें नाहीं— ”

“ नाहीं नाहीं ! ”

“ कुचराई करणें नाहीं— ”

“ नाहीं नाहीं ! ”

“ बोला, जय हर जय हर ! ”

“ जय हर जय हर ! ”

ते सगळे भिल्ल उठले. कालिंगाला उराउरीं भेटून ते मोठ्या उत्साहानें आपापल्या वस्तीकडे निघाले. ते गुहेचा कडा उतरून खालीं गेल्यावर कालिंग ओरडून म्हणाला,

“ मित्र हो, मी लवकरच तुमचें काम पहायला येतों आहें. ”

सगळे ओरडले,

“ या ! आम्ही तुमची वाट पाहूं ! ”

कूटदन्तानें कालिंगाला घट्ट मिठी मारली, आणि तो म्हणाला,

“ मित्रा, फार श्रमलास ! आतां आज-उद्यांचा दिवस विसांवा घे. ”

“ थकायला काय झालें आहे ? माझा उत्साह तर अंगांत मावेनासा

झाला आहे. असें वाटतें, कीं कधीं हा महिना संपेल अन् कधीं शकांशीं गांठ पडेल!"

तंगा मोठया उत्सुकतेनें या दोघांचें हें कौतुक पहात होता. तो पटकन् म्हणाला,

"भैय्या, शकांची गांठ कुठें पडेल?"

"कुठेंही पडेना का! डोंगरांत, मैदानांत—"

"नाहीं, पण मग आपली त्यांची भेट होईल का!"

"कुणाची?"

"चूली अन् सोर्णमयी—"

कालिंग एकदम गंभीर झाला. तो क्षितिजाकडे नजर लावीत म्हणाला,

"तंगा, तें एका देवालाच माहीत आहे—"

"कोणत्या? वनदेवाला कीं जंगादेवाला?"

"कोणत्याही देवाला – सगळे देव एकच."

आश्चर्यानें तंगा म्हणाला,

"एकच कसे असतील भैय्या? जंगादेवाला तर कोंबडेंच कापावें लागतें. वनदेवाला नुसता कोणत्याही झाडाचा डहाळा वाहिला तर चालतें. दोन्ही एकच कसे असतील?"

कालिंग हंसून म्हणाला,

"एकच रे तंग्या, तरी ते एकच आहेत. असें बघ, कमंडलूंतलें पाणीच अन् रांजणांतलें तरी तें पाणीच. टाक्यांतलें अन् नदींतलेंही पाणीच. एक पाणी सांठवायला कमंडलू पुरतो. दुसऱ्याला टाकें लागतें. टाक्यांत मावत नाहीं, तें नदींत वाहतें. तसे सगळे देव एकच."

तोंडांत बोट घालून तंगा म्हणाला,

" भैय्या, हें तुला कोणीं शिकविलें ? "

" आचार्यांनीं. "

" अरे वा ! गंमत आहे हां ! तर मग भैय्या, हीं झाडें करणारा देव अन् डोंगर करणारा देव, दोन्ही एकच असतील ? "

" होय. "

" अन् मग त्या देवाला तर सगळेंच माहीत असेल ? "

" होय तंग्या ! चूली भेटेल कीं नाहीं, सोर्णमयी कुठें असेल, हें सगळें त्या एकाच देवाला माहीत आहे. "

तंगाला ही एक नवीनच गोष्ट कळली. मग दिवसभर तो निर-निराळ्या वस्तू पाहून एकाच देवानें या कशा केल्या असतील, त्याचा विचार करीत राहिला.

दोनच दिवस विसावून मग ते चौघे पुनः गुहेबाहेर पडले. कालिं-गाच्या घोड्यावर कधीं तंगा बसे, कधीं कूटदन्त, तर कधीं कालिंग. कंकानेंही आपली घोड्यावर बसायची हौस भागवून घेतली.

एकवीस दिवसपर्यंत कालिंगानें शिकवून तयार केलेल्या नायकांनीं खूप परिश्रम घेतले. भिल्लही सगळे मन लावून शिकत. त्यांना बुद्धि कमी, पण श्रम करायचा उत्साह मात्र दांडगा. प्रत्येक वस्तीवर राहून स्वतः कालिंगानें एक-एक दोन-दोन दिवस नायकांच्या शिकविण्यावर लक्ष ठेवलें.

वैशाख शुद्ध दशमीला ते गुहेवर परतले. कालिंग कूटदन्ताला म्हणाला,

" अभिमानदादा, आतां तुम्हांला इथें थांबलें पाहिजे. नायक येतील, त्यांची व्यवस्था— "

" मी करतों तें सगळें. तूं जंभदुर्गाकडे नीघ. "

मग दुसरे दिवशीं एकटा कालिंग घोड्यावर बसून निघाला, तो

त्रयोदशीस पातालेश्वरीं पोंचला. नर्मदामैय्याचें स्नान करून त्यानें आपले सर्व संकल्प तिला मनोमनीं सांगितले. दुसऱ्या दिवशीं त्यानें जंभदुर्गाकडे घोडा काढला. दुर्गम वनांतून वाट काढीत तो चतुर्दशीला सायंकाळीं दुर्गाच्या पडीक दरवाजाजवळ पोंचला. आंत एक महादेवाचें देऊळ आणि लहानसें तळें होतें. तिथें त्यानें रात्र काढली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो जंभदुर्गाच्या पडलेल्या तटांवर हिंडत होता, तों त्याला अरण्यांतून गडाच्या रोखानें एक घोडेस्वार येतांना दिसला. तो जवळ येतांच धनुष्यावर बाण चढवून कालिंग ओरडला,

" येणारे गृहस्थ शक्तिपाल नसतील, तर आचार्य भोजदेवांच्या शिष्याचा बाण– "

खालून आवाज आला,

" थांबा कालिंग ! "

थोड्याच वेळांत दरवाजांत दोघांची गांठ पडली. कालिंगाला मिठी मारून शक्तिपाल म्हणाला,

" मित्रा, मगधसेना येत आहे ! आजपासून आठव्या दिवशीं युद्धास तोंड लागेल– "

" भिल्लसेना तयार आहे ! "

****

# प्रकरण बारावें

वैशाख वद्य सप्तमीला रणधुमाळी सुरू झाली.

मगधांतून प्रचण्ड सेना मालव प्रांताची वाटचाल करूं लागली आहे, ही बातमी शकाधिप रोदरत्सेंगाला गुप्तचरांनीं सांगितली. पण एक तर रोदरत्सेंग वेगळ्याच समाधानांत होता. पाटली-पुत्राधिप स ट् रामगुप्तावर त्यानें आपल्या हेरांकडून नुकताच प्राणघातक हल्ला करविला होता. त्याच्या परिणामांची तो वाट पहात होता. दुसरें असें, कीं मोहाच्या फुलांपासून काढलेली दारू त्याला फार आवडूं लागली होती.

गुप्तचरांचा नायक रोदरत्सेंगाच्या प्रासादाजवळ आला, तेव्हां प्रहऱ्यांचा प्रमुख त्याला म्हणाला,

" आतां जगदाधिपांची भेट व्हायची नाहीं. "

" कां ? "

बारीक आवाजांत प्रहऱ्यांचा प्रमुख म्हणाला,

" एक तर या मालव प्रांतांत मोहाचीं फुलें फार होतात. शिवाय मालव प्रांतांतील तरुणी फार देखण्या असून त्या सहजासहजीं कोणतीहि गोष्ट ऐकत नाहींत ! "

" तरी पण– "

" भले ! एवढयानें तुम्हांला कळलें नाहीं काय ? "

चिडून गुप्तचर-नायक म्हणाला,

" अशानें राज्यें चाललींच म्हणायचीं ! तें कांहीं नाहीं. मला जग-

दाधिपांची भेट आतांच हवी आहे ! ”

नाइलाजानें प्रहऱ्यांचा प्रमुख आंत गेला, आणि थोड्याच वेळांत परतून बोलला,

“ प्रासादक कोष्कत्सेंगांनीं तुम्हांला आंत बोलाविलें आहे. ”

गुप्तचर-नायक आंत गेला, तों त्याला दिसलें कीं, रोदरत्सेंगाच्या अंगावर फार थोडीं वस्त्रें असून त्याच्या झोकांड्या जात आहेत ! तो खूप मोठ्यानें हंसतो आहे. कोष्कत्सेंगानें त्याला कसेंबसें सांवरून धरलें आहे. नायकाला पाहतांच रोदरत्सेंग कसातरी बरळला,

“ रामगुप्त मेला काय ? ”

“ नाहीं जगदाधिप महाराज ! मागधांचें अपार सैन्य मात्र मालवा-कडे निघालें आहे. ”

विकट हंसूं हंसून रोदरत्सेंग म्हणाला,

“ तुझे डोळे एकदां वैद्याकडून तपासून घेतले पाहिजेत ! अरे, तूं एखादी कावळ्यांची नाहीं तर चिमण्यांची झुंड या दिशेनें येत असलेली बघितली असशील ! थोडीशी ही दारू घे ! म्हणजे तुला नीट दिसूं लागेल ! ”

पण आठ-दहा दिवसांतच रोदरत्सेंगाला कळलें, कीं गुप्तचरानें खरें सांगितलें होतें ! पांचेकशें हत्ती, हजारों घोडेस्वार, अगणित पायदळ, असें प्रचण्ड सैन्य मालव प्रांताच्या दाराशीं येऊन पोंचलें होतें !

आश्चर्य असें कीं, मार्गांतले सर्व नागरिक त्या सेनेला आपण होऊन दाणागोटा पुरवीत होते. शकांची राजवट उलथून टाकायची, हें जणूं काय सगळ्यांचेंच ठरलें होतें.

शकांची घोडदौडीची संवय मोडली होती. त्यांच्या धनुष्यांची दोरखण्डें कुजलीं होतीं. बाण आणि भाले गंजायला लागले होते. मनसोक्त खाणें आणि दारू पिणें या दोन उद्योगांमुळें शक सुस्तावले होते.

अन् अचानक शत्रुसैन्य छातीवर येऊन उभें ठाकलें! शकांनीं धांवाधांव करून पुनः घोड्यांचीं खोगिरें शोधून काढलीं. फाटलीं होतीं तीं सांधलीं. बाण आणि भाल्यांचीं फाळें घांसून काढलीं. धनुष्यें नेटकीं केलीं.

पण फार उशीर झाला होता. शकसैन्य आपापल्या घोड्यांस दारू पाजून आणि स्वत. नशेंत मग्न होऊन क्षिप्रातटींच्या पटांगणांत जमा झालें. डोळे लाल असलेले शक सरदार सैन्याला निरनिराळ्या आज्ञा सोडीत घाबरेपणानें इकडून तिकडे हिंडूं लागले.

तोंच शक सरदार कनिष्क घोडा पळवीत तिथें आला आणि म्हणाला,

"उभे काय राहिलांत? जगदाधिप कुठें आहेत?"

"प्रासादांत—"

"प्रासादांत? अन् ते तर आले! जवळ आले! फार मोठ्या संख्येनें—"

शक सरदार मागध सेनेच्या दिशेकडे घोड्यांचीं तोंडें वळवूं लागले; पण कनिष्कानें आपला घोडा राजधानीकडे काढला. शक सेनापति त्याला ओरडून म्हणाला,

"तुम्ही इकडे कुठें?"

"काम आहे—"

कनिष्काला तसेंच सोडून शकांच्या सेनापतीनें आपल्या सेनेस मागध सैन्याच्या दिशेनें निघण्याची आज्ञा दिली. एका घटकेंत तें सैन्य शेतें आणि बांध तुडवीत पूर्व दिशेकडे निघालें. पण त्याला फार लांब जावें लागलें नाहीं. लवकरच पूर्वेकडे उडणारा प्रचंड धुळीचा लोट दिसूं लागला. शक सेनापतीनें सैन्य थांबविलें. विभागाधिकाऱ्यास आज्ञा करून त्यानें तें अर्धचंद्राकार पांगविलें. नगाऱ्याचा आवाज येतांच

मागध सेनेवर कसून चाल करायची त्यानें आज्ञा कली. सगळे शक सैनिक धनुष्याला बाण लावून तयार राहिले.

पण मागध सेनेनें अगदीं वेगळा डाव रचला होता. मागधांचा सेनापति स्वतः चन्द्रगुप्त होता. त्यानें घोडदळाच्या सरदारांस एकत्र करून आज्ञा केली,

" लक्षांत ठेवा, हत्ती आघाडीवर राहतील. त्यांच्या गंडस्थळांवर पोलादी चिलखतें आहेत. शकांच्या बाणाचा पहिला वेग ते सहन करतील. मात्र शक हत्तींशीं झुंजण्यांत गुंतले आहेत, असें पाहून तुम्ही उत्तरेकडून हत्तींना डावी घालून पुढें चला. लक्षांत असूं द्या. शकांना मारीत मारीत विंध्य पर्वताकडे न्यायचें आहे ! "

लगेच घोडदळापर्यंत ती आज्ञा पोंचली. इकडे हत्तींची तुकडी एका-आड एक अशी दोन रांगांनीं अर्धा-पाऊण मैल पसरली. नंतर काय झालें तें न कळे, शकांना असें दिसलें कीं, तिथल्या तिथें गोल गोल फिरून हत्तींनीं खूप धूळ उसळविली. मग ते शक सेनेच्या रोखानें निघाले.

शक सेनापतीनें हें पाहिलें, तसा तो सबंध आघाडीवर घोडा पळवीत ओरडूं लागला,

" पुढें जाऊं. नका ! हत्ती बाणांच्या टप्प्यांत येतांच बाण सुरू करा ! "

पण धडपणीं हें न ऐकत नगारा गर्जूं लागला. बावचळलेले शक सैनिक हत्तींवर निघाले. सगळा गोंधळच उडाला. हत्ती वेगानें पुढें चालले. शकांकडून बाणांचा मारा सुरू झाला. उत्तर मिळालें प्रचंड आवाजानें ! पुढल्या पन्नास हत्तींवर शतघ्नी ठेवल्या होत्या. शक सेना आवाक्यांत आली, हें पाहतांच त्या शतघ्नींना बत्ती दिली गेली. भडाभड तांबडेलाल लोखंडी गोळे शक सेनेंत येऊन कोसळूं लागले.

शक सैनिक थोडे मागें सरले. तिथून त्यांनीं शतघ्नींच्या माऱ्याची जागा तेवढी मोकळी सोडून दोन्ही बाजूंनीं पुन: बाणांचा मारा करीत हत्तींवर चालून घेतलें. तोंपर्यंत आणखी शकांचें सैन्य त्यांच्या मदतीला आलें. क्षणभर हत्ती एका जागीं खिळल्यासारखे वाटूं लागले. शकांना अवसान चढून ते पिसाळल्यासारखे बाण सोडूं लागले.

तोंच उत्तरेकडून चपळ घोडेस्वारांची प्रचंड धडक त्यांच्यावर येऊन कोसळली, याच क्षणीं हत्तींवरूनही बाणांचा अविरत वर्षाव सुरू झाला!

कांहीं वेळ शकांनीं कसाबसा टिकाव धरला. पण मग ते दक्षिणे-कडे सरूं लागले. शक सेनापतीला बाणांच्या जखमा झाल्या होत्या. तरी तसाच तो घोडा पळवीत सेनेला ओरडून म्हणत होता,

" पळतां कुठें ? थांबा ! थांबा म्हणतों ना ! "

पण कुणी ऐकेना झालें. खवळून धनुष्याला बाण जोडीत तो किंचाळला,

" मूर्खांनो ! थांबा ! हुव देवाची शपथ– थांबा ! गाढव– गद्धे– पळपुटे – बेशरम – एकेकाला फांशीं देईन – कातडें सोलून काढीन – चुन्याच्या भट्टींत टाकीन–"

पण त्याचें किंचाळणें वायां गेलें. ठाव सुटून शक सैन्य त्याच्या अंगावरून दक्षिणेकडे निघालें. पुढें पळत, धडपडत, वर्मीं बाण लाग-तांच प्राण सोडीत कोसळणारे शक. मागें ताज्या दमाचें मागध सैन्य ! अर्ध्या घटकेंत मैदान मोकळें झालें ! मग हत्तींना पुढें घालून चंद्रगुप्तानें पायदळाला उज्जयिनीवर चाल करण्याची आज्ञा दिली. सायंकाळपर्यंत मधला प्रतिकार मोडून काढून त्या सेनेनें उज्जयिनीचा कबजा घेतला.

नागव्या तरवारी घेतलेल्या दोनशें सैनिकांसह चन्द्रगुप्त राज-प्रासादांत शिरला. शक प्रहरींना कापून काढीत त्यानें अन्तर्गृहांत प्रवेश केला—

तिथें होता रोदरत्सेंग ! तो दारू पिऊन मत्त झाला होता. एका वेश्येजवळ तो लघळपणा करीत होता.

चन्द्रगुप्तानें दरवाजा धाडकन उघडून एका सैनिकासह अ त पाऊल घातलें. रोदरत्सेंगाकडे क्रुद्ध नजरेनें पहात त्यानें विचारलें,

" हा रोदरत्सेंग काय ? "

धुंद रोदरत्सेंग त्याच्याकडे वळून म्हणाला,

" मला एकेरी नांवानें कोण हांक मारतो ? तूं आंत कसा आलास ? जा ! बाहेर जा ! नाहींतर तुझें कातडें सोलीन — रक्त पिईन — तरुण माणसाचें रक्त मला फार आवडतें — जुन्या मुरलेल्या मदिरेसारखें लागतें तें — मी पिईन — तुला देईन — पण अगोदर बाहेर— "

चद्रगुप्त तरवार उपसून त्याच्यावर धांवला, तेव्हां मात्र त्याची धुंदी थोडीशी उतरली. तो ओरडत, किंचाळत त्या स्त्रीच्या आड दडूं लागला. चन्द्रगुप्तानें एका झेपेंत त्याचें मनगट धरून त्याला अलिकडे ओढलें. आपली पाणीदार तलवार त्याच्यावर उगारून चन्द्रगुप्तानें त्याला विचारलें,

" मगधपति रामगुप्तावर मारेकरी तूं घातले होतेस काय ? "

रोदरत्सेंग नुसता भ्यालेल्या बकऱ्यासारखा त्याच्याकडे बघत राहिला. त्याची बोबडीच वळली. एका वारांत चन्द्रगुप्तानें त्याचें मस्तक धडा-वेगळें केलें !

इकडे प्राण घेऊन पळत असलेलें शक सैन्य रात्रभर घोडदौड करीत राहिलें. वाटेंत कितीक घोडे उधळले. कितीकांनीं स्वारांना खालीं झुगारून दिलें. कितीक त्यामुळें माना मोडून मेले. सारखा त्यांचा पाठलाग होता होता.

दुसऱ्या दिवशीं दुपारच्या सुमारास शकांना विंध्य पर्वताचें अरण्य लागलें. लपायला आसरा मिळाल्यानें त्या सैन्यानें सुटकेचा श्वास

टाकला. शिवाय मगध घोडेस्वारही अरण्याच्या आलिकडेच थांबलेले दिसले. त्या वनाच्या अन्तर्भागांत शिरून एक दिवस विसांवा घ्यावा आणि मग एकत्र जमून काय तें ठरवावें, असा विचार करून शक विंध्याची पहिली रांग चढून पुढला उतार उतरूं लागले.

पण ते तर मरणाच्या खाईंतच उतरत होते !

सगळ्या रानींवनींचे भिल्ल कालिंगाच्या आज्ञेची वाट पहात पलिकडील कड्याच्या अगदीं पोटाशीं असलेल्या झाडींत लपून बसले होते. तो कडा अन् त्याच्या शेजारचा सुळकुंडा डोंगर यांच्या मध्यभागीं एक खिंड होती. कालिंगानें तेंच शकसेनेचें मृत्युस्थान ठरविलें होतें !

स्वतः कालिंग एका भिल्लांच्या तुकडीबरोबर उताराजवळच्या दरींत थांबला होता. डोंगराच्या शिखरावरून सारखा कुकुंबा ओरडल्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. ती खूण कानीं पडतांच कालिंग तुकडीसह झाडांतून लपत शक येत होते, त्या डोंगराकडे निघाला.

मध्येंच एका झाडावर चढून हें दृश्य पहात असलेल्या कूटदन्तानें विचारलें,

" सगळे अलीकडे आले ? "

" होय. खूण ऐकली नाहींत ? "

" ती याची खूण होती होय ? माझें लक्ष नव्हतें –"

आणि सावधपणें कालिंग आपल्या तुकडीसह अलिकडील डोंगराच्या दरडीपर्यंत आला. तंगाही त्याच्याबरोबरच होता. कालिंगानें सगळें शक सैन्य खिंडीच्या वाटेनें चढतांना पाहिलें. त्यानें त्यांना खिंडीपर्यंत पोंचूं दिलें, आणि साऱ्या दरींत शिंगाचा कर्कश आवाज घुमला.

त्या आवाजानें शक चकित होऊन इकडे तिकडे पाहताहेत तोंवर त्यांच्यावर मागून-पुढून बाणांचा असह्य वर्षाव होऊं लागला. जागा अवघड. मागेंपुढें सरायला वाव नाहीं. चहूंबाजूंनीं महामूर झाडी.

घोडे धड पळवतां येईनात. दोन दिवस पळतां पळतां दमछाट झालेली. त्यांत रणांतून हाय खाऊन पाय मागें घेतलेला. आतां कुठें जरा विसांवतां येईल, असा भरंवसा आलेला.

अन् अशा स्थितींत बाणांचा नुसता वर्षाव सुरू आहे. एकेक बाण जीव खाऊन मारलेला. उगीच गंमत म्हणून नव्हे. कांहीं बाण घोड्यांना लागत. त्या वेदनांनीं खिंकाळून अन् वांकडयातिकडया उडया मारून त्यांनीं भरीला भर म्हणून गोंधळ घातला !

शेवटीं तें शकांचें पांच-सात हजार सैन्य बारा वाटा झालें. कांहीं जण जाग्यावरच मेले. कांहीं पळतां पळतां उलथून मेले. कांहीं घोडयांवरून उडया टाकून जीवभेणें आसरा शोधीत असतां घोडयांच्या टापांखालीं सांपडले. कांहीं इकडेतिकडे झाडींत शिरले, ते भिल्लांनीं टिपून मारले ! दोन घटका दिवस राहिला असतां तें सगळें शकांचें सैन्य त्या खिंडीच्या व्यूहांत गारद झालें !

कालिंग ओंठ दातांखालीं दाबून धनुष्य चालवीत होता. कोणी शक जिवंत राहिलेला दिसेना, तेव्हां तुकडीला बाण थांबवायला सांगून त्यानें कमरेला गुंडाळलेलें निशाण काढलें. तंगाला तो म्हणाला,

" तंगा, पलीकडून एक सागाचा शेकाटा तोडून आण—लवकर ! "

तंगानें कमरेच्या कोयतीनें शेकाटा तोडून आणला. तो तासून स्वच्छ केल्यावर कालिंगानें त्यावर निशाण चढविलें. मग तो तंगाला बोलला,

" त्या पलीकडल्या गोरखचिंचेवर चढशील ? शेंड्यापर्यंत ? "

" हो ! त्यांत काय आहे ! "

" चढ, अन् हें निशाण हलवून कड्याखालच्या आपल्या गड्यांना दाखव. "

तंगा वर चढून निशाण हलवूं लागला. तें पाहतांच कड्याखालून होत असलेला बाणांचा मारा थांबला. मग धनुष्यास बाण जोडून ही

तुकडी खिडीकडे निघाली.

पण बाणांचें कांहीं काम पडलें नाहीं. कुणीही शक जिवंत राहिला नव्हता! तेवढ्यांत एका उंच झाडावरून हें लढाईचें दृश्य पाहत असलेला कूटदन्त तिथें धांवत आला. कालिंगाला पाहतांच त्यानें त्याला घट्ट मिठी मारली, अन् म्हणाला,

" मित्रा, तूं केवढें मोठें काम केलें आहेस ! "

किंचित उदास होऊन कालिंग बोलला,

" म्हणजे माणसें मारणेंच ना ? "

आश्चर्यानें कूटदन्त म्हणाला,

" कालिंगा, तूं भिल्लांचा सेनापति ! तूं बोलतोस हें ? "

" तर मग काय बोलूं ? कधीं ओळख ना देख ! कधीं आम्हीं एकमेकांना जन्मभरांत पाहिलेंही नाहीं. मात्र हीं सगळीं माणसें मारायला कारण मीच झालों ना ! "

कूटदन्त मान हलवीत म्हणाला,

" कालिंगा, तूं असें कर. "

" काय ? "

" हीं माझीं पिवळीं वस्त्रें नेसून भिक्खु हो. मग हें बोलणें तुझ्या तोंडीं शोभेल—"

" अभिमानदादा, थट्टा कां करतां ? "

" मग काय करूं ? भल्या माणसा, ज्यांनीं तुझ्या वस्तीवर छापा घातला—तुझ्या वस्तीवर तरी कां ? भारताची सुपीक भूमि पायदळीं तुडवीत, सगळें शांत जीवन उधळून लावीत जे इथवर आले तेच हे शक ! तुझी वहीण अन् स्वर्णमयी यांपैकींच एकानें पळविली ! तुझ्या आवडत्या आईला—"

कळवळून कालिंग म्हणाला,

“ अभिमानदादा, कां त्या आठवणी चाळवतां? ”

“ तूं विसरतोस म्हणून. तुझ्या बुद्धीवर दयेचा पगडा फार लवकर बसतो. अरे, दया करावी, पण ती रंजलेल्यांवर. माजलेल्या, पिसाळलेल्या लांडग्यांवर नव्हे! ”

“ तर मग आतां मी काय करूं? ”

“ हां, असा जरा ताळ्यावर ये. अजून तुला तुझ्या बहिणींचा शोध घ्यायचाय्–”

“ कुठें? ”

“ त्यासाठीं उज्जयिनीला जावें लागेल. पलिकडे मैदानांत शक्तिपाल तुझी वाट पाहतोय्. आतां असें कर. हे तुझे भिल्ल गडी उधळलेले घोडे धरून आणताहेत. त्यांतले दोनतीन चांगले असतील ते घे. मीही येतों तुझ्याबरोबर. ”

तंगा म्हणाला,

“ भैय्या, मला इथेंच ठेवून जातोस? ”

कंका हें सर्व ऐकत होता. तो बोलला,

“ कालिंगा, तंग्यालाही घेऊन जा. ”

“ आणि या सगळ्या भिल्ल मित्रांची व्यवस्था? ”

“ तें आमचें आम्ही पाहून घेऊं. कांहीं बंबाळ्या मैदानांत नाहीं आहोंत, घरींच रानांत आहोंत आम्ही. तूं नीघ! ”

मग कालिंग, कूटदन्त अन् तंगा तिघे तीन घोड्यांवर बसले. कालिंगानें निशाण हातीं घेतलें, अन् घोडे उत्तरेकडे वळविले. पलिकडली खिंड चढून ते मैदानाच्या अंगावर जाऊन पोंचले, तेव्हां त्यांना मैदानांत सगळीकडे पसरलेलें मागध सैन्य दिसलें. जरा जलद गतीनें घोडे दौडवीत ते मैदानाजवळ पोंचले, तों त्यांना घोड्यांवर बसलेले दहा स्वार इकडे उधळत येत असलेले दिसले.

" कालिंगा, कोण ? " कूटदन्तानें विचारलें.

ओळख पटून कालिंग म्हणाला,

" शक्तिपाल–होय ! तेच आहेत ! "

ती तुकडी जवळ येतांच कालिंग अन् शक्तिपाल–दोघांनींही घोड्यांवरून उड्या मारल्या, अन् ते कडकडून एकमेकांना भेटले. शक्तिपालानें विचारलें,

" कसें काय उरकलें काम ? "

" एकही शत्रु आपल्या पराभवाची खबर सांगायला परतूं शकणार नाहीं ! "

" वा वा ! मित्रश्रेष्ठा, तुम्हीं केवढी मोठी कामगिरी बजावली आहे ! चला, महाराज चन्द्रगुप्तांनीं तुम्हांला बोलाविलें आहे. "

मध्यरात्रींपर्यंत घोडे दौडवून नंतर त्या सर्वांनीं आकाश तांवडें होईतोंवर विश्रांति घेतली. फटफटूं लागतांच ते पुनः भर वेगानें निघाले.

उज्जयिनीच्या अलिकडे दोन कोस असतां त्यांना दिसलें, कीं आडरानांतून तीन घोडेस्वार लपत जात असून त्यांच्यामागें एक चहूंबाजूंनीं बंद केलेला रथ धांवत आहे. शंका येऊन कालिंगानें घोडा आडरानांत घातला, अन् तो ओरडला,

" थांबा ! "

उत्तर आलें एका बाणानें. कालिंगाच्या कानाजवळून तो बाण जात असतां त्याच्या पिसाऱ्यावरून कालिंगानें ओळखलें, कीं तो बाण शकाचा आहे.

पळाचा उशीर न लावतां कालिंगानें तीन बाण सोडून तिन्ही स्वारांना टिपलें. कांहीं क्षणांतच तो रथासमोर जाऊन उभा राहिला, अन् म्हणाला,

" रथांत कोण आहे ? "

उत्तर आलें नाहीं. शक्तिपालानें रथावरील पडदा दूर केला. आंत हात अन् तोंडें बांधलेल्या चूली अन् स्वर्णमयी होत्या !

कालिंग बैलाच्या पाठीवर डोकें ठेवून मुसमुसून रडूं लागला. तंगानें तर रथांत झेंपच घेतली. चूलीच्या अंगावर कोसळून तो रडत मोठ-मोठ्यानें ओरडूं लागला,

"माझी चूली ग ! सोर्णमयी दीदी ! माझी आई कुठें आहे ! चूली ग !"

कूटदन्तानें मोठ्या मायेनें तंगाला धरून म्हटलें,

" तंगा, अरे त्या दोघींचीं जखडलेलीं अंगें तर मोकळीं करूं देशील !"

तंगानें हें ऐकतांच जवळच्याच सुऱ्यानें भराभर दोघींचीं बंधनें कापलीं.मोकळ्या होईतोंवर त्या दोघींनीं रडूं कसेंबसें सांवरून धरलें होतें. पण हात मोकळे होतांच चूलीनें तंगाला जवळ ओढलें अन् तोंडांतून एक शब्दही न काढतां ती त्याला मिठी मारून हुंदके देऊं लागली. स्वर्णमयीनें चूलीच्या गळ्यांत दोन्ही हात घातले, अन तीही ढसाढसा रडूं लागली.

कूटदन्तानें शक्तिपालाला एका बाजूला घेऊन सर्व हकिगत सांगितली. कांहीं वेळानें ते रथाकडे परतले, तोंवर चूली खालीं उतरून कालिंगाच्या खांद्यावर डोकें ठेवून आंसवें गाळीत होतीं. तिनें कालिंगाला थोडक्यांत जें सांगितलें, तें असें--

कनिष्क त्या दोघींना सरळ उज्जयिनीस घेऊन आला. तिथें त्यांना त्यानें कितीतरी आमिषें दाखविलीं, भय घातलें, उपाशीही ठेवलें. आठ दिवसांच्या कडकडीत उपासानंतर कितीतरी पक्वान्नें समोर ठेवून तो हंसत म्हणाला,

"माझें ऐकाल, तर हें सर्व तुमचें आहे."

पण त्या दोघींनींही स्वच्छ नकार दिला. मग सुरू झाले हाल. रोज

दोन भाकरी आणि गाडगेंभर पाणी. इतके दिवस कनिष्काच्या वाड्याच्या तळघरांत एका अंधाऱ्या खोलींत काढावे लागले.

काल रात्रीं भयानें बावरलेल्या कनिष्कानें त्या दोघींना बांधून रथांत बसविलें, अन् गल्ल्यागल्ल्यांनीं प्रहऱ्यांना चुकवीत कसातरी रथ उज्जयिनीबाहेर काढला.

कालिंग बाण लागून ठार झालेल्या स्वारांकडे गेला. त्यानें तिघांचींही शिरस्त्राणें मस्तकांवरून काढलीं. त्या तिघांतला एक कनिष्क होता! छातींत घुसलेल्या कालिंगाच्या बाणानें आपलें काम केलें होतें.

शक्तिपाल कालिंगाजवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला,

" कालिंगराय, आतां कसें करायचें ? "

" शक्तिपाल, माझें मला मिळालें आहे. एवढेंच मिळण्यासारखें होतें. आतां मी माझ्या वस्तींत परत जाईन. तिथें माझ्या झोंपडींत आम्ही भावंडें राहूं—मी, चूली, तंगा अन् स्वर्णमयी. पुनः एकदां त्या जमिनी नांगरून तिथें मका पेरूं. झेंडूचीं रोपें लावूं. रानांतून हिंडून तिथल्या बेहड्याच्या अन् बाहव्याच्या झाडांवर लागलेलीं मधाचीं पोळीं काढूं. रानफुलें वेंचूं. गाणीं गाऊं, अन् त्या शांत वस्तींत राहूं— ! "

शक्तिपाल थोडा बावरला. पण कूटदन्त पुढें सरून म्हणाला,

" कालिंगा, मला विसरलास तूं ? "

" छे अभिमानदादा ! पण तुमचें मी कसें बोलूं ? तुम्ही संसार सोडलेले भिख्खु— ! "

" अरे वा ! एका रात्रीं मी तुमच्या झोंपडींत भिक्षा मागायला येईन. तूं मला म्हणशील अभिमानदादा, आजची रात्र गुहेंत न जातां इथेंच रहा. आपण शेकोटीजवळ गप्पा मारीत बसूं. मग स्वच्छ चांदण्यांत, शेकोटीजवळ बसून, महाभारतांतल्या गोष्टी सांगत— "

कालिंग हरखून म्हणाला,

" वा वा ! दादा, हें तर अधिकच चांगलें झालें ! "

" झालें ना ? होणारच तें. मात्र अट एक. "

" कोणती ? "

" एकदां तूं महाराज चन्द्रगुप्तांना भेटून आलें पाहिजेस ! "

" पाहिजेच का ? "

शक्तिपाल म्हणाला,

" होय कालिंगराय ! शकांचा साफ बीमोड करणारा शूर भिल्ल सेनापति त्यांना एकदां पहायचा आहे. कडकडून भेटून त्या सेनापतीला मिठी मारावी, असें त्यांच्या मनांत आहे. "

संकोचून कालिंग म्हणाला,

" मी तर फार लहान आहें—"

" पण तुमचें कर्तृत्व फार मोठें आहे कालिंगराय ! आतां उशीर करूं नका. रथ मागें वळवा. हीं तिन्ही प्रेतें इथेंच पडूं द्या. माझे सैनिक त्यांची व्यवस्था लावतील. चला. "

कालिंग पुन: एकदां कनिष्काच्या प्रेताजवळ गेला. त्यानें शिरस्त्राणानें कनिष्काचें तोंड झांकून टाकलें. मग तो, स्वर्णमयी अन् चूलीला रथांत बसवून घोड्यावर उडी मारीत म्हणाला,

" चला तर ! "

चूलीनें तंगाला रथांत घेतलें. रथ पुढें अन् स्वार मागें, अशी यात्रा सुरू झाली.

कालिंग शेजारीं असलेल्या कूटदन्ताला म्हणाला,

" अभिमानदादा, काय होतें, अन् काय झालें ? "

कूटदन्त म्हणाला,

" मला माहीत आहे तें. "

अनुक्रम
विभाग
क्रमांक
ता.

" सांगा पाहूं ? "

" भिल्लांच्या झोंपडींत जन्मलेला एक सामान्य मुलगा आपल्या कर्तृत्वानें शकांचा निःपात करून भिल्ल सेनापति झाला ! "

वाऱ्याची एक झुळूक आली, अन् बाजूच्या झाडांच्या फांद्या गदगदा हालल्या. त्या म्हणत होत्या,

" असेंच ! असेंच ! "

****

अनुक्रम
वा. वा.
क्रमांक ३५४५
नों. दि.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६५५७ नों. दि.
वि. वा. वा. क्र.